
# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल, २०१६ । किंमत १५ रुपये


## मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा

महाराष्ट्रदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!














आमची वाचनीय पुस्तके

# वाचत राहा...




अहिल्याबाई होळकर यांच्या तेजस्वी जीवनावरील कादंबरी.

## कर्मयोगिनी

विजया जहागिरदार

---




## सैनिक हो, तुमच्यासाठी...

**भारत-पाक यांच्यात झालेल्या युद्धांत ज्यांनी विशेष पराक्रम गाजविले, अशा सैनिकांची ही पराक्रम-गीते कुमारांना निश्चितच प्रेरणादायक ठरतील.**

# मेहता मराठी ग्रंथजगत

। एप्रिल २०१६ । वर्ष सोळावे । अंक चौथा ।

मांडणी-अक्षरजुळणी

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **अभिष्टचिंतन** | ८ |
| **साहित्यवार्ता** | ११ |
| **पुरस्कार** | ४४ |
| **पुस्तक परिचय** | |
| **मी कधीही माफी मागणार नाही!** | ५४ |
| **स्वप्न व्यवस्थापकाचे** | ७१ |
| **स्मरण** | ८७ |
| **श्रद्धांजली** | ९० |
| **बालनगरी** | ९४ |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संपादकीय

## विश्वव्यापी चिवचिवाट

ट्विटरने २१ मार्च २००६ रोजी आपले पहिले दशक पूर्ण केले आणि एकूण ५५ कोटी युजर्स मिळवले. त्यांपैकी ३२ कोटी युजर्स हे ट्विटरवर कायम क्रियाशील असतात आणि ते दररोज ट्विटरवरून एखाद्या घटनेबद्दल किंवा एखाद्या मतप्रदर्शनाबद्दल, एखाद्या समस्येबद्दल किंवा नेतृत्वाबद्दल आपले निरीक्षण नोंदवत असतात. अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ओबामा, भारताचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांसारखे अग्रगण्य नेते, अभिनेते, उद्योगपती, कार्यकर्ते ट्विटरवर दररोज एखाद्या विषयावर भाष्य करीत असतात. हजारो युजर्स या भाष्यावर उलटसुलट विचार मांडत असतात.

युजर्स आणि ट्विटर यांच्यातील अनौपचारिक वार्तालाप सतत चालू असतो. एखाद्या अभिनेत्याचे, नेत्याचे वा अग्रगण्य व्यक्तीचे फॉलोअर्स किती आहेत याची ट्विटरवरील क्लिक्सनी कल्पना येते आणि कोणाच्याही लोकप्रियतेचा आलेख कसा चढतो, उतरतो यावर युजर्सचे महत्त्व, मोठेपण याची तुलना ठरवली जाते. शाहरूख खान, सलमान खान, अमिताभ बच्चन, अनुपम खेर, वरुण धवन, अक्षयकुमार, हृतिक रोशन, सिद्धार्थ मल्होत्रा, शाहीद कपूर, अर्जुन कपूर यांचे मार्चच्या शेवटच्या आठवड्यात 'ट्विटर'च्या लोकप्रियतेच्या आलेखात पहिले दहा क्रम आले होते. चित्रपट नायिकांमध्ये याच पाहणीच्या वेळी प्रियांका चोप्रा, अलिया भट, सोनाक्षी सिन्हा, श्रद्धा कपूर, सोनम कपूर, परिणती चोप्रा, प्रीती झिंटा, अनुष्का शर्मा, जॅकेलिन फर्नांडिस, दीपिका पदुकोण यांनी आघाडी घेतलेली होती. या आघाडीच्या आधारावर त्यांचे मानधनही कमी-जास्त होत असते. चित्रपट अभिनेत्यांप्रमाणे क्रीडापटू, निवडणुकीतील उमेदवार नेते, कलाकार, लेखक, चित्रपट, पुस्तके वगैरेंच्या लोकप्रियतेचा मागोवाही व्यावसायिक शिस्तीत घेण्यात येतो. 'ट्विटर'मधील

क्रमवारीकडे त्यामुळे सर्व क्षेत्रांतील अग्रगण्य व्यक्तींचे बारीक लक्ष असते.

'ट्विटर'चे हे खास व्यासपीठ वापरण्यासाठी अहमहमिका लागलेली असते. 'ट्विटर'वर मांडायचे मत छोटे, संक्षिप्त असावे लागते. १४० मुळाक्षरे म्हणजे चार-पाच ओळी. तीस-चाळीस शब्द. त्यामुळे ट्विटरवर आपण आपले मत पटकन मांडून मोकळे होऊ शकतो. फार वेळ त्यासाठी द्यायची गरज नसते. युजर्सच्या दृष्टीनेही ही गोष्ट सोयीची ठरते. फार मोठा संदेश वा मजकूर असेल तर तो वाचायलाही वेळ जास्त लागतो. सध्या वेळ असतो कुणाकडे? ट्विटरच्या सुटसुटीत, मोजक्या शब्दांच्या संदेशाने युजर आणि सेंडर या दोघांचीही सोय होते.

विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्ती, उत्पादने, चित्रपट, पुस्तके, क्रीडापटू- त्यांची लोकप्रियता आणि त्यांना मिळणारा प्रतिसाद या सर्वांचा मागोवा घेण्यासाठी हे संकेतस्थळ त्यामुळेच युजर्सची दाद मिळवते. ट्विटरचा जन्मदाता म्हणून जॅक डोरसी याला श्रेय दिले जाते. जोआ ग्लास, बिझ स्टोन, इव्हान विल्यम्स हे त्याचे ट्विटरमधील सहकारी. संदेशवहन करणाऱ्या ट्विटरची अधिकृत स्थापना व नोंदणी पुढे झाली. (एप्रिल २००७) पहिल्या दिवशी २० हजार क्लिक्स या वेबसाइटला मिळाल्या. आता युजर्सची संख्या ५५ कोटी, वार्षिक उलाढाल २२१ कोटी डॉलर्स- एकूण चिमणीचा चिवचिवाट खूपच उंच भरारी घेत आहे. सर्वसामान्य व्यक्तीलाही जगविख्यात नेत्या-अभिनेत्यांशी संवाद साधण्याची संधी ही भरारी देते. बराक ओबामांचे ७ कोटी, यू ट्यूबचे ६ कोटी युजर्स हे आकडे विस्मित करणारे आहेतच; पण सर्वांत प्रथम ताज्या बातम्या (ब्रेकिंग न्यूज) देण्याबाबतही विक्रम करूनही दबदबा निर्माण केला. अंतराळवीर माइक मेस्सीपिनो याने अंतराळातून पाठवलेला 'नुकताच उपग्रह कक्षेत स्थिरावला आहे. आयुष्यातील सर्वांत मोठ्या साहसाचा हा क्षण आहे' अशा आशयाचे ट्विट (मे २००९) हे अंतराळातून पाठवण्यात आलेले पहिले ट्विट मानले जाते. माहिती तंत्रज्ञानाचे क्षेत्र पुस्तके, माध्यमे, कला, विज्ञान– या सर्वच क्षेत्रांत क्रांती घडवून आणत आहे. चिमणीचा चिवचिवाट सर्वत्र हलकल्लोळ माजवण्याइतका प्रभावशाली ठरणार आहे. पाहत राहा... आगे क्या क्या होता है!

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क

www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालय्सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघरीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१


Email : mehtabooksellers@gmail.com

GET IT ON Google Play आणि dailyhunt

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks



# मराठी प्रकाशनातले 'अजब' वैभव



**मराठीतील प्रथितयश प्रकाशक अनिल मेहता यांची पंचाहत्तरी व त्यांच्या प्रकाशनाचा सुवर्णमहोत्सव यानिमित्त.**

अनिल मेहता हे महाराष्ट्रातील प्रकाशन व्यवसायात 'ट्रेंड सेटर' आहेत. वि. स. खांडेकर, रणजित देसाई, व्यंकटेश माडगूळकर, द.मा. मिरासदार, व. पु. काळे, आनंद यादव हे समग्र वाचायचे तर अनिल मेहतांना पर्याय नाही. अरुण शौरी, तस्लिमा नसरीन, सुधा मूर्ती, किरण बेदींची मराठी वाचकांना जर कोणी ओळख करून दिली असेल, तर ती त्यांनीच. भाषांतरित साहित्याच्या प्रकाशनाची पायवाट मळली ती अनिल मेहतांनी.

डॉ. राजन गवस, इंद्रजित भालेराव, डॉ. सदानंद मोरे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. रवींद्र शोभणे, उत्तम बंडू तुपे, बाबाराव मुसळे यांना त्यांच्या पहिल्या साहित्यिक रचना प्रकाशित करून लौकिक अर्थाने लेखक जर कुणी बनवलं असेल, तर ते अनिल

मेहतांनी! वि. स. खांडेकरांसारख्या ज्ञानपीठ विजेत्या साहित्यिकांच्या वारसांना तुटपुंजी रॉयल्टी मिळायची. सर्वोच्च न्यायालयापर्यंत धडक देऊन लेखकाचे मानधन त्याच्या हयातीतच मिळावे म्हणून 'केस लॉ' घडवून आणणारा प्रकाशक हाच! किती गोष्ट सांगू? १९६४ला नुकतंच मिसरूड फुटलेला एक तरुण निपाणीचं वडिलोपार्जित कटलरीचं दुकान सोडून कोल्हापूरला 'अजब पुस्तकालय' सुरू करतो. पन्नास वर्षांत अव्वल प्रकाशक बनतो. हे मराठीचं 'अजब' वैभवच नव्हे का?

अजब पुस्तकालय सुरू झालं ते वर्ष होतं १९६४-६५. पहिली पाच वर्षे त्यांनी पुस्तक विक्रेता म्हणून मोठी मेहनत घेतली. वाचकाला मागेल ते पुस्तक मिळवून देण्याचा रिवाज त्यांनी पाळला. त्यातून वाचकांचं मोहोळ त्यांच्या दुकानात घोंघावत राहायचं. एके दिवशी बापू गावडे नावाच्या पट्टीच्या वाचकांनी अनिलभाईंना गप्पांच्या ओघात एक किस्सा ऐकवला. अनिलभाईंनी तो त्यांना लिहायला लावला. त्याची कादंबरी झाली. 'दसऱ्याचं सोनं' म्हणून ती प्रसिद्ध झाली. 'दसऱ्याचं सोनं' जिल्हा परिषदेनं लुटलं. अख्खी आवृत्ती खरेदी केली. अनिलभाईंना फंडा मिळाला. वाचकप्रिय पुस्तक प्रकाशित करण्याचा नंतर त्यांनी धडाकाच लावला.


पुढे इंग्रजी भाषांतराला हात घातला. 'फ्रीडम ॲट मिडनाइट' मराठीत आणलं. त्याने चांगलाच हात दिला.

मग त्यांनी मागे वळून पाहिलंच नाही. आनंद यादव त्यांचे मित्र. त्यांना अनिलभाईंनी पुस्तकांची गळ घातली. आनंद यादवांनी अट घातली. तुम्ही पुण्यात प्रकाशन सुरू कराल तर मी पुस्तक देईन. कारण, त्या वेळी पुणे ही मराठी प्रकाशनाची राजधानी होती. त्यांचं 'गोतावळा' गाजत होतं. आनंद यादवांनी 'माळावरची मैना' कादंबरी अनिलभाईंना दिली आणि अजब प्रकाशनचं रूपांतर 'मेहता पब्लिशिंग हाऊस' मध्ये झालं. १९९०चं 'साहित्य अकादमी' डॉ. यादवांच्या 'झेंबी'ला मिळालं आणि मेहता पब्लिशिंग हाउस ला राष्ट्रीय प्रतिष्ठा लाभली.

मराठी साहित्यावरील त्यांनी अनेक छोट्या छोट्या गोष्टी रुजवत आपली प्रतिमा निर्माण केली आहे. त्यांनी पुस्तक प्रकाशनाचे देखणे कार्यक्रम सुरू केले. रणजित देसाई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार सुरू केला. 'टी बुक क्लब' सुरू केला. जागतिक कीर्तीच्या पुस्तकांचे मराठी भाषांतर हक्क विकत घेऊन ती मराठीत आणली. फ्रँकफर्टमध्ये (जर्मनी) संपन्न होणाऱ्या जागतिक पुस्तक मेळ्यात न चुकता हजेरी लावणारा भारतीय प्रकाशक म्हणून मेहता पब्लिशिंग हाऊसचा आज लौकिक आहे.

**– डॉ. सुनीलकुमार लवटे**
**कोल्हापूर**

**नवं कोरे**




# तेच दिन सोनेरी...

**मूळ लेखक** - तहमिमा अनम

**अनुवाद** - भारती पांडे

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

'द कॉस्टा फर्स्ट नॉव्हेल अवॉर्ड' आणि 'द गार्डियन फर्स्ट बुक अवॉर्ड' यांच्या यादीमध्ये स्थान मिळवलेली कादंबरी. १९७१च्या वसंत ऋतूमध्ये रेहाना हक आपल्या दोन मुलांना एक मेजवानी देत आहे. तिला हे माहीत नाही की, आजच्या दिवसानंतर त्यांची सर्वांची आयुष्यं कायमची आणि पार बदलून जाणार आहेत, कारण हा पूर्व पाकिस्तान आहे...

युद्धाला तयार झालेला. आपल्या मुलांना सुरक्षित ठेवण्याच्या धडपडीत रेहानाला एका काळीज पिळवटून टाकणाऱ्या समस्येला सामोरं जावं लागणार आहे. बांगलादेशाच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारलेली 'अ गोल्डन एज' ही कादंबरी क्रांती, आशा आणि अनपेक्षित शौर्य यांची कथा सांगते आणि तीही प्रेमाच्या लांबलचक मार्गावरून जाणारी...!

# साहित्य वार्ता

## ✍ जी-मेलची वाटचाल

रोज नवीन गोष्टी जोडून आपल्याकडे युजर्सना आकर्षित करण्याचा चंग गुगलने बांधला आहे. याचे पुढचे पाऊल म्हणजे गुगलच्या ई-मेल सेवा पुरविणाऱ्या जीमेलची वाटचाल आता 'इनबॉक्स'च्या दिशेने होते आहे. त्यामुळे जीमेल बंद तर होणार नाही ना, असा प्रश्न विचारला जात आहे.

जीमेल सुरू होऊन १०-१२ वर्षे झाली. या काळात ई-मेलचे विविध प्रकारे वर्गीकरण, ऑटो फॉरवर्ड, स्मार्ट रिप्लाय वगैरे नवनवीन फीचर्स गुगलने उपलब्ध करून दिली. सतत नाविन्याचा ध्यास असणाऱ्या गुगलने आता सर्व प्रमुख ई-मेल कंपन्यांच्या सेवा आपल्या नवीन इनबॉक्स या ॲप्लिकेशनमध्ये देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. म्हणजेच इनबॉक्सच्या ॲपमध्ये युजरला जीमेलसह याहु, आउटलूक वगैरे कंपन्यांचे ई-मेलही वापरता येतात. ही सेवा लवकरच जीमेलला रिप्लेस करून सुरू होणार असल्याची चर्चा चालू आहे. यात प्रामुख्याने काही युजरना आपल्या जीमेल वापरावेळी एक नवीन विंडो सुरू होऊन या नवीन ॲप्लिकेशनची सूचना देण्यात येते आहे आणि नव्या विंडोतील लिंकवर क्लिक केल्यावर आपले जीमेल खाते हे थेट इनबॉक्सच्या खात्याला लिंक म्हणजेच रिडायरेक्ट होणार आहे. ज्या युजरना हा नवीन ऑप्शन नको आहे ते तो 'टर्न ऑफ' करू शकतात. इनबॉक्स वापरल्यानंतर काही दिवसांनी एखाद्या युजरला वाटले, की पुन्हा जीमेल वापरायची, तर तसा पर्यायही इनबॉक्समध्ये देण्यात आला आहे.

गुगलने ही इनबॉक्स सेवा ऑक्टोबर २०१४ ला सुरू केली होती. त्या सेवेचा मुख्य हेतू हा युजरना त्यांच्या आलेल्या मेल्सना सुटसुटीतपणे ठेवण्यासाठी हा होता. तसेच या सेवेत विविध सेवा (उदा. विमान तिकिट

बुकिंग, वस्तूंची देवाणघेवाण) यांचाही समावेश करण्यात आला होता. इनबॉक्ससेवा ॲन्ड्रॉइड, आयफोन यांसारख्या वेगवेगळ्या स्मार्टफोनमध्येही चालू शकणार आहेत. विशेष म्हणजे यात रिअल टाइम अपडेट्स युजरना कंपनीकडून दिली जाणार आहेत. ज्यामुळे ही सेवा लोकप्रिय ठरू शकते. यात आपण आपल्या फ्रेंडलिस्टमधील लोकांनाही आमंत्रित करू शकतो. यात मेलसेवांसोबतच बँकिंगसेवा आणि आर्थिक सेवासंबंधित अपडेटही आहेत, असे कंपनीचे म्हणणे आहे.

## ✍ हसू आणि आसू

एकपात्री कलाकार परिषदेतर्फे जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर कलाक्षेत्रात नाव कमावलेल्या बाप लेकींच्या चार जोड्यांनी रंगत भरली.

सुरेंद्र माजगावकर व चैताली माजगावकर - भंडारी, अशोक मुरुडकर-हेमा कोळपकर, श्रीधर कुलकर्णी -रामेश्वरी वैशंपायन, डॉ. मधुसूदन घाणेकर-ॠचा घाणेकर या बाप-लेकींच्या जोड्यांनी आपापल्या सादरीकरणातून धमाल उडवून दिली.

मुलांकडे घराचा वारसदार म्हणून पाहिले जाते. परंतु, कलेच्या क्षेत्रात मुलींनीच आमचा वारसा पुढे केला आहे, असे या पित्यांनी कौतुकाने सांगितले. मकरंद टिल्लू यांनी सूत्रसंचालन केले.

प्रमुख पाहुणे सदानंद चांदेकर म्हणाले, ‘एकपात्री, कथा-कथनाच्या कार्यक्रमांचा आनंद रसिक मनापासून उपभेगतात. या कलेचा दर्जा अनेक वर्षांपासून जपला जात आहे. पूर्वीपेक्षा आताची परिस्थिती बदलल्याने कलेत समतोल साधला जात आहे. एकपात्रीला महाराष्ट्रात चांगला दर्जा मिळत आहे. बाप-लेक असा प्रयोग कदाचित पहिल्यांदाच सादर होत आहे.’

या कार्यक्रमाच्या निमित्ताने ॠचा घाणेकर-थत्ते यांच्या ‘असे करावे सूत्रसंचालन-२’, ‘आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ’ आणि ‘असामान्य भारत’ या तीन पुस्तकांचे प्रकाशन वडिलांच्या हस्ते करण्यात आले.

हेमा कोळपकर यांनी व. पु. काळें यांची ‘पप्पा’ही कथा साभिनय सादर केली तेव्हा रसिकांचे डोळे पाणावले.

## ✍ ‘युक्रांदचे दिवस’ पुस्तकाचे प्रकाशन

“काळाच्या ओघात ‘युक्रांद’च नव्हे, तर ज्या-ज्या चळवळी निस्तेज

झाल्या, त्यांचा नव्याने शोध घेतला पाहिजे. त्यांच्या कार्यावर विपुल लेखन व्हायला हवे. काही चळवळीतील नेते मोठे झाले; पण अनुयायी लुप्त झाले, त्यामुळे त्या-त्या चळवळीतल्या लोकांनी आत्मचिंतनही करायला हवे. यातून तयार होणारे 'डॉक्युमेंटेशन' आजच्या नव्या चळवळींसाठी पोषक ठरणार आहे.'' असे मत साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले.

पद्मगंधा प्रकाशनाच्या समारंभात विजय दर्प लिखित 'युक्रांदचे दिवस' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. कोत्तापल्ले यांच्या हस्ते झाले. या वेळी 'युक्रांद'चे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी, काँग्रेसचे प्रवक्ते रत्नाकर महाजन, लेखिका डॉ. अंजली सोमण, प्रकाशक अरुण जाखडे उपस्थित होते.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''सध्या मोकळेपणाने बोलता येत नाही. बोलले तर तुमच्यावर कुठला आरोप लावला जाईल, हे सांगता येत नाही. राष्ट्रद्रोह केला असेही म्हटले जाऊ शकेल, अशी सध्याची स्थिती आहे. तरीही युवकांच्या चळवळी सुरू आहेत.''

''आम्ही समाजवादी आहोत; पण समाजवादी पक्षात गेलो नाही. त्यांची सत्ता येणार नाही, हे आम्हाला माहिती होते. त्यामुळे 'युक्रांद' सुरू केली. ज्या समाजात आपल्याला राहायचे आहे, तो समाज चांगला हवा, हा एक विचार आमच्यासमोर होता. एकाच नव्हे. तर वेगवेगळ्या जातींचे युवक चळवळीत होते. स्त्रियांना सुरक्षितता होती. क्रांती म्हणजे रक्त नव्हे तर सभ्यपणा असे आम्ही मानतो,'' असे डॉ. कुमार सप्तर्षी यांनी सांगितले.

## ✍ भाजपच्या सत्तेमुळे अभाविपला जोर

''भाजपच्या सत्तेमुळे 'अभाविप'सारख्या संघटनेला नको तेवढा आत्मविश्वास मिळाला आहे. पूर्वी 'जेएनयू'तली 'अभाविप' आत्ताच्याएवढी टोकाची व संकुचित नव्हती. आता मात्र ही संघटना आपली भूमिका अधिक जोरकसपणे मांडू लागली आहे. मात्र, हे वागणे 'अभाविप'लाही महागात पडेल, हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे....'' अशा शब्दांत नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रणेत्या मेधा पाटकर यांनी 'जेएनयू' प्रकरणासंदर्भात आपले मत स्पष्ट केले.

त्या म्हणाल्या, ''भले आपण एखाद्याच्या विरोधात असू पण त्यालाही त्याची मतं आहेत हे अभाविपने सहिष्णुतेने समजून घ्यायला हवं. जवाहरलाल नेहरू विद्यापीठाबद्दल (जेएनयू) कुणीही पूर्वग्रह करून घेणे

नवं कोरे

# दाह




**लेखक:-** सुरेश पाटील

**किंमत :४९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

''माणसामाणसांमध्ये घडणाऱ्या आंतरक्रियांना कमालीचं महत्त्व असतं.
माणसाची जडण-घडण याच माध्यमातून होत असते. जनावराचंही
असंच असतं. भले त्याचे मापदंड वेगळे असतील;
पण दोन घटकांत संवाद हा घडतच असतो.
दोन माणसं कधी एकत्र येताना दिसतील,
तर कधी एकमेकांच्या बोकांडी बसलेलीही आढळतील.
प्रेम, वात्सल्य, आशा-आकांक्षा, ईर्षा, स्पर्धा, संघर्ष अशा अनेक
निऱ्यांचा हा हुतूतू. तो कधी कोणतं वळण घेईल, याचं अनुमान
बांधणंही कठीण.
मात्र, या सर्व बाहुल्यांना खेळवण्याचं काम करते ती भोवतालची
परिस्थिती! तिला पायदळी तुडवून एखादं पुढे गेलं
तर ते महानायक/महानायिका ठरतं.
इतरांसाठी मात्र असतं ते तेच रिंगण.
घाण्याला जुंपलेल्या बैलासारखं; झापडबंद...!
कधी झापड सरकलं, घसरलं, तुटलं,
खाली पडलं तरी चालत राहायचं,
ऊर फाटंस्तोवर!
...तोच हा मराठी मनाचा दाह!''

योग्य ठरणार नाही. 'जेएनयू'मधील विविध युवा संघटना विचारधारेच्या बाबतीत (मग त्या डाव्या असोत की अन्य कुठल्या) अत्यंत स्पष्ट आणि सजग आहेत. इथे अनेक वर्षांपासून जसे डावे आहेत तसेच 'अभाविप'सारख्या उजव्या संघटनेलाही स्वत:चा अवकाश होता आणि आहे. 'अभाविप' सारख्या संघटना आपली संकुचित वृत्ती टोकाला नेतात, तेव्हा प्रश्न पुढे येतो.''

मोदींचा भाजप आधीच्या भाजपपेक्षा पूर्णत: वेगळा आहे. आत्ताच्या भाजपने संपूर्ण निष्ठाच भांडवलदारांना वाहिली आहे. पंतप्रधान मोदी विदेश दौरे करून तिथे वेगवेगळे 'आर्थिक करार' करून येतात आणि ते परतल्यावर त्याबद्दलची राष्ट्रीय योजना आणि धोरणे ठरवली जातात, हे गमतीशीर आहे.

## ✍ सद्‌गुरू श्रीधर स्वामी चरित्रग्रंथाचा अनुवाद

श्रीधरस्वामी महाराज वरदपूर यांच्या वरील 'सदगुरू श्रीधरस्वामी चरित्र व वाङ्मय' या ग्रंथाचे प्रकाशन डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. गो. बं. देगलुरकर यांच्या हस्ते झाले. डॉ. मुकुंदराव तापकीर, ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर व वरदपूर आश्रमाचे विश्वस्त सुरेश साठे उपस्थित होते. कानडी भाषेतील मूळ ग्रंथ 'सद्‌गुरू श्रीधर स्वामी चरित्रम्' या ग्रंथाचा अनुवाद डॉ. अजित कुलकर्णी व डॉ. भालचंद्र कापरेकर यांनी केला आहे. गिरीश कुलकर्णी, अशोक बिदनूरकर, विलास वेदपाठक व भालचंद्र पेंढारकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## ✍ भारतात पहिल्यांदाच रि-रायटेबल नोटबुक

मुलांना लहानपणी लिहिण्याची सवय होण्यासाठी पाटी-पेन्सिल हातात दिली जाते. पूर्वी याच काळ्या पाटी-पेन्सिलचा वापर होत होता. काळानुसार यात बदल होत गेले. या सगळ्या गोष्टींचा विचार करून, पुण्यातील मराठी उद्योजक जगदीश लिमजे आणि भास्कर बलकवडे या दोघांनी रि-रायटेबल नोटबुक व रिरायटेबल स्लेट (पाटी) या दोन प्रॉडक्टची निर्मिती केली आहे.

या नोटबुकमध्ये न फाटणाऱ्या (विशिष्ट) पेपरचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे या कागदावर खोडून पुन्हा पुन्हा लिहिता येते. कागदावर एक रेघी, दोन रेघी, चार रेघी, छोटे चौकोन, मोठे चौकोन छापले आहेत. कितीही

वेळा लिहिण्याची व खोडण्याची सुविधा यात आहे.

न फाटणाऱ्या या पेपरवर विशिष्ट प्रकारचे केमिकल कोटिंग करण्यात आले आहे. भारतात प्रथमच या टेक्नॉलॉजीचा उपयोग त्यांनी नोटबुकसाठी केला आहे. या संकल्पनेचा कॉपीराइटसुद्धा घेतला आहे. तसेच, मुलांसाठी सौरऊर्जेवर चालणारा भातुकली संचही त्यांनी तयार केला आहे.

## ✍ 'आधार' ठरला कायदेशीर

केंद्र सरकारच्या अनुदानाने राबविल्या जाणाऱ्या जनकल्याणाच्या विविध योजना थेट लाभार्थींपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने लोकसभेत विरोधी पक्षांच्या आक्षेपांची पर्वा न करता मोदी सरकारने आधार विधेयक मंजूर करून घेतले. लोकसभा अध्यक्षांच्या संमतीने हे विधेयक 'धनविधेयक' म्हणून मंजूर करण्यात आले असून, त्यामुळे या विधेयकाला राज्यसभेच्या संमतीची आवश्यकता भासणार नाही.

केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी या विधेयकाचे विविध फायदे लोकसभेत मांडले. 'सरकारी पैशाचा योग्य रीतीने खर्च हाच या विधेयकाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे राज्यघटनेतील कलम ११० नुसार हे धनविधेयक आहे,' असा दावा जेटली यांनी केला.

'आधार विधेयक लोकसभेच्या स्थायी समितीकडे सोपविण्यात यावे' अशी मागणी बिजू जनता दला (बीजेडी) चे भ्रातृहरी मेहताब आणि काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली. 'या विधेयकामुळे देशातील प्रत्येक नागरिकाच्या खासगी आयुष्यात डोकावण्याची संधी मिळणार असल्यामुळे या विधेयकाची आवश्यकता नाही, असे अनेकांचे म्हणणे आहे. हे धनविधेयक होऊ शकते काय याविषयीही अनेकांना शंका आहे,' असे मेहताब म्हणाले.

काँग्रेस, बीजेडी आणि अण्णाद्रमुकचे आक्षेप फेटाळून लावून लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांनी या विधेयकावर चर्चा सुरू केली. 'आधारमुळे सर्वसामान्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण होणार असल्याची भीती नरेंद्र मोदी यांनी एका ट्विटद्वारे व्यक्त केली होती,' याकडे काँग्रेसचे राजीव सातव यांनी लक्ष वेधले.

'आम्ही आधार कार्डाची संकल्पना यूपीए सरकारकडून उधार घेतली असून, सरकारचे अनुदान पात्र व्यक्तींपर्यंत पोहोचविण्यासाठी त्याचा वापर

करण्यात येईल. त्यामुळे सरकारी स्त्रोतांची बचत होऊन जनकल्याणासाठी आणखी खर्च करणे शक्य होणार आहे,' असे जेटली म्हणाले.

'आधार कार्डातील काही माहिती संबंधितांच्या संमतीने इतरत्र वापरता येईल; पण बायोमेट्रिक्सची माहिती कोणालाही दिली जाणार नाही. आधार कार्डाच्या माहितीचा दुरुपयोग करून देशात हुकूमशाही आणली जाईल, ही भीती निराधार आहे,' असे जेटली यांनी स्पष्ट केले.

## ✍ बालभारती - सोनेरी पानांचे डॉक्युमेंटेशन

*आठवणींतील कविता, कलाकृतींचा कप्पा जिवंत ठेवणारी 'बालभारती'...!! प्रत्येक पिढीला या नावानं आपलेपणाचा ओलावा अनुभवता येतो. शालेय जीवनाशी नाळ जुळलेल्या या रेशमीबंधाचे विविध पैलू आता सोनेरी पानांमधून उलगडणार आहेत. बालभारतीच्या इतिहासापासून ते विकासाचा वाढीचा प्रत्येक टप्पा 'कॉफीटेबल पुस्तकातून पुढील पिढ्यांना अनुभवता येणार आहे. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त या सर्व टप्प्यांचे पुस्तक, डिजिटल अशा दोन्ही पद्धतीने दस्तऐवजीकरण होणार आहे.*

*महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ म्हणजेच बालभारतीचे यंदा हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या बालभारतीची पिढ्यानुपिढ्यांची नाळ आहे. शालेय जीवन तर बालभारतीशिवाय अपूर्णच. ५० वर्षांतील बालभारतीचा इतिहास बदल ते नव्या तंत्रज्ञानाकडे वाटचाल हे सगळे महत्त्वाचे टप्पे आहेत. मात्र त्यांचे योग्य वेळी जतन न झाल्यास काळाच्या ओघात त्या संदर्भातील दस्तऐवजच नष्ट होऊन जाईल. त्यामुळे बालभारतीने दस्तऐवजीकरण करण्याचे ठरविले आहे.*

दस्तऐवजीकरणामध्ये कॉफीटेबल पुस्तक, चित्रफीत व माहितीपुस्तिका हा महत्त्वाचा भाग राहणार आहे. कॉफीटेबल पुस्तक इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांत असणार आहे.

## ✍ 'ग्रंथाली'ला घर हवे

चार दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या वाचनसंस्कृतीचा अविभाज्य भाग बनलेल्या 'ग्रंथाली'ला राजधानी मुंबईत बेघर होण्याची वेळ यावी, ही महाराष्ट्रासाठी भूषणावह बाब नाही. राज्यकर्त्यांबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रात

काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनीही यानिमित्ताने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. दिनकर गांगल, अशोक जैन वगैरेंनी पुढाकार घेऊन १९७४ साली स्थापन केलेली ‘ग्रंथाली’ ही विश्वस्त संस्था आहे. ‘ग्रंथाली’ने पुस्तक प्रकाशनाच्या पलीकडे जाऊन महाराष्ट्रात वाचनसंस्कृती रुजवण्यासाठी सातत्यपूर्ण कार्य केले. व्यावसायिक प्रकाशक स्पर्श करणार नाहीत, अशा अनेक विषयांवरील पुस्तके ज्ञानयज्ञाच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवली. तीन दशकांपूर्वी ‘ग्रंथमोहोळ’सारखा अभिनव उपक्रम राबवला. लेखक आणि वाचक यांच्यातील संवादाचा पूल बांधण्याचा प्रयत्न केला. ‘ग्रंथाली’ला मुंबई महापालिकेच्या शाळेमध्ये जागा देण्यात आली होती. परंतु शिक्षणाशिवाय इतर क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या संस्थांच्या कार्यालयाला सील ठोकण्यात आले. आमदार आशिष शेलार यांच्या मध्यस्थीनंतर आठवड्याची मुदत दिली असली तरीही पुढे काय हा प्रश्न आहेच. सरकारची स्थानिक स्वराज्य संस्थांची सांस्कृतिक क्षेत्राप्रति काही जबाबदारी असते, याचे भान संबंधितांना राहिलेले नाही त्याचमुळे ग्रंथालीसारख्या संस्थेचे कार्यालय सील करण्यापर्यंत मजल जाऊ शकते. अलीकडे महाराष्ट्र सरकारने मराठी पुस्तक विक्रीसाठी पाचशे ते एक हजार चौरस फुटांचा गाळा अत्यल्प भाड्याने देण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रंथालीने त्या अनुषंगानेही पाठपुरावा केला, परंतु त्यांना यश आले नाही. त्यामुळे सरकारचा हा निर्णय वरवरचा आणि आपण मराठीसाठी काहीतरी करतोय हे दाखवण्यापुरता आहे, हे लक्षात येते. ग्रंथालीने अनेक महत्त्वाची पुस्तके रास्त किंमतीमध्ये उपलब्ध करून दिली, मराठी ग्रंथप्रसारासाठी एक संस्था चार दशकांहून अधिक काळ सातत्यपूर्ण कार्य करते, हे उल्लेखनीय आहे. साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रात दीर्घकाळ काम करणाऱ्या अशा अनेक संस्था राज्यभर आहेत. त्यांच्या संदर्भातही काही धोरणात्मक निर्णय होण्याची गरज आहे. दुसरे असे की ग्रंथाली जगायला पाहिजे, टिकायला पाहिजे यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही, परंतु चाळीस वर्षे कार्यरत असलेल्या संस्थेने स्वत:च्या हक्काच्या जागेत जाण्यासंदर्भातील विचार का केला नाही? असा प्रश्नही उपस्थित होतो. जागा उपलब्ध न झाल्यास संस्था बंद करण्यात येईल, असा ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंग्लासपूरकर यांनी व्यक्त केलेला उद्वेग स्वाभाविक असला, तरी तो समंजस म्हणता येणार नाही. महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांची नावे ग्रंथालीशी जोडली गेलेली आहेत. त्यांनीही ही दूरदृष्टी दाखवू नये हे

आश्चर्यकारक आहे. त्यांनी आवाहन केले असते, तर मराठी जनता ग्रंथालीच्या मागे उभी राहिली असती. अजूनही उभी राहू शकते. राज्यकर्ते करंटे असले, तरी मराठी समाज चांगला गोष्टींच्या मागे उभा राहतो. 'ग्रंथाली'ला चार दशके त्याचे प्रत्यंतर येतच आहे!

## ✍ 'अनुराग'

दोनच व्यक्तिरेखा, तब्बल १८ हजार ५०० फुटांवरील लेह लडाखला केलेलं चित्रीकरण, अभिनेत्री मृण्मयी देशपांडेचा प्रस्तुतकर्ता म्हणून पहिला प्रयत्न अशा अनेक कारणांनी 'अनुराग' या सिनेमाविषयी उत्सुकता निर्माण झाली. पती-पत्नीच्या नात्यावर वेगळ्या पद्धतीनं भाष्य करणारा हा सिनेमा ११ मार्चपासून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

लग्नानंतरच्या एका टप्प्यावर पती-पत्नीच्या नात्यात होणारी घुसमट, त्यावर त्यांनी काढलेला मार्ग या आशयसूत्रावर 'अनुराग' घेतला आहे. आतापर्यंत पती-पत्नीच्या नात्याचा वेध अनेक सिनेमांतून घेण्यात आला असला, तरी त्या पलीकडे जाऊन या नात्याविषयी वेगळ्या पद्धतीने विचार या सिनेमात करण्यात आला आहे. सिनेमाचे लेखन आणि दिग्दर्शन डॉ. अंबरीश दरक यांनी केले आहे. मृण्मयी देशपांडे आणि धर्मेंद्र रोहिल यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. गेली पंचवीस वर्षं अनेक सिनेमा चित्रीत केलेले अनुभवी छायालेखक सुरेश देशमाने यांनी लेह लडाखचा अप्रतिम निसर्ग टिपला आहे. मृण्मयी देशपांडे यांनी सिनेमाचे सहदिग्दर्शन केले आहे. गुरू ठाकूर यांनी गीतलेखन, समीर म्हात्रे यांनी संगीत पार्श्वसंगीताची जबाबदारी निभावली आहे. आरआरपी कॉर्पोरेशन लिमिटेडची निर्मिती असलेला हा चित्रपट मृण्मयी देशपांडे क्रिएशन्सनं प्रस्तुत केला आहे.

पती-पत्नीच्या नात्याचे पदर उलगडणाऱ्या या सिनेमात दोन व्यक्तिरेखा आहेत. समुद्र सपाटीपासून तब्बल १८ हजार ५०० फूट उंच असलेल्या लेह-लडाख इथे या सिनेमाचं चित्रीकरण करण्यात आलं आहे. चित्रीकरणावेळी अचानक होणाऱ्या बदलांना तोंड देत, शारीरिक क्षमतेची कसोटी पाहात लेह लडाखच्या नितांत सुंदर निसर्गानं सिनेमात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. उच्च निर्मितीमूल्ये आणि उत्तम आशय यांचा मिलाफ 'अनुराग' मध्ये पहायला मिळतो.

कलाप्रेमी व उत्तम वाचक असलेले डॉ. अंबरीश दरक प्रख्यात आय

स्पेशालिस्ट आहेत. 'मेडिकल प्रॅक्टिस करताना मेड फॉर इच अदरपासून पूर्णपणे स्वतंत्र अशी अनेक जोडपी भेटली. त्यातील बहुतेकांना नात्यांचा उबग आल्याचं जाणवत होतं. लग्नानंतर एका टप्प्यावर आल्यावर प्रेम संपतं कसं, नात्यात अपुरेपणा का निर्माण होतो, असे प्रश्न पडू लागले. या बदलणाऱ्या नात्याविषयी काहीतरी करावं, या नात्यांचा पुन्हा एकदा शोध घ्यावा असं वाटत होतं. त्यामुळे सिनेमा करण्याचा निर्णय घेतला,' असं डॉ. दरक यांनी सांगितलं.

'सिनेमाची कथा मला खूपच आवडली. अभिनय करण्याच्या निमित्तानं या सिनेमाशी जोडली गेले. या सिनेमाच्या प्रत्येक टप्प्यावर या टीमशी नातं घट्ट होत गेलं. त्यामुळे अभिनय करण्यापलिकडे जाऊन सिनेमाची प्रस्तुती करण्याचं ठरवले.' अशी भावना मृण्मयी देशपांडे यांनी व्यक्त केली.

## ✍ वैवाहिक नात्याचा उभा छेद

चित्रपटासारख्या भव्य अवकाशात एक वा दोन व्यक्तिरेखांभोवती गोष्ट रचणं तसं आव्हानात्मक असतं. या माध्यमाची नेमकी बलस्थानं ओळखून प्रेक्षकांना पुरतं गुंगवून टाकणारं काहीतरी पडद्यावर अवतरलं, तर आणि तरच हा प्रयोग यशस्वी होतो. हॉलिवूडपटात असे प्रयोग खूपदा झालेत. 'कास्ट अवे' हे याचं मोठं उदाहरण. शिवाय 'बीफोर सनराइज', 'बीफोर सनसेट' आणि 'बीफोर मिडनाइट' ही आणखी काही उदाहरणं. मराठीत मुंबई-पुणे-मुंबई'मध्ये दोन व्यक्तिरेखांभोवती गोष्ट गुंफण्यात आली. आता बऱ्याच दिवसांनी डॉ. अंबरीष दरक यांनी हे आव्हान स्वीकारून 'अनुराग' बनवला आहे. चित्रपट खिळवून ठेवण्यासाठी लेह-लडाखच्या लोकेशन्सचा मोठा हातभार लागला आहे. अभिनयाच्या पातळीवरही चित्रपट तरतो, पण अभाव जाणवतो तो चित्रपटाच्या पटकथेत. दोन व्यक्तिरेखा असल्याने पटकथेत येणारा प्रत्येक प्रसंग, त्यातले संवाद कमालीचे सशक्त असायला हवे होते. नात्याचा थांग लागणं अपेक्षित नसलं तरी, त्याची खोली अशा प्रसंगांतून दिसायला हवी होती. ती नसल्यामुळे अनुरागमध्ये पती-पत्नीच्या नात्याची स्थिती आणि त्यावरचं चर्चानाट्य इतकंच दिसत राहतं.

'अनुराग'चा विषय रंजक आहे. प्रत्येक घरात दिसणारा, लग्न होऊन दहा वर्षं उलटून गेलेल्या जोडप्याच्या नात्याची ही गोष्ट आहे. घर सुखवस्तू असूनही दोघांमध्ये विसंवाद आहे. दोघांचा एकमेकांवर जीव असूनही

नवं कोरे


# डिनायल

## अ मेमॉइर ऑफ टेरर

**मूळ लेखक** - जेसिका स्टर्न

**अनुवाद** - मैत्रेयी जोशी

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**




'Terrorism is a psychological warfare' असं म्हणणारी जेसिका स्टर्न, आंतरराष्ट्रीय ख्यातीची दहशतवादतज्ज्ञ आणि विरोधाभास असा की, हीच दहशत तिला स्वत:ला अगदी कोवळ्या वयात अनुभवावी लागली – गनपॉइंटवर केलेल्या बलात्काराच्या रूपानं!

तीनहून अधिक तपं या दहशतीची वेदना ती नाकारत राहिली; एका कर्तव्यदक्ष पोलीस ऑफिसरनं तिची केस पुन्हा हातात घेईपर्यंत. एकीकडं PTSDची लक्षणं (आघातोत्तर तणाव विकृती) तर दुसरीकडं कर्तृत्वाची उंच भरारी; अशा दोन पातळ्यांवर तिचं जीवन पुढं जात राहिलं. पण तिच्यातल्या संशोधकानं आपल्या बलात्काऱ्याचा अभ्यास करण्याची चालून आलेली ही संधी वाया नाही घालवली. आपला गुन्हेगार ब्रायन बीट, याच्या मित्रपरिवाराच्या तिनं मुलाखती घेतल्या. ब्रायन बीट जिथं राहत होता ते घर ती बघून आली. इतकंच नाहीतर स्वत:चं कुटुंब, स्वत:चं मन यांचं परिशीलन तिनं केलं आणि त्यातून साकारलं हे पुस्तक... एका धाडसी विषयाचा तितकाच मनमोकळा आढावा घेणारं हे पुस्तक मनाच्या अथांग डोहात डोकावण्याची जिज्ञासा असणाऱ्या प्रत्येक वाचकासाठी! पण, लेखिका तेवढ्यावरच थांबत नाही. जाता-जाता ती सावधतेचा इशाराही देते. बलात्कारासारख्या अत्यंत घृणास्पद गुन्ह्याला समाज पटकन विसरून जातो; त्या गुन्ह्याच्या गांभीर्याचा अस्वीकार करतो आणि त्याचे परिणाम त्या समाजाला तसेच पुढच्या पिढ्यांनाही भोगावे लागतात.

एकमेकांच्या अपेक्षांना दोघेही अपुरे पडले आहेत. विकोपाला जाणारं हे नातं सांधण्यासाठी हे दोघे लेहला आलेत. लग्नानंतर नव्या नात्याची सुरुवात त्यांनी इथूनच केली होती. जुन्या आठवणींच्या साक्षीने सध्या अशक्त झालेल्या नात्याला संजीवनी देण्याच्या प्रयत्नातूनच 'अनुराग' उलगडतो.

याचं 'कथाबीज चांगलं आहे. या चित्रपटावर 'बीफोर मिडनाइट'चा प्रभाव जाणवतो. दहा वर्षं एकत्र घालवल्यानंतर हळूहळू येत जाणाऱ्या विमनस्क मानसिकतेचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न यातून दिसतो. मात्र, तो प्रयत्न होताना दोघांमध्ये घडून गेलेल्या ज्या प्रसंगांमुळे एकमेकांची मनं कळत नकळत दुखवली, दुरावली आहेत, त्याचे दाखले नीटसे दिले गेलेले नाहीत. पटकथेत पत्नी सौम्याच्या मानसिकतेमागची कारणं मिळत जातात; पण पती ऋषभची होणारी घुसमट, त्याने घेतलेल्या निर्णयांमागची त्याची मानसिकता समोर येत नाही. परिणामी ही पटकथा 'तिच्या' कडे झुकू लागते. विमानातून उतरल्यानंतर ऋषभ सौम्याला एकटी सोडून गाडीत बसायला जातो हे दोघांमधला दुरावा स्पष्ट करतं; पण जर नात्याला संजीवनी देण्यासाठी ही ट्रीप असेल, तर त्याचं 'असं' वर्तन तितकं लॉजिकल नाही. अशाने त्याच्या व्यक्तिरेखेची 'शेड' विनाकारण काळवंडते. प्रसंग वरवरचे ठरल्यामुळे यातले संवाद मॅच्युअर असले, तरी ते इम्प्रुवाइज्ड वाटतात. शिवाय दहा वर्षं एकत्र संसार घालवल्यानंतर दोघांमध्ये येणारी ओसाड मोकळीक... किंवा गृहीत धरण्यातून येणारी बळजबरी... इथे दिसत नाही. यातून कदाचित चर्चेपलीकडे जाणारा अनपेक्षित संघर्ष मिळाला असता.

मृण्मयी देशपांडे आणि धर्मेंद्र गोहिल या दोघांचाही स्क्रीन प्रेझेन्स अचूक आहे. मृण्मयीला या भूमिकेत दोन भिन्न मानसिकतेची सौम्या रंगवण्याची संधी तिने अचूक हेरली आहे. सुरेश देशमाने यांच्या छायांकनामुळे लेह हे यातलं तिसरं कॅरेक्टर बनलं आहे. पार्श्वसंगीतासह 'पोळले पाऊल म्हणते' ही गीतरचनाही उत्तम. एकुणात या सर्व टीमने प्रामाणिक प्रयत्नातून हा चित्रपट बनवला आहे. चित्रपटासाठी आवश्यक असलेल्या संहितेवर आणखी बारीक काम झालं असतं, तर 'अनुराग'मध्ये दडलेल्या खोलीचा साक्षात्कारही झाला असता.

## ✍ डॉ. कनक रेळे यांची 'कनक' साधना

पौराणिक कथेत नेहमीच दुय्यम महत्त्व दिल्या गेलेल्या व वेळप्रसंगी

बंडखोरी करणाऱ्या पात्रांना सध्याच्या काळात शास्त्रीय नृत्याच्या माध्यमातून बोलते करण्याचे श्रेय 'नालंदा नृत्य संशोधन केंद्रा'च्या संस्थापिका व संचालिका डॉ. कनक रेळे यांच्याकडे जाते. महाभारतातील अंबा, द्रौपदी व गांधारी या व्यक्तिरेखांवर झालेला अन्याय लक्षात घेता शास्त्रीय नृत्यातून हे सामाजिक भान जपणे महत्त्वाचे आहे. या भावनेतून त्यांनी सुमारे २१ वर्षांपूर्वी पौराणिक पात्रांना नृत्यातून बोलके करणाऱ्या कार्यक्रमाची निर्मिती केली. त्यांनी देशविदेशांमध्ये आपल्या नृत्याच्या माध्यमातून हा विषय लोकांपर्यंत पोहोचवला आहे. यंदा 'नालंदा'चे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून यानिमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात 'अ-निती' शीर्षकाखाली पौराणिक पात्र नृत्यातून सादर करण्यात आली. एकलव्य व नंदनार या नव्या व्यक्तिरेखांची भर या कार्यक्रमात टाकण्यात आली आहे.

कनक रेळेंनी ५० वर्षांपूर्वी 'नालंदा नृत्य संशोधन केंद्रा'ची स्थापना केली. नृत्यामध्ये अभ्यास आहे. साधना आहे. हा फक्त तुमच्यातील अतिरिक्त गुण नसून नृत्य शिकवण्यासाठी समर्पणाची भावना असावी लागते हा मूलमंत्र घेऊन फक्त नृत्याला समर्पित संस्था उभी करण्यासाठी कनक रेळेंना खूप कष्ट करावे लागले. नृत्य ही स्वत:ला व्यक्त करण्याची भाषा असून त्यात अदाकारी आणि तितकीच परिपक्वताही आहे. १९७२ साली मुंबई विद्यापीठात नृत्यावर स्वतंत्र पदवी सुरू करण्यासाठी सर्वांचा विरोध होता. वेश्यांसाठी पदवी सुरू करीत असल्याची वाईट प्रतिक्रियाही त्यांना ऐकावी लागली होती. मात्र नृत्यावरील प्रेमाखातर नृत्य हा अभ्यासाचा विषय म्हणून मुंबई विद्यापीठात रुजू करण्यासाठी रेळे यांनी पाठपुरावा केला. गरीब घरातल्या नृत्यप्रेमी मुलींसाठी नृत्य शिकण्यासाठीचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी त्यांनी 'नालंदा केंद्रा'चे शुल्कदेखील कमी ठेवले आहे. त्यामुळे आजही या संस्थेत आदिवासी भागातील कित्येक मुली नृत्याच्या प्रेमाखातर शिकण्यासाठी येतात. शिक्षणाचा गंध नसलेल्या या मुली 'नालंदा' मधून नृत्य शिकून आपल्या गावामध्ये नृत्याची शाळा सुरू करण्याची इच्छा व्यक्त करतात. या केंद्रात प्रशस्त अभ्यासिका व ग्रंथालयदेखील आहे. या व्यतिरिक्त या केंद्रात योगा व संस्कृतचे शिक्षणही दिले जाते. 'नालंदा नृत्य संशोधन केंद्रा'स थेट भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान खात्याकडून वैज्ञानिक व औद्यागिक संशोधन केंद्र म्हणून ओळख मिळाली आहे. भारतामध्ये शास्त्रीय नृत्यामध्ये 'पीएचडी' करणाऱ्या कनक रेळे या पहिल्या महिला आहेत.

वयाच्या सहाव्या वर्षांपासून त्यांनी 'कथकली' या शास्त्रीय नृत्याचे शिक्षण घेतले. पुढे कायद्याची पदवी मिळविली. इंग्लंडमध्ये जाऊन 'आंतरराष्ट्रीय कायदा' या विषयात शिक्षण घेतले. पण कायद्याच्या क्षेत्रात मन न रमल्याने त्यांनी नृत्य हेच ध्येय ठेवले. त्यांनी 'मोहनी अट्टम' या नृत्य प्रकाराचेही शिक्षण घेतले आहे. भारत सरकारकडून त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले. वयाची ८० ओलांडल्यानंतरही त्या नृत्य शिकणाऱ्या अनेक पिढ्या तयार करण्यात व्यग्र आहेत. नृत्याच्या वाढत्या खासगी शिकवणीबाबत त्या खंत व्यक्त करतात. नृत्याचे अभ्यायपूर्ण शिक्षण न घेता या शिकवणीतून पुढच्या पिढीपर्यंत नृत्याचे महत्त्व पोहोचत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे फक्त मनोरंजनापेक्षा सादरीकरणाची श्रेष्ठ कला म्हणून नृत्याकडे पाहिले जावे यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमाची जोड देणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

## ✍ स्पेक्ट्रमवर सेवाकर लावण्याचा केंद्राचा प्रस्ताव

आगामी आर्थिक वर्षांत मोबाइल कॉल दर वाढण्याची भीती 'द सेल्युलर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडिया' (सीओएआय) या संस्थेने व्यक्त केली आहे. मोबाइल ध्वनिपटावर (स्पेक्ट्रम) सेवाकर लावण्याचा प्रस्ताव केंद्रीय अर्थ मंत्रालयातर्फे ठेवण्यात आला असून हा बोजा मोबाइल कंपन्या ग्राहकांवर टाकणार हे उघड आहे. याचा थेट परिणाम म्हणून मोबाइल कॉल महाग होतील.

सेवाकरात वाढकरण्याच्या अर्थ संकल्पीय प्रस्तावामुळे मोबाइल सेवा देणाऱ्या कंपन्यांवर ७७ हजार कोटी रुपये कराचा बोजा पडणार आहे. हा बोजा या कंपन्या ग्राहकांवर टाकणार हे उघड आहे. त्यामुळे नव्या आर्थिक वर्षात मोबाइल कॉलदर वाढतील अशी भीती द सेल्युलर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (सीओएआय) व्यक्त केली आहे. मोबाइल कॉलदर वाढल्यास याचा फटका केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी डिजिटल इंडिया या मोहिमेलाही बसू शकतो. त्याचप्रमाणे यामुळे सर्वसमावेशक आर्थिक विकासामध्येही अडथळे येऊ शकतात. १ एप्रिलपासून सर्व सरकारी सेवांवरही सेवाकर लागू होणार आहे. हा सेवाकर या सेवांचा लाभ घेणाऱ्या व्यक्तीने, अर्थात सामान्य नागरिकाने भरायचा आहे. अशा प्रकारे सेवाकरांचा भार नागरिकावर टाकल्यास सर्वच प्रकारच्या दूरसंचार सेवा महागतील.

सेवाकर आकारणीच्या प्रस्तावाचा पुनर्विचार करण्याबरोबरच सरकारने दूरसंचार कंपन्यांवरील आयकराच्या बोज्याचाही विचार करावा, अशी मागणी 'सीओएआय'ने केली आहे.

मोबाइल कॉलदर वाढल्यास त्याचा फटका देशभर येऊ घातलेल्या फोरजी सेवेलाही बसू शकतो. रिलायन्स जिओ, एअरटेल यासारख्या कंपन्यांनी फोरजी सेवा देणे सुरू केले आहे. नव्या तंत्रज्ञानाला लोकाभिमुख करताना या कंपन्यांना प्रयत्न करावे लागत आहेत. नवा ध्वनिपट खरेदी करणे हे यासाठीही आवश्यक आहे. असे असताना सेवाकर आकारला गेल्यास फोरजीही महाग होईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

केंद्र सरकारतर्फे ध्वनिपटाचा लिलाव जून व जुलै महिन्यात होईल. त्यासाठी राखीव किंमत ५.३६ लाख कोटी रुपये ठेवण्यात आली आहे. हा ध्वनिपट खरेदी करण्यासाठी सेवाकर गृहीत धरल्यास मोबाइल कंपन्यांना आणखी ७७ हजार कोटी रुपये यासाठी द्यावे लागतील. आधीच कर्जात असलेल्या मोबाइल कंपन्यांवर हा अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार असल्याचा दावा सीओएआयने केला आहे. अशा प्रकारे सेवाकर आकारण्यासाठी सरकारने वित्त विधेयक, १९९४च्या ६६इ कलमांतर्गत तरतूद केली आहे.

## ✍ संगीतोपचारातून व्यसनमुक्ती व्याख्यान

'कृपा फाउंडेशन'च्या व्यसनमुक्ती केंद्रामध्ये गौरी कुलकर्णी यांचे संगीतोपचारावर प्रात्यक्षिकासह व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्यसन ही लागलेली सवय असते. आणि संगीताच्या विविष्ट वापरातून ती सुटू शकते. या सूत्रावर आधारित त्यांचे व्याख्यान झाले. मनाचे शुद्धीकरण, केंद्रीकरण आणि सांत्वन या संगीतोपचारांच्या तीन टप्प्यांमधून उपस्थितांना सहभागी करून घेत हे व्याख्यान झाले. समुपदेशक सुरेश पिल्ले यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## ✍ काव्यवाचनाने मराठी भाषा दिन साजरा

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या श्रीमती हिराबेन नानावटी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च फॉर वुमेन या संस्थेमध्ये मराठी भाषा दिन साजरा झाला. प्रसिद्ध कवयित्री हेमा लेले यांनी 'एक मैफल कवितेची' या

कार्यक्रमामध्ये काव्यवाचन केले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जगदीश पोळ यांनी कुसुमाग्रज यांची 'कणा' आणि मंगेश पाडगावकर यांची 'बोलगाणी' या कविता वाचून दाखविली. विद्यार्थिनी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कवितांचे सादरीकरण केले. प्राची आंबेगावकर आणि स्नेहल सावडतकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गीता जाधव, प्रा. प्रशांत मामर्डे, डॉ. कमलाकर मुंडे, प्रा. विकास देशपांडे आणि प्रा. गणेश लोटके यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## ✍ मातृभाषा दिन

'युनेस्को'तर्फे साजरा करण्यात येणारा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन यंदा २१ फेब्रुवारीऐवजी ३ मार्चला साजरा केला गेला. हा दिन साजरा करण्याचे आदेश महाविद्यालय आणि शाळांना देण्यात आले. या दिवशी मातृभाषेवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच सामान्य ज्ञान, व्याकरण आणि अनुवाद स्पर्धा आयोजित करण्यात येतात. राज्यातील सर्व कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयासोबत विद्यापीठ, महाविद्यालयांतील मराठी, हिंदी, गुजराती, कन्नड आदी भाषा विभागाकडून मातृभाषेतील शिक्षणाचे फायदे आदी विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला.

## ✍ 'कोसला' आणि 'देखणी'चे माध्यमांतर

'पांडुरंग सांगवीकर' हे नाव वाचल्यानंतर भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' कादंबरीची आठवण होणारच. खेड्यातून आलेल्या आणि पुण्यात शिकणाऱ्या तरुणाची ही आत्मकथा आहे.

'कोसला' ही नेमाडे यांची पहिली कादंबरी. त्यांच्या वयाच्या २५व्या वर्षी ती प्रकाशित झाली. पांडुरंग सांगवीकर या नायकाची आत्मकथा नेमाडे यांनी त्यात मांडली. नैतिकतेच्या आधारावर बाप, गाव सगेसोयरे यांना हा नायक नाकारतो. अशा व्यक्तिमत्त्वावरील कथा असलेली 'कोसला' ही कादंबरी प्रस्थापित कादंबऱ्यांचे स्वरूप, विषय भाषाशैली, संकल्पना अशा सर्वांना दूर ठेवणारी ठरली. त्यामुळे ही कांदबरी सर्वसाधारण मराठी वाङ्मय प्रवाहाच्या बाहेरील कलाकृती मानली जाते. त्यातील नायकावर आता नाट्याविष्कार पाहायला मिळणार आहे. यात नेमाडे यांच्या 'देखणी' संग्रहातील कविताही ऐकायला मिळणार आहेत.

सतीश आळेकर, डॉ. राजीव नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या 'कला केंद्र' आणि 'सारा क्रिएशन्स' या संस्थांतर्फे हा नाट्याविष्कार नवी पिढी सादर करणार आहे. यात पद्मनाभ बिंड या कलाकाराने पांडुरंगाची व्यक्तिरेखा साकारली आहे. आशिष नरखेडकर, पूर्णानंद वांढेकर, आनंद प्रभू, विक्रांत बदरखे, कल्याण पाटील यांच्याही यात महत्त्वाच्या भूमिका आहेत. मंदार देशपांडे यांनी दिग्दर्शन केले.

नरखेडकर म्हणाले, "कोसला या कादंबरीला मराठी साहित्यात मानाचे स्थान आहे. 'कोसला'त स्वत:च्या अस्तित्वाचे भवतालाशी आणि परंपरेशी असलेले नाते समजून घेण्याचे उत्कट प्रयत्न आहे आणि जगण्याचे मूल्य सर्वोच्च मानणाऱ्या नायकाचा पराभव कबूल करणे हेही आहे. हा सर्व नाट्यमय प्रवास एका बाजूला, तर दुसरा बाजूला नायकाच्या जीवनातील प्रसंगाचा अनुभव अधिक गहिरा करणाऱ्या नेमाडे यांच्या कविता आहेत. त्या 'देखणी'मधून घेण्यात आल्या आहेत. या सर्वांचा मिलाफ म्हणजे हा नाट्याविष्कार आहे. एकाच लेखकाच्या दोन वेगवेगळ्या माध्यमातील कलाकृती तिसऱ्याच एका माध्यमात पाहण्याची संधी मिळणार आहे. या सादरीकरणाला स्वत: नेमाडे यांनी संमती दर्शवली आहे. कादंबरी कवितांना कुठेही धक्का न लावता हा प्रयोग सादर करत आहोत."

## ✍ बहारदार रिमेक- पिंजरा २

एखादी चांगली कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी वाकबगार मंडळी एकत्र आली, तर चांगली कलाकृती घडू शकते. 'पिंजरा'सारखी मराठीतील माइलस्टोन कलाकृती नव्या तंत्रात नव्या अंदाजात येत असल्यानं 'पिंजरा'च्या स्मरणरंजनाचा आगळा आनंद प्रेक्षकांना घ्यायला मिळाला आहे.

डॉ. श्रीराम लागू, संध्या, निळू फुले यांच्या जबरदस्त अदाकारीनं नटलेला 'पिंजरा' राज्यभरातील सिनेमागृहात दाखल झाला आहे. डॉल्बी साउंड सिस्टिम आणि इतर आधुनिक तंत्राची जादू घेऊन सज्ज झालेला या सिनेमाने पुन्हा प्रेक्षकांच्या मनावर गारूड केले आहे. पुरुषोत्तम लड्डा आणि चंद्रसेना पाटील यांच्या 'पुष्पक प्रियदर्शनी फिल्म्स'नं हा सिनेमा सादर केला आहे.

वेगळा प्रयोग करताना त्यासाठी अनेक गोष्टींचा तपशीलवार विचार करावा लागतो. 'पुष्पक प्रियदर्शनी फिल्म्स'नं व्ही. शंताराम प्रॉडक्शनकडून

किरण शांताराम यांच्या सहकार्यानं वितरणाचे हक्क घेत प्रसाद लॅबमध्ये या सिनेमाच्या ओरिजिनल प्रिंटवर प्रक्रिया करत तिचं २ के स्कॅनिंग करून नवी अद्यावत प्रिंट तयार केली आहे. हँड क्लिनिंग, अल्ट्रासॉनिक क्लिनिंग, २ के स्कॅनिंग, ऑडिओ ग्रॅबिंग, कलर ग्रेडिंग, ऑडिओ रिस्टोरेशन अश नानाविध तांत्रिक प्रक्रिया करून या अभिजात कलाकृतीला आधुनिकतेचा नवा साज चढवला आहे.

'पिंजरा' सिनेमातील 'आली ठुमकत नार लचकत', 'छबीदार छबी', 'तुम्हांवर केली मी मर्जी बहाल', 'मला इष्काची इंगळी डसली', 'दिसला ग बाई दिसला', 'कशी नशिबानं थट्टा', 'दे रे कान्हा चोळी लुगडी' या गाण्यांतील गारूड आजही तितकंच आहे. खेबुडकरांचे विलक्षण आशयपूर्ण शब्द आणि रामभाऊंच्या अस्सल मराठमोळ्या ठसक्याच्या चालींना आधुनिक पार्श्वसंगीताची किनार देत संगीतकार अविनाश-विश्वजीत यांनी अद्यावत वाद्यवृंदासह या गाण्यांना नवा मुलामा दिला आहे. संवाद, गाणी, पार्श्वसंगीत, तांत्रिक बाबी या महत्त्वपूर्ण गोष्टींचं विभाजन करत त्यात काही बदल करण्यात आला आहे. सिनेमाचा मूळ मोनो ऑडिओ हा आता ५.१ करण्यात आला आहे.

अफाट लोकप्रियता मिळालेला हा सिनेमा नव्या पिढीनं पाहावा यासाठी केलेला हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

## ✍ जुन्या नाटकांचे पुनरुज्जीवन

सेल्फी काढणाऱ्या पिढीसमोर जुन्या नाटकांच्या प्रतिमांमधून तत्कालीन 'स्व'चा विचार मांडणे नाट्यशास्त्राच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे असल्याचे मत ज्येष्ठ सिने आणि नाट्य अभ्यासक समर नखाते यांनी व्यक्त केले. हल्ली नाटकांच्या रिमेकमधून त्याचा समकालात पुनर्शोध घेण्याऐवजी नुसतीच रोमँटिक, फँटसाइज्ड मांडणी करण्याचा प्रयत्न होतो. अशा अभ्यासातून जुन्या नाटकांचा कलात्मक संदर्भ नव्याने शोधणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातर्फे 'तीन नाटककार' या विषयावर दोन दिवसांच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. नखाते यांच्या प्रमुख विद्यापीठाच्या नामदेव सभागृहामध्ये या चर्चासत्राचे उद्‌घाटन झाले. या चर्चासत्राच्या माध्यमातून श्याम मनोहर, चं.

प्र. देशपांडे आणि दिलीप जगताप या तीन नाटककारांवर व्यापक चर्चा झाली. समांतर आणि प्रायोगिक रंगभूमीवर कार्यरत या तिन्ही नाटकारांनी राज्यात अणि रंगभूमीला एक वेगळी ओळख मिळवून देण्यासाठी भरीव कार्य केले आहे. या नाटककारांच्या नाटकाकारांविषयीची चर्चा केवळ साहित्यिक पातळीपुरती मर्यादित न राहता नाट्यशास्त्राच्या विविध अंगांना स्पर्श करणारे व्हावे, त्या विषयी विचारमंथन व्हावे, म्हणून आयोजित हे चर्चासत्र विशिष्ट कालखंडातील कलाकृतींचा विचार करताना त्या कलाकृतींशी आपले नाते कशा प्रद्धतीने जोडले जाते ते महत्त्वाचे ठरते. चर्चासत्रासाठी निवडलेले तिन्ही नाटककार आपल्या आजूबाजूच्या स्थित्यंतराविषयी आपल्या सादरीकरणातून बोलत होते. त्यांच्यास या सादरीकरणाचा नव्याने अभ्यास होणे गरजेचे आहे. अशा अभ्यासातून अधिक सम्यक आणि अधिक समजूतदार पद्धतीने नाटके नव्या पिढीसमोर येणे गरजेचे आहे.' डॉ. प्रवीण भोळे यांनी स्वागत केले. केंद्राच्या प्रमुख डॉ. शुभांगी बहुलीकर यांनी प्रास्ताविक केले.

''रंगभूमी, समूहव्यवस्था, नाट्यऊर्जा यांची नवी मिती शोधणे आज गरजेचे आहे. नाटक त्या-त्या काळात लिहिले गेले असले, तरीही ते त्या काळापुरते राहू नये. त्याचा समकालीन संदर्भातून पुनर्शोध घेण्याचा प्रयत्न व्हायला हवा. त्यातील अंत:प्रवाह नव्याने शोधले जायला हवेत नवनव्या प्रयोगांसाठी नवी मांडणी आणि प्रसंगी काही प्रमाणात विविध संकल्पनांची मोडतोड करून पाहणेही आवश्यक ठरते,'' असे मत नाट्य व सिनेअभ्यासक समर नखाते यांनी व्यक्त केले.


नखाते म्हणाले, ''कलाकाराच्या विविध जीवनानुभवांची मांडणी त्याच्या कलाकृतीत असते. त्याचे मंथन होणे गरजेचे ठरते. त्यातूनच जे हाती येते, ते जीवनभान पुढील पिढीपर्यंत पोचवणे आणि त्यास समकालीन जीवनभानाशी जोडले जाणे महत्त्वाचे असते.''

''नाट्यकृती, त्यातील विविध संदर्भाचे अंत:स्थ मुद्दे, मुख्य नाट्यआशय, त्यातील जीवनदृष्टी, प्रयोग रूपांची आव्हाने, शब्दव्यवहार... अशा सर्व बाबींचा विचार नाट्यकलेच्या सादरीकरणाच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. कलाकाराचे कलेतील योगदान आणि त्याचे मूल्य हे त्याच्या लिखित कलाकृतीवर करावे, की त्यावर आधारित प्रयोगकृतींवर करावे, याचाही विचार होणे आवश्यक आहे.''

**नवं कोरे**

‘अ किडनॅप्ड माइंड’
या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद

# एका मातेचा लढा




**मूळ लेखक** - पॅमेला रिचर्डसन

**सहलेखक** - जेन ब्राऊलेट

**अनुवाद** - सुषमा जोशी

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

आईचा आपल्या मुलाबद्दलचा शोक आणि ‘पालक दुराव्याची लक्षणे’ (पॅरेन्टल एलिनेशन सिंड्रोम – पी.ए.एस.) सांगणारी ही दुपदरी कहाणी आहे. १९८५ मध्ये डॉ. रिचर्ड गार्डनर यांनी ‘पीएएस’ प्रथम उजेडात आणला. मुलाबद्दलचा कस्टडीचा वाद आणि तदनुषंगाने मुलाला पढवणे, दुसऱ्या जोडीदाराबद्दल मुलाच्या मनात विष कालवणे (इतकं की, ते पढवलेले विचार शेवटी त्या मुलाला स्वत:चेच वाटू लागतात.) यामुळे त्या मुलाचे मानसिक संतुलन ढासळते. यालाच ‘पीएएस’ नाव दिले गेले. पॅमेला रिचर्डसनचा मुलगा डॅश हा त्याच्या वयाच्या पाचव्या वर्षापासून पीएएसपीडित होता. याला कारण त्याचा बापच होता. फोनवरचे निर्बंध आणि ॲक्सेसमध्ये आणलेले अगणित अडथळे याकडे दुर्लक्ष करून, ‘आपल्या आईने आपल्याला टाकून दिलं, तिने विश्वासघात केला,’ हे डॅशच्या मनावर हरतऱ्हेने बिंबवले गेले. आणि आठ वर्षांच्या डॅशने ठरवले की, आईकडे जाण्यासाठी त्याच्यावर बळजबरी करू नये. शेवटी तर त्याने आईला असेही सांगितले की,

‘जर आई कोर्टात गेली, तर तो तिचे तोंडही पाहणार नाही.’ यानंतरची आठ वर्षे डॅशचा बाप, न्यायव्यवस्था, मानसोपचार- तज्ज्ञ, शिक्षण व्यवस्था या साऱ्यांशी पॅमेला झुंजत राहिली. आपल्या मुलाचा त्याच्या बापापासून आणि शेवटी त्याचा त्याच्या स्वत:पासून बचाव करण्यासाठी झगडत राहिली.

## ✍ नारायणगावात फडमालकांचे २५० करार

महाराष्ट्रात तमाशा पंढरी म्हणून नावलौकिक असलेल्या नारायणगावातील विठाबाई नगरीत राज्यातील पस्तीस तमाशा फडमालकांनी रंगीबेरंगी आकर्षक राहुट्या उभारून यात्रा उत्सवासाठी तमाशा करारास सुरवात केली आहे. पहिल्या आठ दिवसांत पस्तीस फडमालकांचे सुमारे अडीचशे करार झाले आहेत.

दुष्काळी स्थिती व कांद्यासह इतर भाजीपाल्यांचे घटलेल्या भाव यांचा परिणाम करारावर झाला आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य तमाशा परिषदेचे अध्यक्ष संभाजी जाधव यांनी दिली. तमाशा ही महाराष्ट्राची लोककला आहे. करमणुकीच्या साधनात इलेक्ट्रॉनिक मीडियाचा वापर वाढल्याने तमाशा व्यवसायाला ओहोटी लागल्याचे दिसून येत आहे. तमाशा लोककला जिवंत ठेवण्यासाठी २००८ मध्ये राज्य सरकारने फडमालकांना सुमारे पाच लाख रुपयांचे तमाशा पॅकेज दिले होते. त्यानंतर या वर्षी नुकतेच फडमालकांना पहिल्या टप्प्यात दोन लाख रुपयांचे तमाशा पॅकेज दिले आहे. राज्यात तंबूचे व हंगामी असे सुमारे दोनशे फडमालक आहेत. तंबूच्या तमाशाचा हंगाम ऑक्टोबर ते फेब्रुवारी दरम्यान असतो. या कालावधीत हे फडमालक राज्याच्या ग्रामीण भागाचा दौरा करून तिकीट विक्रीद्वारे व्यवसाय करतात. इंटरनेट, मोबाईल, विविध चॅनेल आदी इलेक्ट्रॉनिक साधने अगदी ग्रामीण भागातही सहज उपलब्ध झाल्याने तमाशाकडे ओढकमी होत चालल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रतिकूल अवस्थेतही लोककला टिकवून ठेवण्याची फडमालकांची धडपड सुरू आहे. पुणे व नगर जिल्ह्यात मार्च ते मे दरम्यान यात्रांचा हंगाम असतो. या कालावधीत यात्रा, उत्सवानिमित्त ग्रामस्थ करमणुकीसाठी तमाशाचे कार्यक्रम ठेवतात. या निमित्ताने व्यवसायासाठी तमाशा फडमालक दरवर्षी मार्च ते मे दरम्यान नारायणगावात दाखल होतात.

## ✍ 'सर्वमंगल क्षिप्रा'चे प्रकाशन

''वाचकांची संख्या कमी झाली आहे, असे म्हणणे चुकीचे आहे. प्रत्यक्षात वाचकांपर्यंत पुस्तके पोचतात का हे पाहण्याची गरज आहे. प्रकाशन संस्थांच्या त्रुटींमुळे सकस लेखन वाचकांपर्यंत पोचत नसल्याने पुस्तकांना योग्य न्याय मिळत नाही,'' अशी टीका समीक्षक डॉ. द. दि. पुंडे यांनी केली.

प्रकाशक व पत्रसंग्राहक हरिभाऊ मोटे यांच्या आत्मचरित्रावरील पत्रांचे संपादन डॉ. अंजली सोमण यांनी 'सर्वमंगल क्षिप्रा' या पुस्तकाद्वारे केले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन 'पॉप्युलर प्रकाशन'चे प्रकाशक रामदास भटकळ यांच्या हस्ते झाले. सत्याग्रही विचारधारेचे सल्लागार डॉ. सप्तर्षी व लेखक मिलिंद जोशी, कवयित्री अंजली कुलकर्णी, प्रकाशक अरुण जाखडे, कल्याण काळे उपस्थित होते.

पुंडे म्हणाले,''वाङ्मयाची प्रक्रिया पुढील पिढ्यांपर्यंत पोचण्यासाठी लेखनाची कठोर समीक्षा झालीच पाहिजे. आजही तरुण-तरुणी पत्र वाङ्मयाचा अभ्यास करत आहेत. मात्र, लेखन व संपादनासाठी अधिक परिश्रम घेण्याची अभ्यासकांची तयारी नाही.''

जोशी म्हणाले, ''साहित्यविश्वात पूर्वी असलेला मोकळेपणा आता संपुष्टात आला आहे. मतभेदांचे रूपांतर मनभेदामध्ये होत असल्याने साहित्यविश्व हे प्रतिक्रियाशून्य झाल्यासारखे वाटते. हस्तलिखितांच्या संस्कारापासून ते निर्मितापर्यंतच्या प्रवासात प्रकाशकांची सर्जनशीलता महत्त्वाची असते.''

भटकळ म्हणाले, ''आणीबाणीच्या १९ महिन्यांच्या काळात वृत्तपत्रात न छापलेल्या आणि त्या काळाचा उलगडा करण्याचे काम दहा हजार पत्रांद्वारे करण्यात आले. त्या-त्या काळाशी सुसंगत असल्यामुळे अनेकदा त्या पत्रांचे अर्थ उलगडले नाहीत. आत्मचरित्रात खोटे लिहिले जात नसले, तरी असते ते पूर्ण खरे असते, असेही नाही. लेखकाने वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.'' सोमण यांनी मोटे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. अनिता मोडक यांनी पत्रांचे अभिवाचन केले.

## ✍ हिंदीवरून भांडणे नकोत

'जगातील अनेक देशांमध्ये हिंदी भाषा बोलली जात असताना भारतामध्ये मात्र हिंदी भाषेवरून भांडणे व राजकारण सुरू आहे. शासकीय कार्यालये किंवा अन्य ठिकाणी हिंदी किंवा प्रादेशिक भाषेतून काम होणे आवश्यक आहे, तरीही इंग्रजीचा अट्टहास केला जातो,' अशी टीका मुंबई विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी अध्यक्ष डॉ. रामजी तिवारी यांनी केली.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या पुणे विभागाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'हिंदीचे वैश्विक स्वरूप व शक्यता' या विषयावर 'राष्ट्रीय संगोष्ठी' या दोन

दिवसीय चर्चासत्राचे उद्‌घाटन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी महापौर प्रशांत जगताप, सभेचे अध्यक्ष उल्हास पवार, चंद्रदीप कवडे, पत्रकार प्रकाश दुबे, राजेंद्र हिमानी, डॉ. इशिरा व सभेच्या कार्याध्यक्ष डॉ. वीणा मनचंदा उपस्थित होते. 'विविध देशांमध्ये एक अब्ज तीस कोटी नागरिक हिंदी भाषा बोलतात, तिचा अभ्यास करतात. याकडे लक्ष वेधले. परदेशातील हिंदी भाषेबद्दलची सामाजिक व राजकीय उदासीनता दूर करण्याची गरज आहे.', असे मत डॉ. तिवारी यांनी मोडले.

'महात्मा गांधी यांनी हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून दर्जा मिळावा,' यासाठी प्रयत्न केला. 'शंकर देव, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, एस. एम. जोशी व डॉ. मोहन धारिया यांनी सभेच्या माध्यमातून गांधीजींचा विचार पुढे आणला,' असे पवार यांनी सांगितले.

'हिंदी भाषेचा सन्मान करण्याची गरज आहे. सभेने पुढाकार घेतल्यास मराठी साहित्य संमेलनाप्रमाणेच हिंदी साहित्य संमेलन करण्यास आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू', असे आश्वासन डॉ. पी. डी. पाटील यांनी दिले.

## ✍ स्त्री-पुरुष समानता चित्रपटांतही यावी

'स्त्री-पुरुष समानतेच्या गरजेचे गेल्या काही वर्षांत जे 'स्त्री-पुरुष स्पर्धेत' रूपांतर झाले आहे, त्याचा दोन्ही बाजूंनी पुनर्विचार करण्याची गरज आहे. 'तिला पुढे जाऊदे' म्हणण्यात जाणवणारा एक अपराधीपणा... आणि 'मला त्याच्यापेक्षा पुढे जायचंय' म्हणण्यातला नको तेवढा त्वेषमूलक सूर... यापलीकडे आपण जाणार आहोत की नाही?' असा सवाल अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी 'आयाम', 'आशय फिल्म क्लब' आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाने आयोजित केलेल्या सातव्या आंतरराष्ट्रीय महिला चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन प्रसंगी केला.

संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम, सतीश जकातदार, मनस्विनी प्रभुणे, मेधा शिंपी आदी उपस्थित होते. यंदा महिलांमधील धैर्यशीलतेला सलाम करणारे चित्रपट महोत्सवात दाखविण्यात आले.

सोनाली म्हणाली, ''महिलाही धडाडीच्या असतात आणि मनात आणले तर, कोणत्याही क्षेत्रात त्या आपला ठसा उमटवू शकतात, मात्र, असे असतानाही स्त्री आणि पुरुष हे परस्परांशिवाय अपूर्ण असल्याचे माझे

मत आहे. किंबहुना स्त्री-पुरुष एकमेकांच्या आयुष्यात आहेत, म्हणून आयुष्य हे पूर्ण आहे! या स्पर्धारहित वास्तवाचा स्त्री-पुरुष भेदाभेदापलीकडे जाऊन विचार व्हायला हवा.''

आपल्यातील जात्याच असणारी कोमलता आपण पुरुषांशी स्पर्धा करण्याच्या नादात मारून तर टाकत नाही ना, याचा आजच्या मुलींनी विचार करावा. आपण प्रत्येक ठिकाणी रणरागिणी व्हायची गरज आहे का? प्रत्येक गोष्ट केली पाहिजे, हा हट्ट का?... असे अनेक प्रश्न आपणच उपस्थित केले.

यावेळी आरजे स्मिता, आरजे अपूर्वा आणि आरजे श्रुती यांना पुरस्कार देण्यात आले. अभिनेत्री मेरिल स्ट्रिप अभिनित आणि ब्रिटनच्या पहिल्या महिला पंतप्रधान आधारित 'द आयर्न लेडी' चित्रपटाने सुरू झाला.

## ✍ भारतीय संशोधकांसाठी 'फेसबुक' ची शिष्यवृत्ती

सोशल नेटवर्किंग क्षेत्रातील अग्रगण्य 'फेसबुक' तर्फे 'बग बाउंटी' कार्यक्रमाअंतर्गत भारतातील संशोधकांना ४.८४ कोटी रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. सध्या देशात १४.२ कोटी फेसबुकचे युजर असून, फेसबुक वापरणाऱ्या १२७ देशांमध्ये भारत अव्वल स्थानी आहे. त्यामुळेच देशातील सिक्युरिटी क्षेत्रातील संशोधकांसाठी मोठ्या रकमेची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आल्याचे कंपनीतर्फे स्पष्ट करण्यात आले. 'विशाल लोकसंख्या असणाऱ्या भारतातून आमच्या बग बाउंटी या उपक्रमाला आतापर्यंत चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या उपक्रमाची सुरुवात २०११ मध्ये झाल्यापासून आतापर्यंत २०५ संशोधक सहभागी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर कंपनीतर्फे प्रोत्साहन निधी म्हणून ही तरतूद करण्यात आली आहे,' अशी माहिती 'फेसबुक बग आउंटी टीमचे प्रोग्रॅम मॅनेजर ॲडम रूडरमन यांनी दिली.

## ✍ भावनाशीलता ही मोठी ताकद : वैशाली व्यास

भावनांमध्ये न अडकता त्यांचा स्वीकार करून त्यांना विचार आणि विवेकाची जोड दिल्यास भावनाशीलता हा स्त्रियांचा प्रमुख गुणधर्म त्यांची मोठी ताकद होऊ शकतो, असे मत मानसोपचार तज्ज्ञ वैशाली व्यास आणि प्राजक्ता कुलकर्णी यांनी व्यक्त केले. 'वेध स्त्रीत्वाचा' या कार्यक्रमात ते बोलत होते.

‘मन:सृष्टी सेंटर फॉर मायकोलॉजिकल डेव्हलपमेंट अँड स्टडीज’ या सामाजिक संस्थेतर्फे महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या ‘स्त्रियांची मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये’ या कार्यशाळेमध्ये त्या बोलत होत्या.

कोणतीही भावना ही वाईट नसून तिचा अतिरेक झाला तर अस्वस्थता येते. प्रेमासारखी सुंदर भावनादेखील अतिरेकी झाल्यास मालकी हक्काच्या भावनेचा जन्म होतो आणि ही अतिरेकी भावना संबंधित दोन्ही व्यक्तींच्या मनात तीव्र स्वरूपाची अस्वस्थता निर्माण करते. त्याचबरोबरच जीवनात मुलगी, बायको, सून, आई, सासू अशा अनेक भूमिका निभावताना कित्येक अतिरेकी भावना मनोकायिक रोगांकडे तिची प्रगती थांबवतात. अशा अतिरेकी भावनांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी योग्य वेळी मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेणे हिताचे ठरते, असे मत मानसोपचारतज्ज्ञ निखिल वाळकीकर यांनी व्यक्त केले.

अभ्यास, घर, मुले, नोकरी, विविध नातेसंबंध, हे सर्व सांभाळताना वयाच्या विविध टप्प्यांवरील ताण, चिंता, निराशा आणि अस्वस्थता या भावनांना कसे सामोरे जावे, स्वत:ची बलस्थाने ओळखून स्वत:ची प्रगती कशी साधावी, यासाठी संस्थेतर्फे स्त्रियांसाठी स्वमदत गट सुरू करण्याचे ठरविण्यात आले. शिक्षित आणि अनुभवी मानसोपचार तज्ज्ञांचे या गटांना मार्गदर्शन लाभणार आहे. या गटाच्या सभासदत्वासाठी महिलांनी ९८८१२०४२६७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन व्यास यांनी केले.

## ✍ भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांचा सत्कार

‘माझी भाषा म्हणजे मोठी भाषा, असा मोठा गैरसमज अनेकांना आहे. अशा छोट्या अस्मिता तोडून टाकायला हव्यात. भाषा ही एकमेकांना जोडण्यासाठी, अधिक समजण्यासाठी असते, हा विचार समोर ठेवून नवी सांस्कृतिक चळवळ देशभर पसरायला हवी,’’ अशी अपेक्षा भाषातज्ज्ञ व घुमान बहुभाषा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गणेश देवी यांनी व्यक्त केली. बौद्धिक सरहद ओलांडणे हा साहित्याचा स्वभावच असतो, असेही ते म्हणाले.

सरहद संस्थेतर्फे घुमान येथे बहुभाषा साहित्य संमेलन होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. देवी यांची निवड झाल्याबद्दल संत साहित्याचे

अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी संमेलनाचे आयोजक संजय नहार, निमंत्रक भारत देसडला, प्रकाशक अरुण जाखडे उपस्थित होते.

डॉ. देवी म्हणाले, ''मराठी, हिंदी, बंगाली, तेलगू, गुजराती, तमीळ, पंजाबी, कानडी या भारतीय भाषा बोलणाऱ्यांचे प्रमाण जगभर इंग्रजी भाषेला मातृभाषा मानणाऱ्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे आपण वेगवेगळ्या भारतीय भाषा बोलणाऱ्यांनी एकत्र येऊन भाषेवर आणखी काम करणे गरजेचे आहे. घुमानमध्ये होणारे हे साहित्य संमेलन म्हणजे या कामाची सुरुवातच मानायला हवी. भारतात साहित्य खंडित झाले आहे, साहित्याचे तुकडे पडत आहेत, विभाजन होत आहे. अशा स्थितीत होणारे हे संमेलन म्हणजे नवे पाऊलच ठरणार आहे. हे भाषांचे संमेलन नाही किंवा भाषाशास्त्राचेही नाही. अनेक भाषांतील साहित्याचे संमेलन आहे. विश्वभर भारतीय भाषांची छबी उमटविण्यासाठी अशा प्रयत्नांचा उपयोग होईल.'' स्थळ, काळ ओलांडू शकते अशी कला म्हणजे साहित्य होय. 'सरहदी'च्या पलीकडे झेपावणारी, स्वत:ची भूमी ओलांडणारी ही कला आहे. मुळात साहित्याचा स्वभावच 'सरहद' ओलांडणे हा आहे. त्यामुळे इतर भाषांत काय सुरू आहे हे आपण पाहायला हवे. आदान-प्रदान व्हायला हवे. स्वातंत्र्याच्या काळात तर अनुवादाला देशप्रेमाचे कृत्य मानले जायचे, असेही डॉ. देवी यांनी सांगितले.

## ✍ हिंदी विश्व भाषा

'देशाचे अखंडत्व टिकविण्यासाठी हिंदी भाषेचा विकास होणे आवश्यक आहे. तसेच हिंदी ही केवळ राष्ट्रभाषा असून चालणार नाही, तर 'विश्वभाषा' म्हणून जगासमोर आली पाहिजे,'' असे उद्‍गार माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या सांगता सोहळ्यात काढले.

संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार उल्हास पवार, कार्याध्यक्षा डॉ. वीणा मनचंदा, ज्येष्ठ पत्रकार डॉ. भारत आगरवाल आदी या वेळी उपस्थित होते. सभेतर्फे तयार केलेल्या 'हिंदी-मराठी' शब्दकोशाचे प्रकाशन करण्यात आले.

शिंदे म्हणाले, ''काही नागरिक अडखळत का होईना, हिंदी बोलण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. मराठी आणि हिंदी यामध्ये साम्य आहे. परंतु दक्षिण भारतात अजूनही राष्ट्रभाषेचा प्रचार होणे

आवश्यक आहे. हिंदी भाषा सर्व स्तरापर्यंत पोचविण्याच्या कामात हिंदी सिनेमा महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.'' शिक्षणात राष्ट्रभाषा ही असावीच, त्याचप्रमाणे न्यायालयीन निकालही राष्ट्रभाषेत उपलब्ध झाल्यास सर्वसामान्य नागरिकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल,'' असेही मत शिंदे यांनी व्यक्त केले.

## ✍ जागतिक चिमणी दिवस

एकेकाळी 'चिऊताई चिऊताई दार उघड...' अशी बडबड गीतं आपण म्हणायचो. काळाबरोबर बडबड गीतंही बदलली. आता बिचाऱ्या चिऊताईला 'माणसा माणसा दार उघड...' म्हणत स्वअस्तित्वासाठी याचना करण्याची वेळ माणसांनी आणून ठेवली आहे. पण एके दिवशी माणसाला ही चूक लक्षात आली आणि त्याने सुरू केला चिऊताईला परत आणण्याचा प्रयत्न... आणि माणसांनी या चिऊताईसाठी पुन्हा दारे उघडली. चिमणीला पुन्हा घर मिळाले...

एखाद्या गोष्टीत वाचावे तसे हे 'एकदा काय झालं...' पठडीतलं वर्णन. पण ते काल्पनिक नाही. या भावना आहेत एका खऱ्याखुऱ्या (आणि आजच्याच बदललेल्या जगात राहणाऱ्या) माणसाच्या. मोहंमद दिलावर असे त्यांचे नाव. चिमण्यांच्या संवर्धनासाठी अहोरात्र झटणारा हा चिमणीमित्र... चार खंड, चाळीसहून अधिक देश, पंचवीस हजारांवर 'चिमणीमित्र' आणि या सगळ्यातून 'आपलं घर' मिळाल्यानंतर होत गेलेली चिमण्यांची वाढ, याचे समाधान मोहंमद व्यक्त करतात.


त्यांनी चिमण्यांविषयी माणसांत होत गेलेले सकारात्मक बदल आणि त्याचे फायदे उलगडून दाखवले. सात वर्षांपूर्वी २०१० मध्ये नाशिकमधील आपल्या 'नेचर फॉरएव्हर सोसायटी'च्या ऑफिसात बसून मोहंमद आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मांडलेली २० मार्च या 'वर्ल्ड स्पॅरो डे'ची संकल्पना पाहता पाहता जगभरात पोचेल, असे त्यांना वाटले नव्हते. पण तसे झाले खरे! चिमणी वाचविण्याचा त्यांचा वैयक्तिक संकल्प जागतिक झाला.

मोहंमद सांगतात, 'आज जर चिमण्या जिवंत राहणार नसतील, तर उद्या तीच वेळ आपल्यावरही येईल. गेली दहा हजार वर्षे मानवी अधिवासासोबतच आपला अधिवास करून राहिलेल्या चिमण्यांचे कमी होणे म्हणूनच माणसांसाठी डोळे उघडायला लावणारी घटना आहे.''

**नवं कोरे**

*तारुण्यात युद्धभूमीवर वीरमरण पत्करलेल्या मुलाच्या आईची हृद्य कहाणी.*

# एका सैनिकाचा मृत्यू




**मूळ लेखक** - मार्गरिट एव्हिसन

**अनुवाद** - विनीता जोगळेकर

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

२१ एप्रिल, २००९

सद्यस्थितीत बिनतारी यंत्रणा, पाणी, अन्न आणि वैद्यकीय उपकरणं या सगळ्याचीच येथे कमतरता आहे. या असल्या मोहिमांमध्ये मनुष्यबळाची नेमकी उणीव असते. अत्यंत धोकादायक भागांत दोन आठवडे पुरेल इतकंच पाणी, अन्न आणि वैद्यकीय सामग्री घेऊन एखाद्या प्लॅटूनला पाठवणं, हे अगदी लाजिरवाणं आहे. ज्या दुखापती होतील त्यावर मी औषधोपचार करूच शकणार नाही आणि सैनिकांचे बळी जातील. खरंतर ते टाळता येऊ शकतील. हे म्हणजे आम्ही डोंबाऱ्यासारखं दोरावरून चालणंच आहे. योग्य ती खबरदारी घेतली नाही तर आम्ही दोरावरून पडण्याची शक्यताच जास्त! भिंतीवर डोकं आपटून घेण्यासारखंच आहे हे!

मला हे सगळं फारच भयानक वाटतंय; म्हणजे इतकं की, भीतीनं मी आजारीच पडेन. आज रात्री मी मॉमजवळ हे सगळं बोलेन आणि त्यानंच कदाचित मला थोडा उत्साह येईल....

– लेफ्टनंट मार्क एव्हिसन

## ✍ मुलाला पोटगी १८ वर्षांचा होईपर्यंतच

घटस्फोटाच्या प्रकरणात पत्नीसोबत मुलालाही पोटगी देण्याचा आदेश झाला तरी मुलगा १८ वर्षांचा होईपर्यंतच त्याला पोटगी देणे पालकांवर कायद्याने बंधनकारक आहे, असा निकाल गुजरात उच्च न्यायालयाने दिला आहे.

घटस्फोटानंतर पत्नीच्या पोषणाची जबाबदारी पतीवर असली तरी तिच्यापासून झालेला मुलगा धडधाकट असेल तर त्याला आयुष्यभर पित्याने पोसावे, अशी कायद्याची अपेक्षा नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. विसनगर येथील एक डॉक्टर दिनेश ओझा आणि त्यांची पत्नी नीता यांच्या प्रकरणात न्या. जे. बी. परडीवाला यांनी हा निकाल दिला. सन २००६ मध्ये मुलासह घरातून हाकलून दिल्यानंतर नीता यांनी पोटगीसाठी तर दिनेश यांनी नीताविरुद्ध घटस्फोटासाठी दावा दाखल केला.

नीताच्या दाव्यात कुटुंब न्यायालयाने तिला आणि तिच्या मुलीला दरमहा ठराविक रक्कम पोटगी म्हणून देण्याचा आदेश डॉ. दिनेश यांना दिला होता. मुलगा १८ वर्षांचा झाल्यावर डॉ. दिनेश यांनी त्याला पोटगी देणे बंद केले. त्याविरुद्ध नीताने न्यायालयात तक्रार केली. कायद्यानुसार १८ वर्षांनंतरही मुलाला पोटगी देणे बंधनकारक आहे का, याचा खुलासा उच्च न्यायालयाकडून करून घेण्यास नीता यांना सांगण्यात आले.

यानुसार करण्यात आलेल्या अर्जावरील सुनावणीत नीताच्या वकिलाने असा मुलगा कमावता होईपर्यंत पालन-पोषण करणे ही डॉ. दिनेश यांची जबाबदारी असल्याचे म्हटले होते. मात्र डॉ. दिनेश यांच्या वकिलाने कायद्याने सज्ञानतेचा मुद्दा उपस्थित केला.

डॉ. दिनेश यांच्या वकिलाचे म्हणणे मान्य करून न्या. परडीवाला यांनी म्हटले की, केवळ आपली अपत्ये म्हणून नव्हे तर देशाचे भावी नागरिक म्हणूनही मुलांना योग्य शिक्षण देऊन व चांगले संस्कार करून मुलाचे संगोपन करणे हे प्रत्येक पित्याचे कर्तव्यच आहे. मात्र पोटगीच्या बाबतीत मुलगा आणि मुलगी यांची बरोबरी करता येणार नाही. मुलीचे लग्न होईपर्यंत तिची जबाबदारी पित्यावर असली तरी मुलाच्या बाबतीत मात्र ही जबाबदारी फक्त तो १८ वर्षांचा होईपर्यंतच असते.

## ✍ ‘मसाप’मध्ये अखेर ‘परिवर्तन’

महाराष्ट्र साहित्य परिषद पंचवार्षिक निवडणुकीत ‘परिवर्तन’ पॅनेलने निर्विवाद वर्चस्व मिळविले आहे. ‘मसाप’च्या प्रमुख पदांसह परिवर्तन पॅनेलने सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या ग्रामीण भागातही आपले पाय रोवले आहेत. तर दुसरीकडे सुनील महाजन यांच्या नवनिर्माण पॅनेलने पुणे शहर व स्थानिक प्रतिनिधींमध्ये बाजी मारली आहे. मतमोजणीची प्रक्रिया १५ मार्चला रात्री १० वाजेपर्यंत सुरू होती. त्यानंतर निवडणुकीचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला.

२१ पदांसाठी ४८ उमेदवारांमध्ये चढाओढहोती. एकूण ११ हजार ३३६ मतदारांपैकी केवळ ६ हजार ८४२ मतदारांनीच आपला मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीसाठी सुनील महाजन यांच्या नेतृत्वाखाली ‘नवनिर्माण’ आणि प्रा. मिलिंद जोशी यांच्या नेतृत्वाखाली ‘परिवर्तन’ पॅनेल एकमेकांसमोर उभे होते. या निवडणुकीत २१ जागांपैकी १४ जागांवर परिवर्तन पॅनेलचे उमेदवार निवडून आले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. प्रताप परदेशी, ॲड. सुभाष किवडे, प्रा. सुधाकर जाधव यांनी काम पाहिले.

निकाल : कार्याध्यक्ष - प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह - प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष - सुनिताराजे पवार, स्थानिक कार्यवाह - दीपक करंदीकर, बंडा जोशी, उद्धव कानडे, माधव राजगुरू (बिनविरोध), वि. दा. पिंगळे (बिनविरोध), प्रमोद आडकर (सर्व नवनिर्माण पॅनेल), पुणे शहर प्रतिनिधी - डॉ. सतीश देसाई, शिरीष चिटणीस, अरविंद संगमनेरकर (सर्व नवनिर्माण पॅनेल)

**जिल्हा प्रतिनिधी - पुणे -** पुरुषोत्तम काळे, रावसाहेब पवार, राजन लाखे,

**ठाणे -** पद्माकर शिरवाडकर, सुरेश देशपांडे, प्रभाकर संत (सर्व बिनविरोध)

**सोलापूर -** पद्माकर कुलकर्णी, जयंत कुलकर्णी, कल्याण शिंदे

**सातारा -** रवींद्र बेडकिहाळ, विनोद कुलकर्णी, डॉ. सोपानराव चव्हाण

**अहमदनगर -** चंद्रकांत पालवे, जयंत येलुलकर (बिनविरोध)

**नाशिक -** नितीन ठाकरे, प्रकाश होळकर,

**सांगली -** दशरथ पाटील (बिनविरोध),

**धुळे - नंदुरबार -** शशिकला पवार (बिनविरोध)
**जळगाव -** तानसेन जगताप (बिनविरोध) कोल्हापूर - राजन मुठाने
**कोकण -** प्रकाश देशपांडे

## ✍ 'मसाप'मध्ये राजकारण नव्हे तर 'साहित्यकारण'

"गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र साहित्य परिषद ही मनमानी कारभार आणि कंपूशाहीमध्ये अडकली होती. याचाच परिणाम म्हणून उर्वरित महाराष्ट्राने मतदानाच्या माध्यमातून उद्रेक व्यक्त करून 'मसाप'मध्ये 'परिवर्तन' घडवून आणले आहे. यापुढे येथे राजकारणाला थारा न देता साहित्यकारण केले जाईल. त्यामुळे या संस्थेत साहित्यिकांनी आपला राबता वाढवावा, म्हणजे 'मसाप'ला पूर्वीचे वैभव मिळेल. साहित्य परिषदेच्या शतकोत्तर महोत्सवानिमित्त विविध ठिकाणी साहित्य मेळावे आयोजित करण्याबरोबरच परिषदेच्या कार्यकारिणीची सभा केवळ पुण्यात न घेता इतरत्रही घेतल्या जातील. मिळालेले यश हे केवळ आमचे नसून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी राबविलेल्या प्रक्रियेमुळे आहे. मतदार यादी अद्ययावत करणे हे आमचे पहिले काम असेल."

**प्रा. मिलिंद जोशी**
(नवनियुक्त कार्याध्यक्ष, मसाप)

## ✍ गुगल सर्चमध्ये भारतीय महिला आघाडीवर

कोणताही प्रश्न पडला की गुगल सर्च कर. असा सल्ला हल्ली कानावर पडतोच पडतो. गुगल करण्यात भारतात पुरुषांपेक्षा महिला आघाडीवर असल्याचे चित्र आहे. फॅशन, ब्युटी, रेसिपिज, फिटनेस हा ट्रेंड महिलांमध्ये लोकप्रिय असून प्रत्येक वयोगटातील महिला गुगलवर सर्च करण्यात पुरुषांच्या पुढे असल्याचे 'गुगल'नेच केलेल्या पाहणीत समोर आले आहे. मध्यमवयीन महिलांचे प्रमाण तर पुरुषांच्या तुलनेत तब्बल १२३ टक्के इतके अधिक आहे.

एखादी व्यक्ती गुगल सर्चवर किती मिनिटे होती, याचा अभ्यास गुगलच्या वतीने केला जातो. त्या व्यक्तीने काय सर्च केले, कितीवेळा सर्च केले या अभ्यासावर त्याची आवडनिवड लक्षात घेत पुढच्यावेळी तीच व्यक्ती सर्च करायला आली तर तिच्या आवडीचे विषय, संकेतस्थळे समोर आणली

जातात. महिला दिनी ‘गुगल’ने या सर्च करण्यात महिला कशा आघाडीवर आहेत, याचे आकडेवारीसह विश्लेषण जाहीर केले आहे.

महिलांचे आयुष्य बदलवून टाकण्यात भारतात इंटरनेटचा वाटा मोठा आहे. गत काही वर्षात महिला मोठ्या संख्येने इंटरनेट वापरत असून पुरुषांच्या तुलनेत त्या अधिक ॲक्टिव्ह असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

३५ ते ४४ वर्षे वयोगटातील महिलांनी १५ ते २४ आणि २५ ते २४ या वयोगटातील तरुण महिला यूजर्सना गुगल सर्च करण्यात मागे टाकल्याचे या पाहणीतून समोर ओल आहे. ५५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या महिलाही इंटरनेटवर अधिक ॲक्टिव्ह आहेत. ‘सर्च मिनिट्स’मध्ये महिलांनी पुरुष यूजर्सना कधीच मागे टाकले आहे. १५ ते २४ वयोगटातील तरुण महिलांच्या इंटरनेट वापरातील प्रमाणात ११० टक्क्यांची वाढया वर्षभरात नोंदवण्यात आली आहे. तर पुरुषांमध्ये हेच प्रमाण १०४ टक्के इतके आहे. २५ ते ३४ वयोगटातील महिलांच्या इंटरनेट वापरातील प्रमाणात १०८ टक्के, तर पुरुषांच्या ९८ टक्के इतकी वाढनोंदवण्यात आली आहे.

फक्त फॅशन आणि ब्युटी नव्हे तर फिटनेस, रेसिपिज, हेल्थ आणि एंटरटेनमेंट या ट्रेंडमध्येही सर्च करण्यात महिलाच आघाडीवर असल्याचे ‘गुगल’ने स्पष्ट केले आहे.

## ✍ फुंतरू

आपल्याकडे रोज नवनवीन विषयांवर सिनेमे बनतात. कॉलेजविश्व, कॅम्पस कट्टे, पौगंडावस्थेतल्या मुलांची मानसिकता असे विषय जेवढे उपसता येतील तेवढे उपसण्याचा प्रयत्न होताना दिसतो. शाळा, आजोबा अशा आपल्या कलाकृतीतून प्रयोग करू पाहणारा सुजय डहाकेही अशा कॉलेजविश्वाच्या प्रेमात पडतो; पण त्याला फक्त ते वय आणि त्याची भाषा खुणावत नाही, तर नव्या पिढीचा विज्ञानवादी दृष्टिकोनही खुणावतो. म्हणूनच केवळ मानसिकतेवर बोट ठेवण्यापेक्षा तो अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन सायन्स फिक्शन चित्रपट बनवण्याच्या मागे  लागलेला दिसतो. त्याचा हा प्रयोग फुंतरूमध्ये यशस्वी झाला आहे. आजच्या पिढीचं जगणं मांडतानाच त्यावर न थांबता प्रेम, विज्ञान, तंत्रज्ञान, परस्पर नातेसंबंध आदींबाबत तो बारकाईने पाहतो. संवादांमधून मांडतो. हे मांडतानाच फ्राईड, रुमी, न्यूटन, आइनस्टाइन आदींचे संदर्भ देतो. त्यामुळे या संवादांना ग्रेस

येतो. शिवाय चित्रपटांतल्या व्यक्तिरेखांच्या तोंडी असलेल्या ‘या’ भाषेमुळे थिएटरचा संपूर्ण आसमंत तंत्रज्ञानी होतो. सुजय डहाकेचा हा चित्रपट म्हणजे येणाऱ्या पिढीच्या मानसिकतेचा आरसा आहे, असं म्हणायला हरकत नाही. उत्तम छायांकन, टवटवीत संगीत, सोपे-सहज संवाद यांना असलेली तंत्रज्ञानाची अप्रतिम जोड यांमुळे फुंतरू मनोरंजक होतो. पण त्यावर न थांबता माणसाच्या जगण्यात नव्या ‘व्हॅल्यूज’ ॲड करतो. ‘फुंतरू’ची गोष्ट खरंतर एका ओळीत संपते. म्हणजे इंजिनिअरिंग कॉलेजला असलेला फर्स्ट इअरचा वीरा हा अनयाच्या प्रेमात पडतो. पण ती त्याला थेट नाकारते. प्रत्येक गोष्टीत विज्ञान, तंत्रज्ञान शोधणारा वीरा या नकाराने संतापतो आणि आपला सगळा राग तो आपल्या नव्या संशोधनात घालतो. त्याच्या या प्रोजेक्टचं नाव असतं फुंतरू. मग पुढे हा प्रोजेक्ट यशस्वी होतो, की फसतो की त्याचं पुढे आणखी काय होतं? हे सगळं या सिनेमात पाहाणं रंजक आहे.


❖

**६वी आवृत्ती**

# मुलांवरचे संस्कार

**शं. व्यं. काश्यपे**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**




मुलांनो

जीवन म्हणजे विविधरंगी अनेक धाग्यांनी विणलेला गोफ. तो सुंदर रितीने गुंफण्यासाठी आपल्या आचार-विचार- भावनांचे धागे मजबूत, मुलायम, आकर्षक तर हवेतच; पण ते कलात्मक पद्धतीने गुंफलेही गेले पाहिजेत. आपला जीवनगोफ असा सुसंस्कारित, सुंदर, आकर्षक, मजबूत होण्यासाठी या पुस्तकात वाचा –

पालकांनो आपल्या मुलांवर सुसंस्कार कसे करावेत, त्यांचया विविध विषयांवरील प्रश्नांना समर्पक उत्तरे कशी द्यावीत, जुन्या परंपा व नवीन विचारधारा यांची सांगड कशी घालावी, मुलांपुढे आपला आदर्श कसा उभा करावा, हे समजण्यासाठी या पुस्तकात अवश्य वाचा –



## * सिंधुताई सपकाळ : यांचा सन्मान

आयुष्य जगत असताना अनेक अडचणी आल्या. आत्महत्येचाही विचार केला. पण कोठून तरी आलेल्या आवाजातून जगण्याची उमेद मिळत गेली. महिलांनी अबला न राहता, सबला होऊन स्वावलंबी जीवन जगण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधूताई सपकाळ यांनी केले.

आंतरराष्ट्रीय महिलादिनाच्या निमित्ताने मनीलाइफ फाउंडेशन आणि माझी मैत्रीण चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

वूमन्स एज्युकेशन सोसायटीच्या मेधा भागवत यांना पंडिता रमाबाई रानडे आणि सहेली संघ संस्थेच्या तेजस्वी सेवेकरी यांना सावित्रीबाई फुले पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी माझी मैत्रीण चॅरिटेबल ट्रस्टच्या शैला लिमये, मनी लाइफ फाउंडेशनच्या सुचेता दलाल, देवाशिष बासू, विजय कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते.

सुधीर गाडगीळ यांनी सिंधूताई सपकाळ यांच्याशी संवाद साधला. आयुष्याचा प्रवास उलगडताना सिंधूताई म्हणाल्या, "अडचणीवर मात करण्याची ताकद असेल तर अपयश कधीच येत नाही. सध्याच्या तरुणाईने बांधिलकी जपली पाहिजे. समाजामध्ये घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे. प्रत्येकाने आपल्या जोडीदाराला वेळ देण्याची गरज आहे."

## * प्रा. रा. ग. जाधव यांना विंदा पुरस्कार

'विंदा करंदीकर यांच्या नावाने मिळणाऱ्या जीवनगौरव पुरस्कारामुळे आनंद झाला आहे. आमच्या पिढीवर विंदांच्या कवितेचा प्रभाव आहे.' अशी भावना ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केली. साहित्यामध्ये

समीक्षा आवश्यक असताना आजच्या साहित्यातून समीक्षा हरवली आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

मराठी साहित्यक्षेत्रात भरीव व मोलाची कामगिरी करणारे ज्येष्ठ समीक्षक व लेखक प्रा. जाधव यांना २०१५ या वर्षासाठीचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. पाच लाख रुपये, मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. जाधव यांची ‘निळी पहाट’, ‘संध्यासमयीच्या गुजगोष्टी’, ‘समीक्षेतील अवतरणी’, ‘साठोत्तरी मराठी कविता व कवी’, ‘साहित्य व सामाजिक संदर्भ’, ‘साहित्याचे परिस्थितीविज्ञान’ आदी अनेक पुस्तके प्रसिद्ध असून, ते औरंगाबाद येथे २००४ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

“विंदा करंदीकर आणि माझे स्नेहाचे संबंध होते. खरे तर कवी म्हणून आणि माणूस म्हणूनही ते फार मोठे होते. त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळाला, ही आनंदाची घटना आहे,” अशी भावना जाधव यांनी व्यक्त केली. साहित्यातून समीक्षा हरवली आहे, अशी खंत व्यक्त केली. हा सन्मान खूप आधी मिळायला हवा होता, असे नाही का वाटत, असा प्रश्न केला असता, ‘वेळ यावी लागते,’ असे त्यांनी उत्तर दिले. आता माझ्याकडे काही नाही. लिखाण आणि वाचन होत नाही, असे सांगताना त्यांना हुंदका अनावर झाला.

पुरस्कार स्वीकारण्यासाठी मुंबईला जाण्यासारखी परिस्थिती नसल्याने सरकारच्या वतीने त्यांना त्यांच्या निवासस्थानी जीवनगौरव आदरपूर्वक प्रदान करण्यात आला.

### * लाहिरी, गाडगीळ, जगताप यांना शिवशक्ती पुरस्कार

ज्येष्ठ संगीतकार बप्पी लाहिरी, उद्योजक सौरभ गाडगीळ आणि हृदयरोगतज्ज्ञ डॉ. रणजित जगताप यांना नारायण पेठेतील महाशिवरात्र उत्सव समिती ट्रस्ट भरत मंडळातर्फे शिवशक्ती पुरस्कार सात मार्च रोजी देण्यात आले.

अभिनेत्री रविना टंडन, सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार आदी मान्यवरांच्या उपस्थितीत या महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. प्रत्येकी ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शंकराची मूर्ती, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

## * फडणीस, सरवटे यांना जीवनगौरव पुरस्कार

व्यंगचित्र कलेला प्रोत्साहन देण्यासाठी मुंबईत व्यंगचित्रकारांचे संमेलन होणार आहे. वसंत सरवटे आणि शि. द. फडणीस या ज्येष्ठ व्यंगचित्रकारांना या वेळी जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. ५० हजार रुपये व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

दादरमधील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात १६ एप्रिलपासून दोन दिवस हे संमेलन होईल. या संमेलनात मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह देशोदेशीचे व्यंगचित्रकार मार्गदर्शन करणार आहेत.

मोबाईलचे वेड, सेल्फी, स्मार्ट सिटी, असहिष्णुता यापैकी एका विषयावर व्यंगचित्र काढून www.cartoonistscombine.com वर पाठवावे.

## * सहजीवन पुरस्कार

'सध्याचे सत्ताधारी अविवेकी, असहिष्णु असून धार्मिक, सामाजिक विविधतेला त्यांनी धक्का लावण्याचे काम त्यांनी केले आहे,' अशी टीका सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे किशोर ढमाले यांनी केली. बहुजन, सहिष्णुवादाची परंपरा असेपर्यंत त्यांचे वर्चस्व होऊ देणार नाही. सद्य:स्थितीतील आव्हानांना तोंड देण्यासाठी महात्मा फुले यांचे विचार उपयुक्त ठरतील, असेही ते म्हणाले.

'मिळून साऱ्याजणी' आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठान यांच्या वतीने सहजीवन सन्मान पुरस्कार ढमाले आणि प्रा. प्रतिमा परदेशी या दाम्पत्यांना प्रदान करण्यात आले.

हिंसा वाढत आहे सामान्य माणसाने मेंदूचा वापर करू नये असे वातावरण तयार केले जात आहे. परंतु महात्मा फुले यांनी केवळ शाळेचे कुलूप उघडले नाही तर सामान्यांच्या मेंदूचे कुलूप देखील उघडले.


कष्टकरी, बहुजन, अल्पसंख्याकांना दहशतीखाली ठेवले जात आहे. त्यांची मने कलुपित केली जात आहेत. सध्याच्या परिस्थितीला सडेतोड उत्तरे देण्यासाठी महात्मा फुले यांचे विचार उपयुक्त ठरतील, महात्मा फुले यांना अभिप्रेत असलेली समतावादी कुटुंबसंस्था निर्माण करण्याचे आव्हान आहे. त्यासाठी फुले यांच्या विचारांची गरज कायम आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

'एखाद्या विचारामागे आयुष्यभर धावणे आणि त्यात झोकून देणे हे काम सोपे नाही. आपल्या कामाचे क्षेत्र समाजातील तळागाळापर्यंत पोहोचले

**नवं कोरे**

पांडुरंग खानखोजे यांचे चरित्र

# मी कधीही माफी मागणार नाही!




**मूळ लेखक** - सावित्री साव्हनी

**अनुवाद** - अवंती महाजन

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

ब्रिटिशांच्या जोखडाखालचे आयुष्य; हे आपले आयुष्य नव्हे, याची जाणीव पांडुरंग खानखोजेंना लवकरच झाली. अर्थात त्यावेळचे भारताचे शासनकर्तेही तितकेच सावध होते. हा तरुण आपल्याला त्रासदायक ठरणार, आपल्या एकहाती, अनिर्बंध सत्तेला विरोध करणार, हे त्यांच्या लक्षात आले होते. स्वत:मधील दाहक क्षात्रतेजाचा शोध घेतच खानखोजेंनी देश सोडला आणि नजरेसमोरचे स्वतंत्र मातृभूमीचे स्वप्न क्षणभरही नजरेआड होऊ न देता, हा स्वाभिमानी राष्ट्रभक्त देशोदेशी, खंडा-खंडांतून हिंडला.

स्फोटके बनविणे आणि युद्धशास्त्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर, अन्य ब्रिटिशांची सत्ता उलथवून टाकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आपल्यासारख्याच सहकाऱ्यांच्या शोधात खानखोजे जगभर हिंडले. अमेरिकेमध्ये त्यांनी अभिनव अशा 'गदर पार्टी'ची स्थापना केली. त्यातल्या बऱ्याच सभासदांना नंतर ब्रिटिशांनी फासावर चढविले.

परंतु मन मात्र सदासर्वकाळ मातृभूमीकडे ओढघेत होते. काहीही करून खानखोजेंना भारतात परत यायचेच होते. ही गोष्ट घडायला तब्बल चाळीस वर्षांचा कालावधी जावा लागला खरा; परंतु ते भारतात परत आलेच!

पाहिजे,' असे आवाहन डॉ. आढाव यांनी केले.

### * मनोजकुमार यांना फाळके पुरस्कार

देशभक्तिपर चित्रपटांसाठी प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ अभिनेते मनोजकुमार (वय ७८) यांना चित्रपटसृष्टीतील अत्यंत मानाचा ४७ वा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला. सुवर्णकमळ, दहा लाख रुपये आणि शाल असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

लता मंगेशकर, आशा भोसले, सलीत खान, नितीन मुकेश आणि अनुप जलोटा या पाच परीक्षकांच्या समितीने हा निर्णय घेतला. 'हरियाली और रास्ता' या चित्रपटातून मनोजकुमार यांना नायक म्हणून नाव मिळाले. पूरब और पश्चिम, रोटी कपडा और मकान, वो कौन थी, क्रांती हे त्यांचे काही नावाजलेले हिंदी चित्रपट. 'उपकार' चित्रपटाद्वारे त्यांनी निर्मिती व दिग्दर्शन क्षेत्रात पाऊल टाकले.

### * शिरवाडकर, कानेटकर पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेतर्फे लेखन क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना वि. वा. शिरवाडकर लेखन पुरस्कार, तर नाट्यक्षेत्रात कामगिरी करणाऱ्यांना वसंत कानेटकर रंगकर्मी पुरस्कारांनी गौरविण्यात येते. नाशिक येथे २७ फेब्रुवारी रोजी महाकवी कालिदास कलामंदिरात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष गंगाराम गवाणकर, नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती शाखेचे अध्यक्ष मोहन जोशी व अभिनेते दीपक करंजीकर उपस्थित होते.

पुरस्कारमूर्ती जयंत पवार हे एक मराठी नाटककार आणि नाट्यसमीक्षक आहेत. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने घेतलेल्या नाट्यलेखन स्पर्धेत 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकासाठी जयंत पवार यांना प्रथम पारितोषिक मिळाले. तेच नाटक नंतर निर्माते संतोष कोचरेकर यांनी कल्पना कोठारी आणि उदय कुलकर्णी यांस सहनिर्माता म्हणून घेऊन आपल्या 'महाराष्ट्र रंगभूमी'र्ते व्यावसायिक रंगभूमीवर आणले. सन २०१४ मध्ये महाड येथे झालेल्या १५ व्या कोकण मराठी साहित्य परिषदेच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. जयंत पवार यांना 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहाला २०१२ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार ही मिळाला आहे.

दुसरे पुरस्कारमूर्ती अशोक सराफ हे मराठी चित्रपटसृष्टीत अभिनयाचा स्वतंत्र ठसा उमटविणारे एक लोकप्रिय मराठी अभिनेते आहेत. मराठी रसिकांच्या गळ्यातील ताईत असणाऱ्या अशोक सराफ यांचा नाटक, सिनेमा आणि दूरचित्रवाणी या त्रिस्थळी काम सुरू आहे. प्रत्येक माध्यमात त्यांनी अभिनयाची पारितोषिके व पुरस्कार मिळविले आहे. पुरस्कारमूर्ती सुषमा अभ्यंकर यांनी ५२ वर्षे शिक्षिका म्हणून सेवा दिली आहे.

### * सजग नागरिकांचा 'मटा'तर्फे सत्कार

सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या थेट संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र टाइम्सने सुरू केलेला 'सिटीझन रिपोर्टर' हा प्रभावी उपक्रम आहे. अशा शब्दांत या उपक्रमात सहभागी झालेल्या नागरिकांनी आपली भावना व्यक्त केली.

'सिटीझन रिपोर्टर'च्या ॲपद्वारे उल्लेखनीय वार्तांकन केलेल्या डॉ. अरविंद जोशी आणि अनिकेत राठी यांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. नागरिकांना स्थानिक समस्या प्रभावीपणे मांडता याव्यात, यासाठी 'सिटीझन रिपोर्टर' हा अत्यंत प्रभावी उपक्रम असून, त्याद्वारे नागरी प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे.

शहरात दैनंदिन स्वरूपात दिसणारी एखादी समस्या नागरिकांकडून बहुतेक वेळा दुर्लक्षिली जाते. त्याबद्दल राग व्यक्त केला जात असला, तरी ती सोडविण्यासाठी नेमके काय करायचे, याची माहिती नागरिकांना नसते. कोणी सिटीझन रिपोर्टर ॲपमुळे या समस्या अनेक लोकांपर्यंत पोहोचतात, त्यामुळे प्रशासनाकडून त्याची तातडीने दखल घेतली जाते. या ॲपमुळे नागरिक अधिक सजग होतील,' असे निरीक्षण नोंदविण्यात आले.

### * यशवंतराव चव्हाण साहित्य जीवनगौरव पुरस्कार

*जिथे सुंदरीच्या असे मद्य हाती,*
*जिथे बँक प्रभू विजय गीत गाती,*
*जिथे बुडतानाही गातो तराणे*
*असा 'किंगफिशर' पुन्हा न होणे...*

वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांनी केलेल्या या वात्रटिकेला श्रोत्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट व गंगालॉज मित्र मंडळातर्फे 'यशंवतराव चव्हाण साहित्य जीवन गौरव पुरस्कार' प्रदान कार्यक्रमात यंदा अभिनेते नाना पाटेकर यांना सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या

हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पालकमंत्री गिरीश बापट, महापौर प्रशांत जगताप, उपमहापौर मुकारी अलगुडे, माजी आमदार उल्हास पवार विजय ढेरे वात्रटिकाकार रामदास फुटणे कवी अशोक नायगावकर व राज्याच्या विविध भागातून आलेले कवी या वेळी उपस्थित होते.

*अजूनपण लिंबू, मिरच्यांनी भरलंय आभाळ,*
*अजूनपण लिंबू मिरच्यांनी झाकलंय अंबर,*
*त्याला काळ्या बाहुल्यांचे झुंबर आहे,*
*परवा पानसरे, आज कलबुर्गी,*
उद्या तुमच्या सगळ्यांचाच नंबर आहे...

डॉ. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, एम, एम कलबुर्गी यांच्या खुनाच्या घटना, त्यांचा अद्याप सुरू असलेला तपास या गोष्टींवर भाष्य करणारी ही भरत दौंडकर यांची कविता उपस्थितांच्या मनाचा ठाव घेऊन गेली. याच कवितेतील 'अच्छे दिन येतील,' या एका स्वप्नाने किती जणांच्या स्वप्नांचे खून झाले, आश्वासनांचे अकाउंट उघडले आणि नंतर आपल्या दु:खाचे अनुदान आपल्या खात्यात जमा केले... या ओळींनी जनतेच्या भावना व्यक्त केल्या. निवडणुकीपूर्वी जनतेला दिलेल्या आश्वासनांवरही कवितेच्या माध्यमातून भाष्य करण्यात आले. शहरातले लोक सुखी आहेत. ग्रामीण भागातील चित्र विदारक आहे. केवळ पाणी किंवा वीज नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करीत नाहीत. तर कुटुंबीयांच्या औषधोपचारासाठी पैसे नाहीत या कारणानेही आत्महत्या केल्या जातात. या लोकांसाठी सरकारकडून विविध योजना राबविल्या जातात, पण त्या योजनेची अंमलबजावणी करणारी नोकरशाही बदलत नाही. ती बदलली पाहिजे. असे मत नाना पाटेकर यांनी व्यक्त केले.

सरकारला प्रश्न विचारा पण सरकारवर सतत अवलंबून राहू नका. आता माझ्या आयुष्यातले नाटक बंद झाले असून वास्तवात जगायचे आहे. मी शेतकऱ्यांसाठी काहीच करत नाही, तर स्वत:तील माणूस जिवंत ठेवण्यासाठी काम करतो आहे. अद्याप माझी किंमत ठरवली नाही. मात्र यापुढे स्वत:ला लिलावात काढायचे झाल्यास शेतकऱ्यांसाठी काढेन, असेही नाना पाटेकर या वेळी म्हणाले.

## * वायल्स यांना प्रतिष्ठेचा आबेल पुरस्कार

तब्बल साडेतीनशे वर्षांपासून गणिततज्ज्ञांना आव्हान देणारे प्रमेय सिद्ध

करणारे ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्राध्यापक सर अॅन्ड्र्यू वायल्स यांना गणितातील नोबेल समजला जाणारा 'आबेल' पुरस्कार जाहीर झाला आहे.

नॉर्वेच्या 'अॅकॅडमी ऑफ सायन्स अँड लेटर्स' या संस्थेतर्फे हा ४ लाख ९५ हजार पौंड रकमेचा पुरस्कार दिला जातो. मे महिन्यामध्ये ऑस्लो येथे पुरस्काराचे वितरण होणार आहे. 'फरमॅट्स लास्ट थेरम' या नावाने प्रसिद्ध असणारे प्रमेय वायल्स यांनी १९९४ मध्ये सिद्ध केले होते. हा पुरस्कार माझ्यासाठी मोठा सन्मान असल्याची प्रतिक्रिया वायल्स यांनी दिली आहे.

*** काव्यदीप पुरस्काराने बोकील यांचा सन्मान**

"हुजूरपागा शाळेतून कवितेची बीजे पेरली गेली. कवितेचा नाद आणि शब्द मला तिथेच गवसले. ते संचित आजपर्यंत माझ्यासोबत मी जपून आहे," अशा शब्दांत कवयित्री संजीवनी बोकील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

साहित्यदीप प्रतिष्ठानच्या वतीने बोकील यांना 'काव्यदीप पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. या वेळी बारामती येथील अॅग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या विश्वस्त सुनंदा पवार, कवयित्री डॉ. अरुणा ढेरे, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ज्योत्स्ना चांदगुडे आदी उपस्थित होते. बोकील यांनी मनोगतातून आपला कवितांचा प्रवास उलगडला. सोबतच आपल्या कवितासंदर्भातील विविध आठवणीही सांगितल्या.

*** वासंती सौर यांना वीणादेवी दर्डा जीवनगौरव**

"आपण स्त्रीशक्ती म्हणतो; पण स्त्री शक्ती नव्हे, तर शक्ती हीच स्त्री आहे. स्त्रीकडे 'इंट्युशन पॉवर' ही जबरदस्त असते. त्यामुळे तिने कोणताही निर्णय घेताना त्या शक्तीचा वापर करावा. तुम्हाला एखादी गोष्ट जेव्हा योग्य वाटेल, तेव्हाच ती करा. कोणीही काही सांगते म्हणून ती करू नका. निर्णय घेतल्यानंतर तो चुकला, तर मागे न वळता त्याचा सामना करा. आणि त्यातून मार्गस्थ व्हा." असे आवाहन ज्येष्ठ अभिनेत्री खासदार जया बच्चन यांनी केले.

'लोकमत'च्या वतीने देण्यात येणारा वीणादेवी दर्डा जीवनगौरव पुरस्कार नाशिक येथील ज्येष्ठ गांधीवादी आणि सर्वोदयवादी विचारवंत वासंती सौर यांना, तर सौ. ज्योत्स्नादेवी दर्डा कार्यगौरव पुरस्कार बीड जिल्ह्यात महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या मनीषा तोकले यांना बच्चन यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. या वेळी लोकमत

एडिटोरियल बोर्डचे चेअरमन खासदार विजय दर्डा, ज्येष्ठ लेखिका शोभा डे, यूएसके फाउंडेशनच्या अध्यक्षा उषा काकडे, अनिल काटे एंटरप्रायझेसचे संचालक अनिल काटे, ऑरेंज कंट्री ग्रुपच्या संचालक सपना छाजेड, 'लोकमत'चे संपादक विजय बाविस्कर, वरिष्ठ महाव्यवस्थापक निनाद देसाई, महाव्यवस्थापक मिलन दर्डा व्यासपीठावर होते. यावेळी 'लोकमत'तर्फे देण्यात येणारे राज्यस्तरीय सखी सन्मान पुरस्कार कोल्हापूरच्या स्मिता विशाल दीक्षित (शैक्षणिक) पुण्याच्या नीलिमा धायगुडे (शौर्य), अहमदनगरच्या डॉ. सुचेता धामणे (वैद्यकीय), अनुराधा ठाकूर (कला), मुंबईच्या  विजया संजय बापट (उद्योग) आणि साताऱ्याच्या ललिता बाबर (क्रीडा) यांना प्रदान करण्यात आले. यावेळी 'आयकॉन्स ऑफ पुणे (वुमेन) या कॉफीटेबल बुकमागची भूमिकाही विशद करण्यात आली.

जया बच्चन म्हणाल्या, ''स्त्रीसशक्तीकरणाबाबत आज मोठ्या प्रमाणात बोलले जाते; पण स्त्रीसशक्तीकरण म्हणजे नेमके काय, याचा विचार करायला हवा. महिला जेव्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, तिला केवळ पदवीचे शिक्षणच नाही तर संस्कारांचे व्यवहाराचे शिक्षण मिळेल. तेव्हाच ती खऱ्या अर्थाने सशक्त होईल.''

जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना वासंतीताई सौर म्हणाल्या, ''आई-वडिलांनी केलेल्या संस्कारांचे हे फळ आहे. संस्कारांतूनच माझी वैचारिक जडणघडण झाली. केवळ स्वत:पुरता विचार न करता त्यापलीकडे जाऊन इतरांसाठी. महात्मा गांधींच्या आश्रमात मी लहानाची मोठी झाले, तेथेच घडले; त्यामुळे माझ्यावर बापूंच्या कार्यकर्तृत्वाचा मोठा प्रभाव आहे. आजही गांधीजीबाबत समाजात अज्ञान व उदासीनता दिसते. त्यांच्याबाबत विचार करणारे विविध मतप्रवाह दिसतात. बापूंबद्दलचे अज्ञान, गैरसमज दूर करून त्यांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा मी सातत्याने प्रयत्न करीत आहे. सध्या अखिल मानवजात मोठ्या संकटांचा सामना करीत आहे. शाश्वत मूल्यांनी भारलेले बापूंचे विचारच या संकटातून समाजाला तारू शकतात. पुरस्कारातील अर्धी रक्कम मी सेवाग्रामच्या बापूंच्या कुटीला समर्पित करणार आहे. बापूंचे विचार सर्वदूर पोहोचविताना मला कधी अहंकाराचा स्पर्शही होऊ नये. एवढीच ईश्वराकडे प्रार्थना करते.''

*'प्रभू तू मुझको नम्र बना, अहंकार मुझे छू ना पावे,*
*मशहुरी की हाव ना हावे, प्रभू तू मुझको नम्र बना'*

‘‘समाजनिर्मितीसाठी विविध स्तरांतून काम करणाऱ्या, निरनिराळ्या प्रकारे झटणाऱ्या महिलांचा आदर्श समाजासमोर आणणे ‘लोकमत’ला महत्त्वाचे वाटते. केवळ शब्दांतूनच नव्हे, तर कृतीतून त्यांचा सन्मान होणे अधिक सयुक्तिक वाटते. आज महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यांनी ठसा उमटवला आहे. असे असतानाही अनेक प्रकारच्या दुर्घटना घडतात. स्त्रियांवर अद्यापही अन्याय, अत्याचार होतात, याबाबत खेद वाटतो. त्यामुळे आपण सगळ्यांनी मिळून पुन्हा विचार करण्याची गरज आहे. याच विचारातून आदर्श असणाऱ्या महिलांना समाजासमोर आणण्याची गरज आहे,’’ असे खासदार विजय दर्डा म्हणाले.

तब्बल साडेतीन तास चाललेल्या या कार्यक्रमातून स्त्रीशक्तीची अनेक रूपे समोर आली. स्त्रीशक्तीची रूपे आणि ‘मी जशी आहे, तशी आहे’ या संकल्पनेवरील रॅम्पवॉकने प्रेक्षकांना अंतर्मुख केले. त्याचबरोबर, प्रसिद्ध लेखिका शोभा डे यांनी घेतलेल्या मुलाखतीतून जया बच्चन यांचा जीवनप्रवास आणि विचारपरंपरा उलगडून दाखविली.

❖


**४थी आवृत्ती**

॥ अन्नपुराण ॥

आयुर्वेदिक • आधुनिक



**लेखक** - डॉ. अरविंद लिमये

**किंमत : ४२०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

चरकाचार्यांनी हजारो वर्षांपूर्वी आहारातूनच रोग उत्पन्न होतात, असे म्हटले आहे. त्याकाळी पाणी व आहारद्रव्ये प्रदूषित व भेसळयुक्त नव्हती. आज २१व्या शतकात प्रदूषण, रासायनिक खते व भेसळ यामुळे आहारद्रव्ये नि:सत्त्व व प्रदूषित झाल्याने, चुकीच्या आहारामुळे रोग होण्याचे प्रमाण निश्चितच वाढले आहे. प्रत्येक नागरिकास आहारद्रव्यांचे गुणधर्म माहीत

असणे व आहार नियोजन समजणे, हे आवश्यक आहे. यासाठीच आयुर्वेदिक व आधुनिक चश्म्यातून मांसाहार व शाकाहारातील तृणधान्ये, कडधान्ये, फळभाज्या-पालेभाज्या, फळे, मसाले, सुकामेवा, दुग्धजन्य पदार्थ, शीत-उष्ण पेये, साखर-गूळ यांसारख्या रोजच्या व्यवहारातील २५० अन्नद्रव्यांचे विवेचन म्हणजेच अन्नपुराण.





# पुस्तक परिचय

### पांडुरंग खानखोजे यांचे चरित्र

## मी कधीही माफी मागणार नाही



सावित्री साव्हनी यांचा जन्म १९३८ मध्ये मेक्सिकोमध्ये झाला. १९५६ मध्ये जवळजवळ पन्नास वर्षांचा, परकीय भूमीवरचा वनवास संपवून, त्यांचे वडील पांडुरंग खानखोजे जेव्हा मायदेशी परतले, त्या वेळी साव्हनी भारतात आल्या. त्यांची बेल्जियम आई जेनी ही सुद्धा त्यांच्याबरोबर भारतात आली. लेखिका बालरोगतज्ज्ञ असून, बहुभाषीदेखील आहेत. त्यांचे India Mexico : Encounters and Similarties हे पुस्तक मॅकमिलन प्रकाशनातर्फे प्रकाशित झाले आहे. दिल्लीमध्ये त्यांचे वास्तव्य आहे. निवृत्त ब्रिगेडिअर व्ही. के. साव्हनी हे त्यांचे पती. त्यांची कन्या केमिकल इंजिनिअर असून, मुलगा भारतीय नौदलात कमांडर आहे.




लेखक
**सावित्री साव्हानी**

अनुवाद
**अवंती महाजन**

ब्रिटिशांच्या जोखडाखालचे आयुष्य; हे आपले आयुष्य नव्हे, याची जाणीव पांडुरंग खानखोजेंना लवकरच झाली. अर्थात त्यावेळचे भारताचे शासनकर्तेही तितकेच सावध होते. हा तरुण आपल्याला त्रासदायक ठरणार, आपल्या एकहाती, अनिर्बंध सत्तेला विरोध करणार, हे त्यांच्या लक्षात आले होते. स्वत:मधील दाहक क्षात्रतेजाचा शोध घेतच खानखोजेंनी देश सोडला आणि नजरेसमोरचे स्वतंत्र मातृभूमीचे स्वप्न क्षणभरही नजरेआड होऊ न देता, हा स्वाभिमानी राष्ट्रभक्त देशोदेशी, खंडा-खंडांतून हिंडला.

स्फोटके बनविणे आणि युद्धशास्त्रात प्रशिक्षण घेतल्यानंतर, अन्य ब्रिटिशांची सत्ता उलथवून टाकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आपल्यासारख्याच सहकाऱ्यांच्या शोधात खानखोजे जगभर हिंडले. अमेरिकेमध्ये त्यांनी अभिनव अशा ‘गदर पार्टी’ची स्थापना केली. त्यातल्या बऱ्याच सभासदांना नंतर ब्रिटिशांनी फासावर चढविले.

परंतु मन मात्र सदासर्वकाळ मातृभूमीकडे ओढघेत होते. काहीही करून खानखोजेंना भारतात परत यायचेच होते. ही गोष्ट घडायला तब्बल चाळीस वर्षांचा कालावधी जावा लागला खरा; परंतु ते भारतात परत आलेच!

# डॉ. पांडुरंग खानखोजे यांच्या कन्येचे मनोगत

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास सर्वांशाने लिहिला गेलेला नाही. ब्रिटिशांच्या पहिल्या अन्यायाशी तो सुरू होतो; १८५७मध्ये योग्य ते वळण आणि आकार घेत, अखेर युगप्रवर्तक अशा अहिंसेच्या तत्त्वज्ञानाशी संपतो. सरत्या काळाबरोबर अनेक क्रांतिकारकांच्या कार्याबद्दल धूसरता येणे, त्यांचा सहभाग दुर्लक्षित होणे अथवा विस्मरणात जाणे स्वाभाविक आहे. 'गदर चळवळ' हा भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा असाच एक हिस्सा आहे. गदरच्या क्रांतिकारकांच्या महत्त्वाकांक्षा, त्यांचे शौर्य इत्यादींचा स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात अभावानेच उल्लेख आढळतो. भारताचा इतिहास हा माझ्या अभ्यासाचा विषय कधीच नव्हता; तरीही स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाचा झालेला विपर्यास, दुर्लक्षित राहिलेले अनेक पैलू आणि निरनिराळ्या पद्धतीने प्रस्तुत करण्यात आलेल्या इतिहासामागचे राजकीय पूर्वग्रह मनाला त्रास देतातच. माझे वडील पांडुरंग खानखोजे हे गदरचे क्रांतिकारक होते. हे पुस्तक म्हणजे त्यांचे चरित्र आणि त्या अनुषंगाने गदर चळवळीची कथा आहे.

ब्रिटिशांचा रोष ओढवून घेतल्यामुळे, १९०६मध्ये पांडुरंग खानखोजे यांनी भारत सोडला. गदर चळवळीची स्थापना करण्यात त्यांनी पुढाकार घेतला आणि या चळवळीच्या लष्करी विभागाचे नेतृत्व केले. भारताच्या स्वातंत्र्याच्या तळमळीपोटी त्यांनी जपान, अमेरिका, पर्शिया आणि रशिया असा प्रदीर्घ प्रवास करत, त्याकाळातील सातासमुद्रापार प्रवासास प्रतिबंध करणारी हिंदू परंपरा मोडीत काढली. पर्शियामध्ये ते ब्रिटिशांविरुद्ध रणांगणात उतरले, आणि अशा तऱ्हेनी आज जवळजवळ अज्ञात असलेल्या भारतीय इतिहासाचा एक भाग झाले.

१९१४मध्ये मेक्सिकोने त्यांना आश्रय दिला. तिथे ते प्रसिद्ध शेती शास्त्रज्ञ म्हणून नावारूपाला आले. मका आणि गव्हावरील त्यांचे अत्यंत मूलभूत स्वरूपाचे संशोधन म्हणजे भारतातील 'हरित क्रांती'चे बीजस्वरूप कार्य म्हणावे लागेल. गरीब मेक्सिकन शेतकऱ्यांसाठी त्यांनी अतिशय कष्ट घेतले. ठिकठिकाणी तीसपेक्षा जास्त विनामूल्य शेतकी शाळा त्यांनी सुरू केल्या. १९४९मध्ये स्वातंत्र्यानंतरचे भारताचे शेती धोरण निश्चित करण्यासाठी नेमलेल्या, ॲग्रिकल्चरल पॉलिसी कमिटीचे अध्यक्षपद

स्वीकारण्यासाठी त्यांना आमंत्रण देण्यात आले. ही त्यांची भारत भेट म्हणजे समितीच्या कामाबरोबरच, भारत आणि मेक्सिको दरम्यान राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरली. ते मेक्सिकोला परत गेले, काही काळ तिथे राहून अखेर १९५५मध्ये कायमचे भारतात परतले. मातृभूमीच्या मातीतच त्यांनी १९६७मध्ये अखेरचा श्वास घेतला. माझा जन्म मेक्सिकोमध्ये झाला. मी अठरा वर्षांची असताना, माझे भवितव्य घडविण्यासाठी म्हणून भारतात आले. माझ्या वडिलांनी, भारताबद्दलच्या प्रेमाची, अभिमानाची मला दिलेली 'दीक्षा' माझ्या मनात खोलवर रुजली होती. तेव्हापासून मी भारतातच आहे.

स्वत:च्या आई किंवा वडिलांच्या आयुष्याकडे पाहताना, त्यांच्या कार्याबद्दल बोलताना, कितीही वस्तुनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारायचा म्हटला, तरी ती अतिशय अवघड गोष्ट आहे. हे चरित्र लिहिण्यामागे, माझे वडिलांबद्दलचे केवळ प्रेमच आहे असे नाही; तर त्यांची कन्या म्हणून मी ते माझे कर्तव्य समजते. शिवाय, आजवर मी मनात जो विश्वास, ज्या श्रद्धा जोपासल्या, त्याही या निमित्ताने पुन्हा एकदा मला तपासून पाहता आल्या; परंतु या सर्वांपेक्षा अधिक प्रबळ प्रेरणा यामागे आहे, ती म्हणजे माझ्या पूर्वजांच्या देशाबद्दल – या भारत देशाबद्दल माझ्या मनात असलेल्या आत्यंतिक प्रेमाचा पुनरुच्चार करणे. ज्या भावनिक, सांस्कृतिक ओढीने मला भारतात खेचून आणले, इथे रुळणे सोपे केले, त्याच ओढीने, या अनोळखी राहिलेल्या क्रांतिकारकाची कथा लिहिणे, मला भाग पडले.

ही कथा आहे, लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने, देशभक्तीच्या भावनेने पेटून उठलेल्या तरुण मुलाची. ही कथा आहे, काळाबरोबर राहून, मोठा होत होत आंतरराष्ट्रीय घडामोडींचा साक्षीदार झालेल्या एका छोट्याशा गावातील मुलाची; पण त्याहूनही अधिक सजग झालेल्या तरुण मनाची! जुन्या, परपंरागत मूल्यांना चिकटून बसलेल्या, संकुचित वृत्तीच्या एका ब्राह्मण मुलाचे आधुनिक समाजवादी निधर्मी विचारसरणीच्या, मानवतेवर श्रद्धा असणाऱ्या व्यक्तीमध्ये रूपांतर झाल्याची ही कथा आहे. सामाजिक बदल घडण्यासाठी शतकांचा काळ जावा लागतो. या वेदनामय वाटचालीत बरेच वेळा हिंसा आणि क्रांती या प्रक्रियेची सोबत करतात. ही कथा आहे, अशाच एका उत्क्रांतीची. ही कथा दोन बड्या राष्ट्रांचीसुद्धा आहे. भारत आणि मेक्सिको या दोन बड्या राष्ट्रांचा, त्यांची वैचारिक बैठक तयार करण्यात,

व्यक्तिमत्त्व घडविण्यात महत्त्वाचा वाटा आहे.

गदरचा इतिहास लिहिणे, हा आमच्या कुटुंबात सतत चर्चेचा विषय असायचा. सगळ्यांच्या तोंडी हे एकच पालुपद असायचे. वयाच्या साठीनंतर लगेच माझ्या वडिलांनी गदरच्या इतिहासावर मराठीतून एक लेखमाला लिहायला सुरुवात केली. 'केसरी' या वृत्तपत्रातून ती प्रसिद्ध होऊ लागली. परंतु ती अपूर्णच राहिली. त्यानंतर बऱ्याच कालावधीने, गदरचा इतिहास पुढच्या पिढ्यांना कधीच कळणार नाही, अशी भीती वाटल्यामुळे त्यांनी पुन्हा हे लिखाण सुरू केले. दोन्ही डोळ्यांना मोतीबिंदू झाल्यामुळे त्यांची दृष्टी क्षीण होत चालली होती; पण त्यांची चिकाटी जबरदस्त होती. तासन्तास ते लिहीत असायचे. संदर्भासाठी त्यांनी बरीच पुस्तके जमा केली होती; पण घटना त्यांच्या मनात, जशाच्या तशा ताज्या असायच्या. त्या आठवणींवरच ते अधिक करून अवलंबून असायचे. मातृभाषा मराठीमधूनच लिखाण करणे त्यांना सोयीचे वाटायचे, आवडायचे. इंग्रजीमधून लिहिण्याचा कधी त्यांनी विचारही केला नाही. त्यांचे इंग्रजी हस्ताक्षर लावणे, हे एक अवघड काम असायचे, माझे शालेय शिक्षण मराठी माध्यमातून झालेले नसल्याने मराठीत लिहिलेले समजणे मला अशक्य होते. याबाबतीत मला माझे मराठी भाषिक पेशंट ए. व्ही. क्षीरसागर यांचे आभारच मानायला हवेत. त्यांनी मला वडिलांनी लिहिलेले सर्व लिखाण वाचून दाखविले, उलगडून सांगितले. त्या लिखाणाचा, या पुस्तकात मी जागोजागी भरपूर उपयोग करून घेतला आहे. पुस्तकात इटॅलिक्समध्ये जो मजकूर छापलेला आहे, तो सर्व माझ्या वडिलांच्या लेखांमधून वा पत्रांमधून जसाच्या तसा घेतलेला आहे. त्यांच्यात आणि माझ्यात वेळोवेळी जे संभाषण झाले, त्याचा अनुवाद करण्याचे स्वातंत्र्य मी घेतले आहे आणि त्यातील भाव-भावना जशाच्या तशा वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.

इतिहासाला गदर चळवळीचा विसर पडेल, अशी जी भीती त्यांना वाटत होती, ती खरीच ठरली. आज गदरबद्दल सामान्य जनतेला फारच कमी माहिती आहे. या चळवळीचे खरे पुरस्कर्ते – ज्यांनी त्यात प्रत्यक्ष भाग घेतला – त्यांना गुप्ततेचे बंधन होते आणि खऱ्याखुऱ्या, जातिवंत हुतात्म्यांप्रमाणे त्यांनी ते बंधन जिवापाड पाळले. **माझी बेल्जियम आई जेनी सिनडिक हिच्या मदतीशिवाय ही कथा लिहिणे शक्यच झाले नसते,** तिने अत्यंत जबाबदारीने, माझ्या वडिलांनी अगदी सहज म्हणूनही खरडलेला प्रत्येक

कागदाचा तुकडाही जपून ठेवला. त्यांचा प्रत्येक लेख, प्रत्येक पत्र, त्यांची कात्रणे भविष्यकाळातील संदर्भासाठी म्हणून तिने सांभाळून ठेवली. त्यांचा छायाचित्रणांचा भला मोठा संग्रह, शोधनिबंध, अगदी कालबाह्य झालेली पुस्तकेसुद्धा, त्यांनी लिहिलेल्या फारशा महत्त्वाच्या नसलेल्या आठवणींसह अतिशय काळजीपूर्वक, व्यवस्थितरीत्या तिने जतन केल्या. तिची त्यांच्यावरची निष्ठाच मुळात अतुलनीय अशी होती. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर, पाश्चिमात्य जगतात परत जायचे तिने ठामपणे नाकारले. त्या जगात आता आपल्याला स्थान नाही, अशी तिची भावना होती. माझ्या बहिणीचे – मायाचे आमंत्रण स्वीकारून ती मेक्सिकोला गेली खरी; पण दोन वर्षांच्या आतच भारतात परतली आणि त्यानंतर ती कायमची भारतातच राहिली. १९९१मध्ये तिचे निधन झाले. तिच्या इच्छेनुसार तिच्यावर हिंदू पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. मुलींवरचे प्रेम, नातवंडांची माया जपत, तिने या घरून त्या घरी असा वेळ काढला, पण मनातून ती कायम वडिलांच्या आठवणींनी व्याकूळ असायची. म्हातारे होणे तिने नाकारले, पक्षाचे कामही केले; पण मनाच्या अगदी तळातून, तिच्या असामान्य अशा पतीच्या विरहाच्या दु:खाने ती नेहमीच जळत राहिली.

माझ्या आयुष्यावर माझ्या वडिलांचा जबरदस्त प्रभाव होता; पण त्यांच्या अतिशय शांत आणि समजूतदार स्वभावानुसार त्यांनी त्यांच्या इच्छा-आकांक्षा माझ्यावर कधीही लादल्या नाहीत. माझा जन्म झाला त्या वेळी त्यांना पहिली पौराणिक-कथा आठवली ती सत्यवान-सावित्रीची. म्हणून त्यांनी माझे नाव ‘सावित्री’ ठेवले. माझ्या बहिणीचे नाव ‘माया’ ठेवण्यात आले, कारण ते भारत आणि मेक्सिको दोन्हीकडे प्रचलित होते.

*माझ्या आयुष्यभर मी वडिलांजवळ राहिले आणि त्यांच्या दोन मुलींपैकी मोठी मुलगी असल्याने मेक्सिकोमध्ये मला त्यांच्याबरोबर अधिक प्रवास करण्याची संधी मिळाली. कधी कधीच मायाला आमच्याबरोबर यायची परवानगी मिळायची, तीही तिच्या मोठ्या आणि अधिकार गाजविणाऱ्या ‘ताईच्या’ देखरेखीखाली! नंतरच्या काळात, भारतात परत आल्यावरही मी त्यांच्याबरोबर बराच प्रवास केला. आणि शक्य तेवढ्या सार्वजनिक समारंभांनाही उपस्थित राहिले.*

रामनवमीला काटोलच्या रामाच्या देवळात जायला मला फार आवडायचे. एकूणच मी या अद्भुत अशा देशात खूप लवकर रुळले –

साड्या नेसू लागले, मोडकं-तोडकं का होईना, मराठी बोलू लागले – अगदी नात्यातल्या लग्नांमध्ये पंगतीही वाढू लागले.

वैद्यकीय शिक्षण घेण्याची माझी इच्छा माझ्या वडिलांनी मनापासून मान्य केली. वैद्यकीय पदवी घेतल्यानंतर मी दूरवरच्या हाकांना प्रतिसाद देणाऱ्या माझ्या पतीबरोबर उत्तर पूर्वेला, अगदी आतल्या भागात – अंदमान-निकोबारला गेले. त्यानंतर लष्कराने त्यांना जिथे-जिथे पाठविले, तिथेही मी त्यांच्याबरोबर होते. या काळात मला अगदी मूलभूत अशी वैद्यकीय सेवा करता आली. कधी पुण्याजवळच्या खडकीमधील औद्योगिक कामगार, तर कधी निकोबार-शिलाँगमधील आदिवासी अशांची माझ्या पद्धतीने सेवा करताना, 'मी भारतीय जनतेची सेवा करावी.' ही माझ्या वडिलांची इच्छा मी पूर्ण करू शकले, याचे मला समाधान वाटते. अखेर मी दिल्लीमध्ये वैद्यकीय व्यवसायात स्थिरावले.

अत्यंत वैविध्यपूर्ण आणि रंगीबेरंगी अनुभव घेऊनही, माझे वडील मनाने निरागस आणि अलिप्त असेच राहिले. आयुष्याकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन नेहमी एखाद्या तरुणाप्रमाणे उत्साहाचा, कळकळीचा असायचा. अनेक विषयांत त्यांना गोडी होती आणि त्यामुळे आमची मने समृद्ध झाली. त्यांच्या अनुभवाच्या कथांनी आमचे बरेच बालपण व्यापलेले होते, या कथा नेहमीच काही केवळ उपदेशच करणाऱ्या असायच्या असेही नाही. आम्ही लहान असताना ते जपानमध्ये राहात असतानाचा एक किस्सा इतका रंगवून वारंवार सांगायचे की, आम्हा दोघी बहिणींची हसता-हसता पुरेवाट व्हायची. ते ज्या जपानी कुटुंबात राहात होते, त्या लोकांना 'त्यांना बाथरूमला जायचे आहे.' ही गोष्ट कशीही सांगितली, तरी काहीकेल्या समजेना. अखेर अभिनय करून आपण त्या लोकांना आपली 'घाई' कशी लक्षात आणून दिली, हा त्यांचा किस्सा म्हणजे लहानपणी आमची अगदी आवडती गोष्ट होती.

**सतत नवीन काहीतरी करून पाहायला त्यांना आवडत असे आणि प्रत्येक नवीन अनुभवाचे त्यांना लहान मुलाप्रमाणे आश्चर्य वाटत असे. माझ्याही नकळत, त्यांच्या खास शैलीत त्यांनी भारताबद्दलचे प्रेम माझ्या मनावर असे काही बिंबविले की, त्यामुळे माझ्या भवितव्याला दिशा मिळाली, माझा देश, माझी माणसे मिळाल्याचे अपार समाधान मला मिळाले. त्यामुळेच त्यांचे चरित्र शब्दबद्ध करणे ही माझ्या दृष्टीने एक सतत पाठपुरावा करणारी अनिवार्यता होऊन बसली.** त्यासाठी काही वर्षे

मी माझा वैद्यकीय व्यवसाय थांबवला, इतर सगळ्या गोष्टी बाजूला ठेवल्या. माहिती गोळा करणे, संशोधन करणे, या गोष्टी अवघडच होत्या. कारण इतिहासात, सुरुवातीच्या क्रांतिकारक दिवसांबद्दल कुठेच उल्लेख सापडला नाही आणि वैयक्तिक पातळीवरही असा प्रयत्न कोणी करत असल्याचे समजले नाही. त्यामुळे केवळ माझ्या वडिलांच्या स्मृतींवरच अवलंबून राहावे लागले. नंतरच्या म्हणजे स्वांतत्र्योत्तर काळात मात्र, डॉ. टी.आर. सरीन, ए.सी. बोस यांच्यासारख्या इतिहासकारांनी, गदर चळवळीचा आणि त्यासाठी परदेशात असणाऱ्या क्रांतिकारकांचा सखोल अभ्यास केलेला आढळतो आणि त्याची नोंदही इतिहासात सापडते. एम.ए. परसिट्स आणि एल.व्ही. मित्रोखिन या रशियन इतिहासकारांनीही गदरचा अभ्यास केलेला आढळतो. विशेषत: डॉ. सरीन यांनी मला अतिशय सहनशीलपणे दीर्घकाळपर्यंत माझ्या लेखनाबद्दल अमूल्य सूचना आणि सल्ला दिला, याबद्दल मला त्यांचे आभार मानलेच पाहिजेत.

सिद्धार्थ वरदराजनचा इथे उल्लेख करणे, मी आवश्यक समजते. एका सायबर कॅफेमध्ये तो मला भेटला. अमेरिकेत असताना त्याने माझ्या वडिलांबद्दल ऐकले होते आणि एका परदेशी विद्यार्थ्याने माझ्या वडिलांऐवजी चुकून वीरेंद्रनाथ चटोपाध्याय यांचे छायाचित्र, त्याच्या वेबसाइटवर वापरलेले पाहून, माझ्या बहिणीने – मायाने ती चूक दुरुस्त केल्याची त्याला माहिती होती. तो माझे लेखन वाचून, सतत मला प्रोत्साहन देत राहिला, त्याहून महत्त्वाचे म्हणजे माझ्या वडिलांचे कायमचे भारतात परत येणे; योग्य दृष्टिकोनातून मांडण्यासाठी त्याने मला अनमोल अशी मदत केली. त्याबद्दल मी त्याची कायमची ऋणी आहे.

प्रत्येकाचा वैयक्तिकरित्या उल्लेख करणे इथे शक्य नसले, तरी असे अनेक लोक आहेत, ज्यांनी मला अतिशय चिकाटीने वडिलांबद्दल सतत सांगितले. त्या सर्वांचे आभार मानायलाच पाहिजेत. विशेषत: माझा चुलत भाऊ सुधाकर खानखोजे आणि भाचा सुनील खानखोजे हे दोघे खास माझे लेखन वाचून पाहण्याकरिता नागपूरहून थेट दिल्लीला आले होते. माझे पती विजय यांचे तर खास आभार मानले पाहिजेत, ज्यांनी माझे हस्तलिखित वारंवार वाचून संपादनात आस्थेवाईकपणे मदत केली. शेवटी सर्वांत महत्त्वाची माझी बहीण – माया खानखोजे – या पुस्तकामागची माझी प्रेरणा – तिने केलेल्या आर्थिक मदतीशिवाय वडिलांबद्दलच्या संशोधनाचे काम

नवं कोरे

# माझ्या अम्मीची गोष्ट




मूळ अरबी लेखक - **हॅनन अल-शेख**

इंग्रजी अनुवाद - **रॉजर ॲलन**

अनुवाद - **वंदना अनुप कुंडेटकर**

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

लेबनानमधील आयुष्याच्या स्मृती जागवणारं हे एक सुंदर वस्त्र आहे. 'द लोकस्ट ॲन्ड द बर्ड' ही एक कमालीची हलवून टाकणारी संस्मरणिका आहे, जी एका पूर्णपणे वेगळ्या आणि सच्च्या आवाजात सांगितली गेली आहे. हे एका स्त्रीच्या आयुष्याचं विलक्षण शब्दवर्णन आहे. जे आपल्याला अरब जगतातील स्त्रियांच्या आयुष्याकडे पाहण्याची अंतर्दृष्टी देतं.

पूर्णत्वाला जाऊ शकले नसते. इंटरनेटवर तासन्तास ती नवनवीन संदर्भ शोधत बसायची. अनेक संदर्भ ग्रंथ तिने मला विकतही घेऊन दिले.

हे पुस्तक मी माझ्या नातवंडांना – वीर आणि कबीरला अर्पण करते. त्यांच्या पणजोबांकडून त्यांना ठिणगीच्यारूपाने जो वारसा मिळाला आहे, त्या ठिणगीची ज्योत होऊन, ती त्यांना त्यांच्या महान वारशाशी एकनिष्ठ राहण्याची प्रेरणा देईल, अशी आशा आहे!

**मे, २००८** **– सावित्री साव्हनी**

# क्रांतिकारक ते शांतिदूत : एक विलक्षण प्रवास

खानखोजे आता आपल्या जुन्या आवडत्या 'प्रचारका'च्या भूमिकेत शिरले. शेतकरी हाच भारताचा खरा कणा आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे त्यांनी त्यांच्याशी संवाद साधणे सुरू केले. सर्वांत महत्त्वाचा धर्म म्हणजे शिक्षण आणि प्रभावी, सक्षम अशा शिक्षणपद्धतीच्या अभावीच सर्व तऱ्हेच्या प्रतिकूल परिस्थितीला, अनेक समस्यांना भारतीयांना तोंड द्यावे लागत आहे, याची त्यांना खातरी होती.

आकाशवाणी नागपूर केंद्राने, 'मान्सून सेरीज' या शीर्षकाखाली शेतकऱ्यांसाठी एक भाषण मालिका गुंफण्याचे आमंत्रण खानखोजेंना दिले. शेतीबद्दल मार्गदर्शन किंवा सल्ला मिळण्याचे दुसरे कोणतेच साधन शेतकऱ्यांना उपलब्ध नव्हते. या भाषणांचे विषय अगदी रोजच्या कामांपासून ते विशिष्ट प्रकारच्या कामांबाबतच्या छोट्या-छोट्या सूचना, सल्ल्यांपर्यंत असे अगदी व्यावहारिक आणि साधे असत. त्यामुळे खानखोजेंची ही भाषणे खूप लोकप्रिय झाली आणि ही मालिका बरीच वर्षे सुरू राहिली.

१९५७मध्ये १८५७च्या बंडाची शताब्दी देशभर साजरी झाली. खानखोजेंनी या विषयावर ठिकठिकाणी भाषणे दिली, मुलाखती दिल्या. त्यात त्यांनी या बंडाचा 'भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध' असा गौरव केला. 'तरुण भारत'मधील एका लेखात त्यांनी गदर चळवळ हे भारताचे दुसरे स्वातंत्र्य युद्ध असल्याच्या मुद्यावर भर दिला आणि म्हटले की, देशाने अहिंसेच्या चळवळीची कास धरली असली, तरीही सुभाषचंद्र बोस आणि त्यांची इंडियन नॅशनल आर्मी यांनी भारतीय स्वातंत्र्य इतिहासाचे एक नवीन पर्व सुरू केले. इतकेच नाहीतर एका अर्थी गदरने चालविलेल्या चळवळीला

संपूर्ण यश मिळवून देण्याच्या स्थितीपर्यंत आणून ठेवण्याची कामगिरी बजावली. इंडियन नॅशनल आर्मी म्हणजे खरोखर भारताचे तिसरे स्वातंत्र्य युद्ध होते असे खानखोजे ठामपणे म्हणत असत.

१९५७मध्ये इंडियन कौन्सिल फॉर ॲग्रिकल्चरल रिसर्चचे सदस्य म्हणून खानखोजेंची नियुक्ती झाली. ही कामे करत असताना खानखोजे प्रयोगशीलतेबाबत नेहमी दक्ष असत. सतत निरनिराळे घरगुती प्रयोग करून निरनिराळ्या कल्पना, युक्त्या लढवून, सोयाबीनचा उपयोग लोकांनी वाढवावा, सोयाबीनला प्रसिद्धी मिळावी, यासाठी ते प्रयत्नशील असत. त्यांच्या संशोधनाने त्यांना आणखी एक खातरी पटली होती की, योग्य तऱ्हेने भाजलेल्या आणि प्रक्रिया केलेल्या टरोटाच्या बिया कॉफीला चांगला आणि स्वस्त पर्याय होऊ शकतो. आपल्या दैनंदिन जीवनात आपल्या भोवती उगविणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या गवतांचे उपयोग आणि त्यांचा वापर कसा करावा, या विषयी खानखोजेंनी असंख्य लेख लिहिले होते. त्यांच्या मनातील शास्त्रीय कुतूहल कधीच शमले नाही. आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत कडुनिंब, तुळस इत्यादी वनस्पतींमधील व्हिटॅमिन्स आणि इतर औषधी गुणांवर ते सतत संशोधन करत राहिले. एक कुशल वैज्ञानिक म्हणून त्यांच्या दूरदृष्टीला, साध्या-साध्या वनस्पतींमध्ये आजकालच्या 'हर्बल उपचार क्रांती'च्या कितीतरी आधी, मोठ्या व्यापारी संधी दिसल्या होत्या.

डिसेंबर, १९५८मध्ये त्यांना 'ऑल इंडिया रेव्होल्युशनरीज अँड मार्टिअर्स मेमोरिअल कमिटी'कडून दिल्लीमध्ये होणाऱ्या बैठकीचे आमंत्रण आले. या निमित्ताने बरेच जुने क्रांतिकारक एकत्र येऊन त्यांनी 'शहीद भवन' नावाचे स्मारक उभे करण्याचे ठरविले. बैठकीच्या वेळी भूपेंद्रनाथ दत्त, सरदार सोहन सिंग बखना यांसारखे जुने क्रांतिकारक मित्र भेटले आणि खानखोजेंचे मन आनंदून गेले. सगळ्या मित्रांनी मिळून क्रांतीचा इतिहास सतत ताजा ठेवायचा निश्चय केला. 'इतिहास बदलण्याचा प्रयत्न करत, स्वातंत्र्याचे श्रेय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढणाऱ्या एका विशिष्ट गटाला देण्याच्या अत्यंत हीन, दुष्ट अशा कटकारस्थानाबद्दल ही मंडळी, अतिशय त्वेषाने बोलत होती.' यापूर्वीच या लोकांना ही जाणीव व्हायला लागली होती की, स्वातंत्र्यासाठी अहिंसेचा मार्ग वगळता बाकी इतर मार्गांनी लढलेल्या क्रांतिकारकांना पद्धतशीरपणे दूर करण्यात येत आहे, एखाद्या खड्याप्रमाणे वेचून त्यांना बाजूला काढण्यात येत आहे. बैठकीसाठी आलेल्या सर्व

क्रांतिकारकांना 'तीन मूर्ती' या पंतप्रधानांच्या निवासस्थानी चहाचे आमंत्रण होते. त्याच संध्याकाळी, सहकाऱ्यांच्या आग्रहावरून खानखोजेंचा पंडित नेहरूंच्या हस्ते खास हार घालून सत्कार करण्यात आला.

त्याचवर्षी इंडियन फार्मिंग नावाच्या मासिकातील खानखोजेंच्या 'रिसर्च ऑफ अ प्रॅक्टिकल काइंड' या शीर्षकाच्या लेखाच्या निमित्ताने, खानखोजेंचे संशोधन या विषयावरील विचार वाचकांसमोर मांडले गेले. ग्रामीण संशोधन या विषयाचे महत्त्व, अमेरिकेसारख्या प्रगतिशील देशांमध्ये जितके मान्य झालेले आहे, तितके ते अजून भारतीयांना समजलेले नाही. 'ग्रामीण विद्यापीठे' ही त्या देशांमध्ये विकासाची, प्रगतीची केंद्रे बनली आहेत; उलट आपल्याकडच्या कित्येक शिकल्या-सवरलेल्या लोकांनाही 'ग्रामीण विद्यापीठ' ही संकल्पनाच मुळात उलगडलेली नाही.


शेतकी संस्थांना भेटणे, त्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांना सल्ला देण्याचे काम करत असतानाच खानखोजेंना आणखी एक काम मागे लागले होते ते म्हणजे – विविध राजकीय पक्षांच्या, त्यांच्या पक्षात सामील होण्यासाठीच्या आमंत्रणांना ठाम नकार देणे. नॅशनल अर्काइव्ह्ज ऑफ इंडियाने त्यांची भाषणे ध्वनिमुद्रित केली, तर स्वातंत्र्य लढ्यावरील त्यांचे कित्येक लेख विविध वृत्तपत्रांनी, नियतकालिकांनी प्रसिद्ध केले.

अमेरिकेहून खानखोजेंचे एक क्रांतिकारक मित्र त्यांना भेटायला आले होते. आणि कॅप्टन व्ही. के. साव्हनी या माझ्या नियोजित पतींनी दिलेल्या आमंत्रणावरून, दोघेही नागपूरच्या सीताबर्डी किल्ल्याला भेट द्यायला गेले. त्या वेळी या किल्ल्याशी निगडित स्मृती जाग्या झाल्या. खानखोजे म्हणाले, 'त्या काळातल्या आमच्या पोरकटपणाची कल्पना करा. आम्ही मुलांनी या किल्ल्याला वेढा घालून तो जिंकायचा बेत केला होता. पोलिसांनी आम्हाला जवळ-जवळ अटकच केली होती. आणि आता या परिस्थितीत तब्बल पन्नास वर्षांनंतर पुन्हा याच किल्ल्यावर किती वेगळेच वाटते आहे!' यावर खानखोजेंचा मित्र गमतीच्या सुरात त्यांना म्हणाला, 'हो ना. या किल्ल्यापर्यंत पुन्हा पोहोचण्यासाठी तुला तीन वेळा जगप्रदक्षिणा करावी लागली!'

जेनी एकदा दिल्लीला गेली असताना राधाकृष्णन यांना भेटावयास गेली होती. ते मेक्सिकोला गेले होते. तेव्हापासून जेनीला ओळखत होते. त्या छोट्याशा, अनौपचारिक भेटीत, तिने धाडस करून राधाकृष्णन यांना विचारले होते, 'पोटात अन्नाचा दाणा नसताना, तुमच्या महान भारतीय

**नवं कोरे**

# स्वप्न व्यवस्थापकाचे




**मूळ लेखक** - मॅथ्यू केली

**अनुवाद** - सुनीति काणे

**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

तुमच्या कंपनीतले कर्मचारी नोकऱ्या सोडून जात आहेत?
त्यांचं कामावरचं चित्त उडत आहे?
त्यांना टिकवून धरून, त्यांची निष्ठा मिळवण्यासाठी काय करता येईल?
जाणून घ्या या बोधकथेद्वारे!
या बोधकथेतली तत्त्वं इतर नातेसंबंध सुधारण्यासाठीही उपयुक्त ठरतील!
तुम्ही कंपनीचे व्यवस्थापक असा, शाळेचे मुख्याध्यापक असा, पालक असा किंवा पती असा; सर्वांनाच
'द ड्रीम मॅनेजर' पुस्तकातील संकल्पना उपयुक्त ठरणार आहे.

तत्त्वज्ञानाचा काय उपयोग आहे.' राधाकृष्णन यांनी यावर समजदारपणे गप्प राहणेच पसंत केले.

**खानखोजेंच्या अखेरच्या काळात त्यांनी मान्य केले होते की, हिंसा आणि रक्तरंजित क्रांती भारताच्या मातीत कधीही यशस्वी होणार नाही. वेदांचा अभ्यास केल्याने त्यांच्यामध्ये एक प्रकारची वैचारिक प्रगल्भता आली होती. त्याचबरोबर त्यांनी कुराण समजून घेतले होते आणि बुद्धाचे तत्त्वज्ञानही अभ्यासले होते. या सर्व अभ्यासाचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर विचारांवर खूप खोल परिणाम झाला होता. त्यांच्यातील सळसळत्या रक्ताचा क्रांतिकारक लोप पावून, संपूर्ण मानव जातीसाठी अपार करुणा, प्रेम मनात घेऊन, तिच्या हिताचाच विचार करणारा एक मानवधर्मी उदयाला आला होता.**

१९६०च्या सुमारास खानखोजेंना निवृत्तीचे वेध लागले होते. तसे वरवर पाहता ते त्यांची कामे नेहमीच्या उत्साहाने करत होते, परंतु हळूहळू कोणाच्या लक्षातही येणार नाही, अशातऱ्हेने खानखोजे भोवतालच्या जगापासून मनाने दूर-दूर जाऊ लागले होते. बरेचदा ते नि:शब्द, शांत बसून असायचे. अपवाद फक्त कुठे अन्याय होताना दिसला, तरच त्याच्या प्रतिकारासाठी पुढे व्हायचे. खास करून सफाई कामगार, रस्ते झाडणारे अशांना त्यांनी नेहमी मदतीचा हात दिला. घरात असताना त्यांनी कधीही जेनीने आणलेले कपडे वापरले नाहीत. त्यापेक्षा त्यांचे जुने झालेले जवळ-जवळ विटलेले कपडेच वापरणे त्यांना आवडायचे. त्यांचे हे नवीन कपडे म्हणजे दारावर आलेल्या गरजू-गरीब माणसाचीच धन असायचे.

भारत सरकारने खानखोजेंची भारतीय नागरिकत्वाची सर्व कागदपत्रे सन्मानाने परत केली. खानखोजे हे 'भारताचेच सुपुत्र' असून, त्यांना कधीही 'परदेशी' गणले जाणार नाही, अशी खातरी त्यांना देण्यात आली. आयुष्यभरासाठी महिना २५० रुपयांचे निवृत्तीवेतन त्यांना देण्यात येऊ लागले. त्यांनी बजावलेल्या देशसेवेचा सन्मान म्हणून २,००० रुपयांचे बक्षीसही सरकारतर्फे त्यांना देण्यात आले.

अतिशय साध्या पद्धतीने माझा विवाह झाला. पाहुणे-आमंत्रण पत्रिका असा कोणताही डामडौल नव्हता. माझ्या विवाहाची बातमी कळविण्यासाठी केवळ अगदी जवळच्या नातेवाइकांना आणि मित्र, स्नेह्यांना पत्रे लिहिण्यात आली होती. पण खानखोजेंबद्दल सर्वांच्या मनात इतका काही आपलेपणा –

आदर होता की, सप्टेंबर महिन्यातील विवाहाच्या दिवशी सकाळी, अनपेक्षितपणे असंख्य लोक विवाहाला उपस्थित राहिले आणि केवळ एक कप चहाच्या बदल्यात मला भरभरून आशीर्वाद देऊन गेले.

**१९६५मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध भडकले. त्या वेळी खानखोजे एकूणऐंशी वर्षांचे होते; पण मनाची उमेद अशी जबरदस्त होती की, ते सैन्यात भरती व्हायला निघाले. एखाद्या लहान मुलाच्या उत्साहाने ते सरळ नागपूरच्या विभागीय आयुक्तांपुढे जाऊन उभे राहिले. म्हणाले, 'युद्धभूमीवर वीरमरण पत्करण्याहून अधिक चांगला जीवनाचा अंत कुठला असू शकतो? जे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मी आयुष्य वेचले, त्याचे रक्षण करताना धारातीर्थी पडल्यास मला अधिक समाधान मिळेल.'**

काळ कुणासाठी थांबला आहे? हळूहळू खानखोजेंनी आपल्या जबाबदाऱ्या कमी करत आणल्या तासन् तास आपल्या आठवणी ते एका मित्राला मराठीतून सांगत असत; तो त्या लिहून घेत असे. पण त्याहून त्यांचा जास्त वेळ जायचा, तो अंगणात झाडाच्या सावलीत झोपाळ्यावर, समाधी लागल्याप्रमाणे स्वस्थपणे बसून राहण्यात! खानखोजे संन्यासाश्रमाच्या मार्गाने निघाले होते.

१९६५मध्ये मायाला मेक्सिकोमध्ये उच्च शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती मिळाली. खरे तर तिला इतक्या दूर जाऊ देण्यास खानखोजे अजिबात तयार नव्हते. 'न जाणो पुन्हा मला ती डोळ्याला दिसेल – न दिसेल,' अशी विरहाची भावना त्यांना त्रास देत होती. पण तरीही आपल्या भावनांना आवर घालून, त्यांनी मायाला मेक्सिकोला जायची, तिचे भविष्य घडविण्याची संधी न सोडण्यासाठी प्रोत्साहनच दिले. मी आई-वडिलांना भेटायला जायची, तेव्हा ते मला अतिशय स्वस्थ, शांत – सगळ्या जगापासून अलिप्त असे वाटायचे. त्यांचा जो अभ्यास चालू होता – मूळ संस्कृतमधून ते ऋग्वेद वाचत होते, त्याबद्दलच ते माझ्याशी बोलायचे. आपल्या आठवणी लिहिणे, त्यांनी कधीच सोडून दिले होते. ते फक्त धार्मिक ग्रंथांचे वाचन करीत असत. मायाने मेक्सिकोमध्ये विवाह केल्याची बातमी त्यांना समजली. एकूण मायाने आपला जोडीदार शोधून ती मेक्सिकोमध्ये स्थिरस्थावर झाली होती. दुभाष्या म्हणून तिने करिअरची सुरुवात केली होती.

१९६६च्या उन्हाळ्यात, खानखोजे आणि जेनी पुण्याजवळ खडकीला

माझ्या घरी आले. त्यांना येऊन जेमतेम काही दिवस होत नाहीत, तोच जेनीला दिल्लीहून एका नोकरीसाठी बोलावणे आले आणि ती लगेच दिल्लीला रवाना झाली. खानखोजे एकटेच माझ्याकडे होते. जेनीने आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असावे, असा त्यांचा आग्रह असायचा. म्हणूनच त्यांनी जेनीला दिल्लीला जायचा आग्रह केला.

पुण्यातील एक पत्रकार जी. व्ही. केतकर या वेळी खानखोजेंची प्रदीर्घ मुलाखत घेत होते. त्यावर आधारित त्यांनी 'रणझुंजार पी. एस. खानखोजे' नावाचे पुस्तक मराठीतून लिहिले. ही मुलाखत बरेच दिवस सुरू होती. पण ती जशी संपली तसा खानखोजेंनी नागपूरला परत जाण्याचा आग्रह धरला. आम्ही फारसे लक्ष देत नाही असे पाहून, अखेर त्यांनी 'मी एकटाच पदयात्रा करत नागपूरला जाईन' अशी धमकीच दिली. त्यांची धमकी ते खरीही करतील, तेवढी धमक अजूनही त्यांच्यात आहे, हे मला चांगलेच माहीत होते. म्हणून मग मी पदयात्रेपेक्षा आरामात आगगाडीने त्यांना नागपूरला पोहोचविले.

नागपूरला घरी परतल्यावर ते एकटेच राहू लागले होते. त्यांचा पुतण्या लक्ष्मण बाळाजी खानखोजे रोज एकदा त्यांना भेटून जात असे. येताना घरच्या जेवणाचा डबाही घेऊन येत असे. कधी अधून-मधून बायकोला, मुलींना पत्र लिहायचे, पण प्रवास करून त्यांना भेटायला जाण्याबद्दल काही म्हणायचे नाहीत. परंतु त्यांच्या मृत्यूपूर्वी काही दिवस त्यांनी जेनीला पत्र लिहून 'तिच्याविना फार एकटे, एकाकी,' वाटत असल्याचे कळविले होते. जेनीने त्यापूर्वीच रजेसाठी अर्ज करून ठेवला होता. आणि तिच्याबरोबर दिल्लीला जाऊन तिथेच दोघांनी एकत्र राहण्याचे त्यांच्याकडून कबूल करून घेतले होते. पण या सगळ्याला फार उशीर झाला होता.

१८ जानेवारी, १९६७ रोजी वयाच्या एक्क्याऐंशीव्या वर्षी खानखोजेंचे निधन झाले. योगायोग असा की, त्यांच्या आयुष्याचा शेवटचा दिवस त्यांनी शेतकी कॉलेजच्या वार्षिकोत्सवाला उपस्थित राहून, तिथल्या मैदानांवर फिरण्यात व्यतीत केला होता. समारंभाहून घरी आल्यावर ते जरा पडले. चेहऱ्यावर हास्य असतानाच त्यांना जी झोप लागली, ती अखेरचीच! फार थोडे लोक असतात, जे आयुष्यभर भगवद्‌गीतेचे सार आपल्या आचरणात आणू शकतात – 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषुकदाचन।' 'फलाची आशा न करता आपले कर्म करत राहा.' पांडुरंग खानखोजे हे त्या थोड्यांपैकी एक होते.

❖

४थी आवृत्ती

# द कंपनी ऑफ विमेन





**लेखक** - खुशवंत सिंग

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

विविध जातींच्या, धर्मांच्या, वयाच्या स्त्रियांशी मुक्त शरीरसंबंध ठेवून त्यांच्या सहवासात अहोरात्र बुडलेल्या एका कामपिसाट उद्योगपतीचं हे बिनधास्त आत्मवृत्त आहे. खुशवंत सिंग या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या लेखकानं हे सारे उष्ण अनुभव आपल्या लेखणीच्या साहाय्यानं जिवंत केले आहेत.

खुशवंत सिंग यांची 'द कंपनी ऑ विमेन'ही गेल्या दहा वर्षांतली पहिली कादंबरी. यात शेवटपर्यंत प्रेम, काम आणि वासना यांचा रिझवणारा आविष्कार आहे. तो आविष्कार कसल्याही रूढसंकेतांना न जुमानणारा आहे. वाचकाला तो चेतवतो आणि शेवटपर्यंत उत्तेजित करतो.






# पुस्तक परिचय

‘द ड्रीम मॅनेजर’ या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद

## स्वप्न व्यवस्थापकाचे

*चैतन्यशील संघाची उभारणी, व्यवस्थापन आणि प्रेरणा यासाठीचा आगळा-वेगळा मार्ग*




मॅथ्यू केली हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वक्ते आणि लेखक आहेत. त्यांच्या पुस्तकांच्या दहा लाखांहून अधिक प्रती विकल्या गेल्या आहेत आणि न्यू यॉर्क टाइम्स, वॉलस्ट्रीट जर्नल, यू. एस. ए. टुडे, पब्लिशर्स वीकली आणि अशाच अनेक इतर बेस्ट सेलर लिस्ट्‌सवर त्यांची पुस्तकं झळकली आहेत. गेल्या दहा वर्षांच्या काळात, वेगवेगळ्या प्रकारच्या संस्थांच्या बैठकींमध्ये आणि परिषदांमध्ये एकूण तीस लाख श्रोत्यांपुढे त्यांनी २५०० भाषणं केलेली आहेत. या संस्थांमध्ये फॉर्चून ५०० कंपन्या, राष्ट्रीय व्यापारी संघटना,व्यावसायिक संघटना, विश्वविद्यालयं, चर्च आणि धर्मादाय तसेच स्वयंसेवी संस्थांचा समावेश आहे.

*तुमच्या कंपनीतले कर्मचारी नोकऱ्या सोडून जात आहेत? त्यांचं कामावरचं चित्त उडत आहे? त्यांना टिकवून धरून, त्यांची निष्ठा मिळवण्यासाठी काय करता येईल? जाणून घ्या या बोधकथेद्वारे!*
*या बोधकथेतली तत्त्वं इतर नातेसंबंध सुधारण्यासाठीही उपयुक्त ठरतील! तुम्ही कंपनीचे व्यवस्थापक असा, शाळेचे मुख्याध्यापक असा, पालक असा किंवा पती असा; सर्वांनाच 'द ड्रीम मॅनेजर' पुस्तकातील संकल्पना उपयुक्त ठरणार आहे.*

मूळ लेखक
**मॅथ्यू केली**

अनुवाद
**सुनीति काणे**



# चांगले कामगार टिकून राहावे आणि चांगल्या कामगारांना संस्थेबद्दल आस्था वाटावी यासाठी काय करायला हवे?

अगदी साध्या कल्पनाच बहुश: अत्यंत प्रभावी ठरतात. आणि अनेकदा त्या असंभवनीय वाटणाऱ्या ठिकाणी उदयास येतात. ह्या दोन्ही मूलभूत संकल्पनांचा ठोस पुरावा म्हणजे मॅथ्यू केली यांचं 'द ड्रीम मॅनेजर' हे पुस्तक!

**कामगारांच्या संघटित संस्था जेव्हापासून अस्तित्वात आल्या, तेव्हापासून त्यांना प्रेरित करण्यासाठी त्यांना अधिक वेतन मिळवून देण्यासाठी आणि इतरत्र जाण्यापासून त्यांना रोखण्यासाठी, संस्थांचे प्रमुख वेगवेगळे मार्ग शोधत आले आहेत. गेल्या तीस वर्षांत आयुष्यभरासाठी एकाच कंपनीशी एकनिष्ठ राहण्याची कल्पना मागे पडत चालल्यामुळे, कामगारांना प्रेरित करून नोकरीत टिकवून कसे धरता येईल, ही काळजी वाढत चालली आहे.** आज बाजारपेठेत निष्णात कर्मचाऱ्यांचा तुटवडा वाढत चालला आहे आणि त्यामुळेच कुशल कर्मचाऱ्यांचा भाव कधी नव्हे एवढा वधारला आहे. त्यामुळे व्यावसायिक जगतात, कर्मचाऱ्यांना टिकवून धरणं ही समस्या एक डोकेदुखी बनलेली आहे, आणि ही काळजी साधार आहे!

चांगले कर्मचारी गमावल्यामुळे केवळ नवे कर्मचारी शोधण्याचा आणि त्यांना टिकवण्याचाच खर्च वाढतो – असं नव्हेतर चांगले कर्मचारी गमावणं म्हणजे धंद्याला उतरती कळा लागणं आहे, हे सुज्ञ अधिकारी जाणून असतात. अगदी पराकोटीचा छिद्रान्वेषी अधिकारीसुद्धा कबूल करतो की, ज्या मानवी भांडवलाचा इतका तुटवडा आहे, त्यांना प्रेरणा देऊन टिकवून धरता आलं, तर उद्योग-संस्थेला स्पर्धेत टिकाव धरायला खूपच बळ मिळतं.

दुर्दैवानं व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांच्या संदर्भातले तज्ज्ञ (ह्यूमन रिसोर्स प्रोफेशनल्स) आजवर कर्मचाऱ्यांना टिकवून धरण्यासाठी पगार आणि अन्य सवलती याच मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करत आले आहेत. त्यांनी पगार वाढवले, बोनसच्या रकमेत वाढकेली, स्टॉक-ऑप्शनद्वारा कंपनीचं भाग-भांडवल देऊ केलं, सुट्ट्यांचा कालावधी वाढवला, घरातले पाळीव प्राणी कामाच्या जागी आणायला कर्मचाऱ्यांना परवानगी दिली – असल्या गोष्टीतून फारसा फायदा झालेला आढळला नाही. एखाद्या नाराज

कर्मचाऱ्याला टिकवून धरण्यात यांपैकी एखाद्या क्लृप्तीद्वारे, व्यवस्थापन यशस्वी ठरलं तरी ते यश अल्पजीवी ठरतं आणि महागात पडतं, असं दिसून आलेलं आहे.

अगदी थोडेच लोक केवळ पैशांसाठी काम करत असतात, ही सत्यस्थिती आहे. आपणा सर्वांनाच पैशांची गरज आहे – आणि नोकरीबाबतच्या निर्णयात – तो एक महत्त्वाचा मुद्दा आहे, ही गोष्ट खरी आहे. परंतु लोकांना प्रेरणा देणं आणि कंपनी सोडून इतरत्र जाण्याची कल्पना कर्मचाऱ्यांना हास्यास्पद वाटेल, असं वातावरण निर्माण करणं, यासाठी पैशांखेरीज इतर काहीतरी खूप प्रभावी – आणि कमी खर्चाची कर्मचाऱ्यांना गुंतवून ठेवेल, अशी गोष्ट आवश्यक असते, ही गोष्ट कंपन्यांच्या लक्षात आलेली नसते.

निदान आतापर्यंत तरी ती लक्षात आलेली नव्हती. तुम्ही हे पुस्तक वाचू लागलात की, बहुधा तुमची प्रतिक्रियासुद्धा माझ्याप्रमाणेच होईल : 'हे आधीच कुणाला कसं सुचलं नाही? ही गोष्ट अगदी सहज लक्षात येण्याजोगी होती की!' ज्या संकल्पनेमुळे अशी प्रतिक्रिया व्यक्त होते, तीच खरी चतुराईची संकल्पना असते!

मॅथ्यू केलीनं शोधलेल्या संकल्पनेचं खरं महत्त्व असं आहे की, त्यानं लावलेला शोध जितका कर्मचाऱ्यांच्या फायद्याचा आहे, तेवढाच तो कंपन्यांच्याही फायद्याचा आहे. पर्यावरणाला हानी न पोहोचवणारं स्वस्त आणि प्रभावी इंधन जसं महत्त्वाचं ठरेल, तसाच मॅथ्यू केलीचा हा शोध प्रभावी आहे!

मॅथ्यू केलीच्या संकल्पनेत एक त्रुटी आहे. ही त्रुटी स्पर्धेच्या दृष्टीनं फायद्याचीच ठरणारी असली, तरी काही व्यवस्थापक त्याची संकल्पना, त्याचा सिद्धांत नाकारतील! ते बहुधा म्हणतील, 'थट्टा करताय का राव? आजवर ऐकलेल्या कल्पनांपैकी ही सर्वांत साधी-सरळ कल्पना आहे!' किंवा ते म्हणतील, 'हा मॅथ्यू केली कोण टिकोजीराव लागून गेलाय? व्यवस्थापकीय तज्ज्ञ किंवा व्यावसायिक तज्ज्ञ म्हणून मी त्याचं नाव कधीही ऐकलेलं नाही.'

ह्या दोन्ही कुशंकांना माझं उत्तर आहे – 'म्हणून तर!' **– पॅट्रिक लेन्सिओनी 'द फाइव्ह डिस्फंक्शन्स ऑफ अ टीम'चे लेखक**

# द्विधा मनःस्थिती

तुमच्या संस्थेचं भवितव्य आणि तुमच्या कर्मचाऱ्यांची कुवत ह्या दोन्ही गोष्टी एकमेकांत गुंतलेल्या असतात; त्यामुळे संस्थेचं आणि कर्मचाऱ्यांचं नशीबसुद्धा परस्पराधिष्ठित असतं.

संस्थेतील कर्मचारी स्वत:ला सुधारण्याचा, आपली कुवत वाढवण्याचा प्रयत्न करत असले, तरच संस्था नावारूपाला येऊ शकेल! ही गोष्ट सर्व प्रकारच्या संस्थांबाबत अटळ असते – मग ती संस्था म्हणजे व्यवसाय असो, शाळा असो सरकारी संस्था असो, ना नफा ना तोटा तत्त्वावर चालणारी सामाजिक संस्था असो की खेळाडूंचा संघ असो! संस्थेचा संचालक, संचालक-मंडळातील सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी वैयक्तिक दृष्ट्या आपली कुवत वाढवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असले, तरच संस्थेचं स्वास्थ्य आणि कार्यक्षमता सुधारेल.

आजची मुख्य समस्या अशी आहे की, संस्थेतील बहुतांश कर्मचारी मानसिकदृष्ट्या संस्थेशी एकरूप झालेले नसतात. ते संस्थेशी एकनिष्ठ नसतात. मनाने अलिप्त असतात. आजच्या व्यवस्थापनापुढला हाच कूटप्रश्न आहे! आपल्या कामकाजाबद्दल, आपण काम करतो त्या संस्थेबद्दल, कामाच्या ठिकाणच्या आपल्या सहकाऱ्यांबद्दल लोकांची कमी-अधिक प्रमाणात त्रयस्थ वृत्ती असते. ह्या त्रयस्थ वृत्तीएवढा अन्य कोणत्याही गोष्टीचा दुष्परिणाम कर्मचाऱ्यांच्या मनोधैर्यावर, कार्यक्षमतेवर, उत्पादन क्षमतेवर, कायमस्वरूपी विकासावर, ग्राहकांबरोबरच्या जिव्हाळ्याच्या संबंधांवर आणि धंद्याच्या किफायतशीरपणावर घडत नसतो.

त्रयस्थवृत्ती : कर्मचारी मनानं ८५ टक्के गुंतलेला आहे? ६० टक्के गुंतलेला आहे? ५० टक्के गुंतलेला आहे? किंवा याहूनही वाईट म्हणजे नोकरीत असूनही मनानं तो पूर्णपणे अलिप्त आहे? तुम्ही हिशोब करून बघा. कर्मचारी तुम्हाला किती महागात पडत आहेत? जर तुमचे कर्मचारी मनानं फक्त ७५ टक्के गुंतलेले असतील – तर त्यांच्या त्रयस्थवृत्तीची पगारी रुपयातली किंमत त्यांच्या वेतनाच्या २५ टक्के एवढी आहे. त्यांच्या पगाराच्या पंचवीस टक्क्यांएवढा तुमचा उत्पादनातला तोटा आहे. संस्थेला होणारा खराखुरा तोटा याहूनही अधिक आहे. कारण कर्मचाऱ्यांच्या अशा त्रयस्थ वृत्तीमुळे धंद्याच्या प्रत्येक अंगावर आणि ग्राहकांवर जो दुष्परिणाम

घडतो, त्यामुळे धंद्याचे आणखी नुकसान होते.

पीटर ड्रकर या व्यवस्थापन-तज्ज्ञाला आपल्या हिशोब ठेवायच्या पद्धतीतली सर्वांत मोठी चूक शोधून काढल्याला जवळजवळ चाळीस वर्षं होत आली आहेत. ती चूक होती, कर्मचाऱ्यांना बॅलन्स शीटवर, हिशोब – खातेवहीत, लायेबिलिटी – कर्ज अथवा देय – या सदराखाली धरणं. यंत्र आणि संगणक ह्या गोष्टी 'मालमत्ते'च्या सदरात गणल्या जात असत. वस्तुत: योग्य दर्जाचे कर्मचारी ही संस्थेची सर्वांत मौल्यवान मालमत्ता असते. ही गोष्ट आपण तत्त्वत: मान्य केली असली, तरी व्यवहारात संस्था चालवताना आणि संस्था चालवणाऱ्या लोकांचं व्यवस्थापन करताना त्याकडे आपलं दुर्लक्ष होतंय. आपल्यासाठी आणि आपल्याबरोबर काम करणारे लोक, मनानं गुंतलेले असावेत असं आपल्याला वाटत नसतं असं नव्हे; पण त्यांची मानसिक गुंतवणूक घडवण्याची व्यवहार्य, कार्यक्षम आणि परवडेलशी पद्धत आपल्याला बरेचदा सापडत नाही.

कर्मचाऱ्यांच्या मानसिक – अलिप्ततेच्या, त्रयस्थ वृत्तीच्या ह्या घातक प्रवृत्तीत संपूर्ण परिवर्तन घडवण्याच्या दृष्टीनं 'द ड्रीम मॅनेजर' – स्वप्नांचा व्यवस्थापक – ही क्रांतिकारक संकल्पना खूपच उपयुक्त ठरेल. लहान-मोठ्या संस्था आपल्या कर्मचाऱ्यांशी संस्थेची बांधिलकी कशी पुनर्स्थापित करू शकतील, यावरचा तोडगा ह्या संकल्पनेमुळे सापडेल, कर्मचाऱ्यांची संस्थेशी मानसिकदृष्ट्या बांधिलकी घडून आली, तर संस्थेच्या किफायतशीरपणात प्रचंड वाढहोईल.

किमती, मालाचा दर्जा, उत्पादनाचं प्रमाण, ग्राहकसेवा, उत्पादन-गुणवत्ता, उत्पादनातली अग्रेसरता या मुद्यांबाबत पूर्वी कंपन्या धडपडत असत. येत्या दशकांमध्ये कंपन्यांपुढला कूटप्रश्न असणार आहे, कर्मचाऱ्यांच्या गुणवत्तेबाबतची स्पर्धा! ही स्पर्धा आताच पेटली आहे असं काहींना वाटत असलं, तरी प्रत्यक्षात ही स्पर्धेची केवळ सुरुवात आहे.

'बिझिनेस वीक' ह्या नियतकालिकानुसार येत्या दहा वर्षांमध्ये उच्च व्यवस्थापनातील २१ टक्के जागा आणि सर्व प्रकारच्या उद्योगधंद्यातील, सर्व भौगोलिक विभागातील, सर्व कार्यक्षेत्रांतील २४ टक्के व्यवस्थापकीय जागा रिकाम्या होणार आहेत. ह्याच्या जोडीला वृद्धत्वाकडे झुकणारा जनसमुदाय, कार्यक्षम वयातली घटती लोकसंख्या आणि आजरोजी अमेरिकेला बरेचसे अकुशल कामगार मिळवून देणाऱ्या बेकायदा – स्थलांतरितांबद्दलची

अमेरिकन नागरिकांची वाढती असहिष्णुता ह्या सर्व गोष्टींमुळे सर्व प्रकारच्या व्यवसायांत, कौशल्यं आणि कर्मचारी याबाबत अभूतपूर्व टंचाई निर्माण होणार आहे. थोडक्यात कुशल आणि अकुशल अशा दोन्ही प्रकारच्या, सर्व उद्योगांतल्या कर्मचाऱ्यांचा तुटवडा निर्माण होणार आहे.

परंतु योग्य लोकांना कामावर नेमणं, ही काही सोपी गोष्ट राहणार नाही! योग्य कर्मचाऱ्यांना आकृष्ट करणं, त्यांच्या ठायी कामाबद्दल बांधिलकी निर्माण करणं आणि त्यांना नोकरीत टिकवून ठेवणं, हे प्रत्येक आधुनिक यशस्वी नेत्यापुढली आणि संस्थेपुढली आद्य आव्हान असणार आहे.

प्रत्येक फुटबॉल संघाच्या प्रशिक्षकाचं प्रमुख कर्तव्य असतं, योग्य खेळाडूंना आकृष्ट करणं, त्यांना घडवणं, त्यांना विकसित करणं, त्यांना सुसंघटित करणं आणि त्यांना प्रोत्साहन देऊन संघाची गुणवत्ता वाढवणं. प्रशिक्षकांना आणि संघाच्या मालकांना पूर्णपणे जाणीव असते की त्यांच्या संघाचं यश योग्य गुणवत्तेचे खेळाडू आकृष्ट करणं, टिकवणं आणि त्यांच्यात बांधिलकीची भावना निर्माण करणं, या गोष्टींशी निगडित असतं. योग्य गुणवत्तेचे खेळाडू शोधून काढून त्यांना विकसित करणं याला ते अग्रक्रम देतात, तर मग एखाद्या शासकीय व्यवस्थापकापुढला अग्रक्रम तरी वेगळा का असावा?

कंपनीचा उद्देश असतो, आपला विकास घडवणं. पुढला प्रश्न आहे : कर्मचाऱ्यांचं आद्य कर्तव्य काय असायला हवं? बरेच जण उत्तर देतील – कंपनीला आपलं उद्दिष्ट साध्य करायला मदत करणं. परंतु हे उत्तर चुकीचं आहे. कर्मचाऱ्याच्या कर्तव्याचा हा एक भाग नक्कीच आहे, परंतु कर्मचाऱ्याचं आद्य कर्तव्य आहे – आपल्या गुणवत्तेची उंची वाढवण्यासाठी धडपडणं. अतिरिक्त व्यवस्थापकीय सिद्धान्त आणि कार्यपद्धतीनुसार कंपनीसाठी लोकांचं अस्तित्व असतं. वस्तुत: कंपनीचं अस्तित्व लोकांसाठी असतं. जेव्हा एखाद्या कंपनीला विसर पडतो की, ग्राहक सेवेसाठीच तिचं अस्तित्व आहे, तेव्हा ती कंपनी रसातळाला जाते. कंपनीचे कर्मचारी हेच तिचे पहिले ग्राहक असतात आणि हे ग्राहक अतिशय प्रभावी असतात.

*आपली गुणवत्ता वाढवणं हे प्रत्येकाचं आद्य कर्तव्य आहे.*

कर्मचाऱ्याला आपली गुणवत्ता वाढवता येईल, आपल्या कुवतीचा

विकास करता येईल, असं वातावरण निर्माण करून त्या जोडीला कंपनीचासुद्धा विकास घडवणं ही गोष्ट अनेकांना अशक्य कोटीतली वाटू शकेल; काहींना ह्या गोष्टी परस्परविरोधी वाटू शकतील. प्रत्यक्षात ह्या दोन्ही गोष्टी परस्परपूरक आहेत.

एका संचालकानं आणि त्याच्या व्यवस्थापकीय संघानं, बांधिलकी गमावलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये, बांधिलकी आणि निष्ठा पुनर्स्थापित करून धंद्यात परिवर्तन कसं घडवून आणलं, ह्याची ही कहाणी आहे.

ह्या कहाणीतून उलगडत जाणारं रहस्य आपल्याला साक्षात्कार घडवतं की, केवळ कामाच्या जागीच नव्हे, तर आपल्या जीवनातील प्रत्येक बाबीत आपल्याला कोणती गोष्ट प्रेरणा देते? तुम्ही एका मोठ्या संस्थेचे शासकीय संचालक असा किंवा छोट्याशा खात्याचे प्रमुख असा, शाळेचे मुख्याध्यापक, फुटबॉल संघाचे प्रशिक्षक असा किंवा तुमच्या कुटुंबातील ऐक्य टिकवून धरण्यासाठी धडपडणारा पालक असा, नाहीतर रोजच्या कामांचा अन्वयार्थ लावायचा प्रयत्न करणारा एक साधासुधा कर्मचारी असा... तुमचं आयुष्य कायमचं बदलून टाकेल असं काहीतरी तुम्हाला गवसणार आहे....

## ड्रिम मॅनेजर

माझ्या स्वप्नांबद्दल मला मार्गदर्शन करणारे आणि प्रेरणा देणारे अनेक 'ड्रीम-मॅनेजर्स' मला माझ्या आयुष्यात लाभले आहेत. माझे आई-वडील, शिक्षक, गुरू आणि प्रशिक्षक, नोकरीतले वरिष्ठ आणि सहकारी, मित्र आणि कधीमधी तर पूर्णत: अनोळखी व्यक्तींनीसुद्धा माझी स्वप्नं तेवती ठेवण्यासाठी मला साहाय्य केलं आहे. स्वप्नपूर्तीच्या माझ्या वाटचालीत, यातील प्रत्येक जणानं भरपूर हातभार लावला आहे, मला मदत केली आहे आणि मनातील अमूर्त आशा-आकांक्षांचा पाठपुरावा करण्यासाठी उत्तेजन दिलं आहे. परंतु त्याबाबत आता अधिक विचार केला की, त्यातील एका व्यक्तीची कामगिरी प्रकर्षानं जाणवते. ज्यानं सर्वांत पद्धतशीरपणे माझ्या स्वप्नांना जिवंत ठेवलं, असा माझा पहिला ड्रीम-मॅनेजर होता माझा भाऊ –सायमन!

सायमन हा व्यवसायानं वित्तनियोजक (Financial planner) असला, तरी प्रत्यक्षात तो इतर अनेक गोष्टींमध्येसुद्धा निपुण आहे. मला एकंदर सात भाऊ आहेत आणि सायमन माझ्यापेक्षा तेरा वर्षांनी मोठा आहे. मी तेरा-चौदा

वर्षांचा होतो, तेव्हा सायमन मला अनेकदा फुटबॉलची मॅच किंवा सिनेमा पाहायला किंवा जेवायला बाहेर घेऊन जायचा. माझ्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि आकांक्षांबद्दल याला आस्था वाटत होती. आम्ही एकत्र बाहेर व्यतीत केलेल्या वेळातच, मी माझ्या आकांक्षांच्या पूर्ततेसाठी योजनांची आखणी केली, असं मला स्मरतंय. सायमननंच मला शिकवलं की, स्वप्नपूर्तीसाठी आर्थिक नियोजन करणं अत्यंत महत्त्वाचं असतं. पैसे वाचवून त्यांची गुंतवणूक योग्य ठिकाणी केली की, ते चक्रवाढव्याजदरानं वाढत जातात हे त्यानंच मला शिकवलं. वयाच्या बाराव्या वर्षी मला पहिली नोकरी मिळाली, आमच्या गावातल्या एका औषधांच्या दुकानात. वृद्ध ग्राहकांच्या घरी औषधं पोहोचवण्याचं काम मला मिळालं होतं. पहिल्या नोकरीच्या दरम्यानच माझ्या वडिलांनी आणि सायमननं मला बचतीची शिस्त अंगी बाणवण्यासाठी उत्तेजन दिलं. आयुष्यातल्या अनेक स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी काहीही पैसा खर्च करावा लागत नसतो, ही गोष्ट सायमननं मला शिकवली आणि आयुष्यातल्या साध्या-साध्या, अमूर्त गोष्टी किती मौल्यवान असतात, हे त्यानंच माझ्या निदर्शनाला आणून दिलं.

दशकभरानंतर ड्रीम-मॅनेजर ही संकल्पना जेव्हा आकार घ्यायला लागली, तेव्हा माझ्या ताबडतोब लक्षात आलं की, ज्या गोष्टीची मी अनेक वर्षांपूर्वीच अनुभूती घेतली होती, तीच गोष्ट विकसित होऊन या संकल्पनेत परिवर्तित झाली आहे.

तुम्ही भूतकाळात नजर टाकून तुमच्या आयुष्याचा आढावा घेतलात, तर मला वाटतं तुम्हालासुद्धा कमी-जास्त प्रमाणात ड्रीम-मॅनेजरची भूमिका वठवणारे अनेक लोक आठवतील – आई-वडील, आजी-आजोबा, प्रशिक्षक, गुरुजन, मित्र, नोकरीतले सहकारी, पर्यवेक्षक, शिक्षक, धर्मगुरू आणि असेच आणखी कितीतरी! बरेचदा ही प्रक्रिया अगदी अजाणता, अनौपचारिक रीतीनं घडली असेल. दरमहा ड्रीम-मॅनेजरला भेटून आपण विशद केलेल्या स्वप्नांच्या पूर्तीसाठीचा पद्धतशीर आराखडा काढणं, कागदोपत्री त्याची नोंद करणं आणि ठरावीक अंतरानं त्याबाबतच्या प्रगतीचा आलेख मापणं अशा औपचारिक पद्धतीनं ही प्रक्रिया घडली नसली, तरी तुमच्या हितेच्छु लोकांनी तुमच्याबद्दल आणि तुमच्या स्वप्नांबाबत दर्शवलेल्या आस्थेचा आणि उत्तेजनाचा दूरगामी परिणाम तुमच्या आयुष्यावर नक्कीच घडलेला असणार!

आपल्याला आपल्या स्वप्नांच्या दिशेनं, आपली वाटचाल चालू ठेवण्यासाठी उद्युक्त करून उत्तेजन देणारे असे लोक आयुष्यात सहजपणे भेटत असतात. 'माझ्या स्वप्नांचा पाठपुरावा मी स्वबळावर करत असतो!' अशी शेखी मिरवणारी अनेक मंडळी असतात. काही अंशी ते खरंदेखील असतं; परंतु आपण आपली ही जबाबदारी नीटपणे पार पाडतोय की नाही, यावर नजर ठेवणारी व्यक्ती गरजेची असते, हे सुद्धा तेवढंच खरं आहे. बरेच लोक स्वप्नपूर्तीसाठीचा आराखडा स्वत:च आखण्यासाठी समर्थ असले, तरी या आराखड्याच्या कार्यवाहीवर कुणाची तरी नजर असणं गरजेचं असतं. आराखड्याची कार्यवाही करताना आपण चुकारपणा किंवा गाफीलपणा करत नाही ना, यावर त्रयस्थ पर्यवेक्षकाची नजर असणं गरजेचं ठरतं, कारण आपण अनेक सबबी सांगून किंवा समर्थनं देऊन स्वत:चीच फसवणूक करून घेणं, हा स्वाभाविक कमकुवतपणा नेहमी घडत असतो.

आपणा सर्वांना एका 'ड्रीम-मॅनेजर'ची गरज असते, हे मूलभूत सत्य आहे!

**आणखी एक सत्य**

आपल्या आयुष्यात अनेक ठिकाणी आपल्याला इतर अशी माणसं भेटतात की, ज्यांना त्यांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेनं वाटचाल करण्यासाठी उत्तेजन देऊन उद्युक्त करणं गरजेचं असतं. आपल्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यात आपल्याला अशी माणसं सतत भेटत असतात. त्यांच्या स्वप्नांना नेमक्या शब्दांत मांडून मूर्तरूप देण्यासाठी आणि त्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याची योजना आखण्यासाठी, त्यांना कुणीही मदत केलेली नसते. परिणाम...? स्वप्नपूर्तीच्या दिशेनं त्यांची वाटचालच सुरू झालेली नसते!

अशा लोकांना अनौपचारिक स्तरावर मार्गदर्शन करण्याची, त्यांचा 'ड्रीम-मॅनेजर' बनून त्यांना साहाय्य करण्याची जबाबदारी आपणच पार पाडायची असते. हे आणखी एक सत्य आपण स्वीकारलंच पाहिजे.

## *स्वत:ची खास स्वप्नपुस्तिका बनवा*

तुम्ही बहुराष्ट्रीय कंपनीचे प्रमुख व्यवस्थापक असा, एखाद्या लहान खात्याचे प्रमुख असा, छोट्याशा व्यावसायिक गटाचा एक नवा सदस्य असा किंवा घरी राहणारी माता-गृहिणी असा, दिवसाकाठी अनेकदा तुम्हाला

'ड्रीम-मॅनेजर'ची भूमिका वठवायची असते.

प्रश्न असा आहे : प्रारंभ कोठून करायचा?

**पहिलं पाऊल – शुभस्य शीघ्रम्!**

आपण पाहात असलेली स्वप्नं म्हणजे अंतर्ज्ञानानं दिलेली दिव्यदृष्टीच! तीच आपलं आयुष्य घडवत असतात. तुमची स्वप्नं कोणती आहेत, याची तुम्हाला जाणीव आहे? तुम्ही स्वप्नं पाहणं थांबवलं आहे? कधीकधी आपण स्वप्नं पाहायचंच थांबवतो. आपल्या व्यावसायिक आणि वैयक्तिक वाटचालीत आपण समस्यांशी झुंजता-झुंजता इतके थकून जातो की, आपल्याला स्वप्नं पाहण्याएवढी फुरसतच लाभत नाही! आपण स्वप्नं पाहायचं थांबवलं की, आपल्या कामात आपलं मन लागेनासं होतं, विविध नातेसंबंधांबद्दल आपल्याला ओढवाटेनाशी होते आणि एकूण आयुष्याबद्दलच आपण निरुत्साही बनतो.

'ड्रीम-मॅनेजर' म्हणून काम सुरू करताना तुम्हाला वाटू शकेल, 'त्यात काय अवघड आहे? पुस्तकाबरहुकूम आपण लोकांना स्वप्नांबाबतचं मार्गदर्शन चुटकीसरशी करू शकू!' तुम्ही असं केलंत, तर वाटेतली एक महत्त्वाची पायरी तुम्ही गाळाल.

गेल्या दशकाहून अधिक काळ, मी माझ्या स्वप्नांची नोंद करणारी एक वही ठेवली आहे. ही वही ठेवायची कल्पना माझ्या डोक्यात कशी आली कुणास ठाऊक! १९९०च्या दशकाच्या सुरुवातीला मी सिडनीमधील एका पुस्तकांच्या दुकानात गेलो होतो. तिथे मला खरबरीत, जाडजूड पानं असलेली एक नोंदवही दिसली. ती मी विकत का घेतली याचं मला अजूनही कोडं वाटतं, कारण मी तोपर्यंत कधीही रोजनिशी लिहिलेली नव्हती. काही दिवसांनी मी लंडनच्या विमानात चढलो आणि या नोंदवहीत मी माझी स्वप्नं लिहून ठेवायला सुरुवात केली. ही नोंदवही आता माझी स्वप्नपुस्तिका बनली होती.

तेव्हापासून मी या स्वप्नपुस्तिकेत माझ्या अगणित स्वप्नांची नोंद केलेली आहे. यात मी मोठाले निबंध लिहिलेले नाहीत. बऱ्याचशा पानांवर फक्त एकच शब्द किंवा एकच वाक्य किंवा चित्र आहे. मला जी स्थळं बघायची आहेत, जी वैयक्तिक आणि व्यावसायिक ध्येयं मला पूर्णत्वास न्यायची आहेत, जे सद्गुण मला अंगी बाणवायचे आहेत, जी संतवचनं मला प्रेरणा

देतात, जे संदेश मला आदर्श वाटतात, ज्या गोष्टी मला भविष्यात विकत घ्यायची इच्छा आहे, अशा गोष्टींची मासिकांमधून कापून काढलेली चित्रं मी जमा केली आहेत. माझा सहभाग असलेल्या अनेक संस्थांबाबत माझी जी उद्दिष्टं आहेत, जी साहसं करून पाहण्याची माझी इच्छा आहे, भविष्यकाळासाठी जो वारसा मला मागे ठेवायची इच्छा आहे – अशा विविध गोष्टींची नोंद मी माझ्या या स्वप्नपुस्तिकेत करून ठेवली आहे.

मी जिथे-जिथे जातो, तिथे-तिथे ही स्वप्नपुस्तिका माझी सोबत करते. विमान प्रवास करत असताना, अनेकदा मी ह्या स्वप्नपुस्तिकेवरून नजर फिरवतो आणि माझ्या स्वप्नांबाबत विचार करतो. कधी-कधी रात्री झोपण्यापूर्वी मी त्यातली काही पानं वाचतो. परंतु बरेचदा जिममध्ये व्यायाम करत असताना मी या स्वप्नपुस्तिकेतील माझ्या स्वप्नांची उजळणी करतो. मी ट्रेडमिल किंवा एलिप्टिकलवर व्यायाम करत असताना या स्वप्नपुस्तिकेची पानं उलटून, त्यावर भरभर नजर टाकतो आणि माझ्या प्रत्येक स्वप्नाबाबत विचार करतो. मी एका वेळेस एकाच स्वप्नाबाबत विचार करत असतो. त्यातल्या काही स्वप्नांची पूर्तता मी अनेक वर्षांपूर्वीच केलेली असते आणि प्रथम ते स्वप्न लिहिताना मला ते किती अशक्यप्राय वाटलं होतं हे आठवलं की, मला मजा वाटते. स्वप्नपुस्तिकेतली काही स्वप्नं मला अजूनही धूसर आणि अशक्यच वाटतात. माझी बरीचशी स्वप्नं मी प्रथम या स्वप्नपुस्तिकेत लिहिली, तेव्हा मला ती अशक्यच वाटलेली होती. ज्या स्वप्नांची पूर्तता करण्यात मला यश मिळालंय, ती मला माझ्या अन्य स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी बळ पुरवतात. ह्या वहीची पानं उलटून त्यात लिहिलेल्या माझ्या एक-एक स्वप्नावर नजर टाकताना माझ्या मनात येतं की, यातलं विवक्षित स्वप्न सत्यात उतरवता आलं, तर मला किती आनंद होईल! ही साधीशी कृती मला स्वप्नांचा पाठपुरावा करायचं जे बळ पुरवते, ते पाहून मी थक्क होतो! त्यामुळे माझा तुम्हाला सल्ला आहे :

**– स्वत:साठी एक स्वप्नपुस्तिका बनवा.**

**– त्यात तुमच्या स्वप्नांची नोंद करायला प्रारंभ करा.**

**– विनासंकोच तुमची स्वप्नं त्यात लिहीत चला. स्वप्नं पाहण्यावर मर्यादा घालू नका.**

**– स्वप्नपुस्तिकेत नवं स्वप्न घातलंत की, त्या दिवसाची तारीख लिहा.**

**– स्वप्न सत्यात उतरलं की, त्या तारखेचीसुद्धा नोंद करा.**

भविष्यकाळात तुम्ही एकेकाळी स्वप्नपुस्तिकेत लिहिलेल्या स्वप्नांचा जेव्हा आढावा घ्याल, तेव्हा तुमच्या लक्षात येईल की, लिहिताना अशक्य कोटीतली वाटणारी स्वप्नंच तुम्ही सहजपणे वास्तवात आणू शकला होता! स्वप्नपूर्तीबाबत तुम्ही किती प्रगती केली आहेत, हे पाहून तुम्ही विस्मयचकित व्हाल.

दहा वर्षांपूर्वी मी माझ्या स्वप्नपुस्तिकेत एका स्वप्नाची नोंद केलेली होती. ते स्वप्न होतं, 'कॅमिनो' ही पाचशे मैलांची वाटचाल पायी करून जाणं. याचा प्रारंभ दक्षिण फ्रान्समधील 'सेंट जीन पाइड द पोर्ट' येथून होतो. तेथून तुम्ही पायरनीजमधून थेट दक्षिणेला मार्गक्रमण करता आणि स्पेनच्या उत्तर भागातून पश्चिमेला सँटिॲगोपर्यंत वाटचाल करता. गेली हजार वर्षे लोक या मार्गानं पायी प्रवास करत आले आहेत. मी प्रथम त्याबद्दल ऐकलं, तेव्हाच मला ती कल्पना मोठी रोचक वाटली होती.

त्यावेळेस मी ताबडतोब या प्रवासाचं स्वप्न, माझ्या स्वप्नपुस्तिकेत नोंदवून टाकलं होतं; परंतु ती नोंद करतानासुद्धा हा प्रवास मी प्रत्यक्षात करणं अवघड आहे, असा विचार माझ्या मनात आलेला मला आठवतोय. त्याबाबत माझ्या मनात असंख्य शंकाकुशंका होत्या : मला त्यासाठी महिन्याची रजा काढणं शक्य होईल का? अनेक लोक महिन्याची रजा कधीही घेत नाहीत. मी महिनाभर अनुपस्थित राहिलो, तर माझी कामं कोण करेल? हे पूर्णत: अव्यवहार्य आहे. ते धोक्याचंसुद्धा आहे. तुम्ही लोकांना सांगणार, 'मी महिन्याच्या रजेवर जातोय!' आणि लोक तुम्हाला विचारणार, 'तू कुठे जातो आहेस?' तुम्ही सांगणार, 'पायी-पायी भटकंती करायला!' आणि ते तुम्हाला वेड्यात काढणार! स्वप्नपुस्तिकेत या पुस्तकाची नोंद करताना मी क्षणभर कचरलो होतो. त्या स्वप्नाची नोंद करायला मी कां-कूं करत होतो, परंतु शेवटी मी निग्रह केला आणि त्या स्वप्नाची नोंद केली. त्या गोष्टीलासुद्धा अकरा वर्षं होऊन गेली.

दररोज मी माझ्या स्वप्नपुस्तिकेची पानं उलटून माझ्या विविध स्वप्नांवर नजर टाकत गेलो आणि कालांतरानं अशाच इतर स्वप्नांप्रमाणेच 'कॅमिनो'चा प्रवास पायी करणं हे स्वप्नदेखील अशक्य कोटीतलं वाटेनासं झालं. मी तो प्रवास पुढल्या वर्षी करीन असं म्हणता-म्हणता....

...अखेरीस गेल्या वर्षी मी महिन्याची रजा घेतली. मी बॅकपॅक घेऊन

विमानानं दक्षिण फ्रान्समध्ये पोहोचलो. बॅकपॅकमध्ये नकाशा, पाण्याची बाटली आणि स्लीपिंग बॅग घेऊन मी पायी प्रवास सुरू केला. कधी मी दिवसाकाठी वीस मैलांचं अंतर पार करत असे, तर कधी पंचवीस मैलांचं. मी नुसता चालायचो. दऱ्या-खोऱ्यांतून, पर्वतमाथ्यांवरून, द्राक्षाच्या मळ्यांमधून, मक्याच्या शेतांमधून, गव्हाच्या उभ्या पिकांतून, धूळभरल्या सपाट टापूतून. दिवसाकाठी दहा, बारा, कधी-कधी चौदा तास मी फक्त चालत राहायचो. सेलफोन नाहीत, ई-मेल्स नाहीत, आयपॉड नाही, कम्प्युटर नाही, टी.व्ही. नाही. आपलं दररोजचं आयुष्य व्यापून टाकणारी एकही गोष्ट नाही!

त्या पुरातन मार्गानं पायी-पायी सँटिॲगोपर्यंत केलेल्या प्रवासाचा अनुभव केवळ अपूर्व होता. पहिल्या दिवशी मी मूकपणे, शांततेची अनुभूती घेत एकतीस मैल चाललो होतो. माझ्या चित्तवृत्ती इतक्या ताज्यातवान्या झाल्या होत्या. विचारप्रवाह इतका स्वच्छ होता. इतक्या नवनवीन कल्पना माझ्या डोक्यात उसळी घेत होत्या की या क्षणी मी प्रवास थांबवून परत गेलो, तरी मी एक नवीच व्यक्ती बनून परत जात असेन, असं मला वाटलेलं मला स्मरतंय. तीन आठवड्यांनी मी सँटिॲगोला पोहोचलो, तेव्हा माझ्या मनात आलं की, हा प्रवास मी इतके दिवस कशासाठी लांबणीवर टाकला?

**तुमची स्वप्नं काय आहेत?**

**पाचशे मैल पायी तुडवणं, ही तुमची साहसाची कल्पना नसेल. काही हरकत नाही. तुमची स्वतःची अशी खास स्वप्नं असतील. तुम्हाला तुमच्या कल्पनेतली साहसं करायची असतील. आज केव्हातरी तुमच्या दैनिक गलबल्यातून निग्रहानं थोडा वेळ बाजूला काढा आणि तुमच्या स्वप्नांची नोंद करा. एकूण शंभर स्वप्नांची यादी तयार करा. आज हे करणं शक्य होणार नसेल, तर उद्या किंवा परवा थोडा वेळ काढा आणि हे काम करा. तुम्ही हे काम लांबणीवर टाकू लागलात, तर तसं का घडतंय, या प्रश्नाचं उत्तर शोधा.**

स्वप्नांची ही यादी अगदी संपूर्ण किंवा उत्कृष्ट नसली तरी चालेल; त्यासाठी सुबक स्वप्नपुस्तिकेची गरज नाही. लिहायला फक्त सुरुवात करा! स्वप्नं पाहताना स्वतःवर बंधनं घालू नका. स्वप्नं पाहून ती लिहिताना, 'काहीही अशक्य नाही!' अशी सकारात्मक मानसिकता असू दे!


या सर्वांचा कर्मचाऱ्यांच्या व्यवस्थापनाशी कोणता संबंध आहे?

चैतन्यानं सळसळणाऱ्या संघाची स्थापना करण्याशी याचा काय संबंध आहे? धंदा चालवण्यासाठी याची कोणती गरज आहे? या प्रश्नांची उत्तरं मिळाली की, तुम्ही थक्क व्हाल असं मला वाटतं.

तेव्हा आणखी वेळ न दवडता, स्वत:साठी एक स्वप्नपुस्तिका बनवा!

❖


**५वी आवृत्ती**




# काठ

**मूळ लेखक** - डॉ. एस. एल. भैरप्पा

**अनुवाद** - उमा कुलकर्णी


**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

अमृता आणि सोमशेखर यांच्या नात्याच्या माध्यमातून लेखक काही मूलभूत प्रश्न उपस्थित करतो.

व्यक्तीला आयुष्यात नक्की काय हवे असते? स्त्री-पुरुषांना परस्परांकडून नक्की काय हवे असते? खरे प्रेम म्हणजे काय? मनोविकारांना आरंभ कसा होतो? अशा प्रकारच्या नात्यांना आपण एका साच्यात किंवा विवाहाच्या चौकटीत बसवू शकतो का? असे असेल, तर मग या नात्यांचे भवितव्य काय? अशा अनेक मूलभूत प्रश्नांचा विचार करायला लावण्यातच या कादंबरीच्या यशाचे खरे गमक आहे!

डॉ. अंजली जोशी
मानसोपचार तज्ज्ञ

**नवं कोरे**




# चिकन सूप फॉर द फादर्स सोल

लेखक व संकलन -
**जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन**
**जेफ ऑबेरी / मार्क डोन्नेल्ली**
**क्रिसी डोन्नेल्ली**

अनुवाद - **सुप्रिया वकील**

**प्रत्येकी किंमत : १५०/-रु. प्रत्येकी पोस्टेज :३०/-रु.**

'आई' या दोनच शब्दांतून मायाळू, बिनशर्त प्रेम करणाऱ्या व्यक्तीची प्रेमळ प्रतिमा उभी राहते, आणि 'बाबा' म्हटलं की, संरक्षक, आपल्याला सगळ्या गोष्टी पुरवणाऱ्या, शहाणपणाचे धडे देणाऱ्या, अधिक खंबीर अशा व्यक्तीची प्रतिमा उभी राहते. पित्याचं प्रेम दृढआणि विश्वासार्ह असूनही बरेचदा ते तितक्या भावनाशीलतेनं व्यक्त होत नाही, पण ते आई इतकंच उत्कट असतं! फक्त ते बरेचदा शब्दांत मांडलं जात नाही. या पुस्तकात याच नात्याचे गोफ हळूवारपणे उलगडून दाखवणाऱ्या हळव्या कथा आहेत. या कथा वाचकांना त्यांच्या पित्याच्या गाढप्रेमाची जाणीव देतील आणि त्यांच्या काळजाची तार छेडतील.

# स्मरण



## ग. दि. माडगूळकर...

अर्वाचीन मराठी काव्यविश्वात अलौकिक भर टाकणाऱ्या प्रतिभावंत कवींमध्ये ग.दि.माडगूळकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. अशी गीते त्यांनी लिहिली. प्राचीन मराठी गीतवाङ्मयाला बव्हंशी भक्तीची प्रेरणा लाभली होती, तीच भक्तिपरंपरा ग.दि.माडगूळकर यांनी अधिक विस्तारली. 'गीतरामायण', 'गीतगोपाल', 'गीत सौभद्र' ही त्याची ठळक उदाहरणे काव्यप्रेमींना ज्ञात आहेत. प्राचीन गीतांमध्ये श्रीकृष्ण, श्रीराम आणि श्रीविठ्ठलाची भक्ती सहजपणे प्रगट झाली. प्राचीन गीतांमध्ये परमेश्वरासंबंधीच्या प्रेमभावाचे सुखद रंग मिसळले गेले होते. ज्ञानदेवादी सर्वच संतांच्या अभंग रचना त्याला साक्ष आहेत. संतांचे ते अनुभवाचे बोल होते. तुकाराम महाराजांनी म्हटले होते की,

तुका म्हणे आग्रह करावा न लगे ।
सांगतसे अंगे अनुभव ।।

ज्ञानदेवांनी आपल्या अप्रतिम विराण्यांमधून, गोपींच्या मनात दाटून आलेला उत्कट स्त्रीभाव प्रकट करताना म्हटले की,

भेटीये गेलीये तंव तीच जालिये ।
भुलली ठेलिये मज न कळे काही ।।
परतलिया दृष्टी जंव मागुता न्याहाळी ।
तंव काळी ना सांवळी मूर्ती चोजवेना ।।

ज्ञानदेवांच्या गीतकाव्यातून विरहिणीची व्यथा ही प्रेमिकेची नसून समर्पणभावाची उत्कट अवस्था आहे. वैचारिकता हे संतांच्या गीतकाव्याचे प्रधान वैशिष्ट्य होते, तसेच प्रेमभाव हा त्यांच्या गीतकाव्याचा गाभा होता. तेराव्या शतकातले हे गीतकाव्य सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत सतत

उमलत गेले. पुढे हा गीतप्रकार काहीसा खंडित झाला. तो प्रवाह एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भा.रा.तांबे ह्यांच्या काव्यातून पुन्हा प्रभावित झाला. तांब्यांच्या नावावर दोन-अडीचशे ज्या कविता आहेत त्यातल्या निम्म्याहून अधिक कविता प्रेमाने भारलेल्या आहेत आणि त्या गीतकाव्याच्या अंगानेच प्रगट झालेल्या आहेत.

तीनी सांजा सखे मिळाल्या, देई वचन तुला
आजपासुनी जिवे अधिक तूं माझ्या हृदयाला...

'गीतरामायण' हे गीतकाव्य श्रीरामाचे उत्तुंग दर्शन तर घडवितेच, त्याहून अधिक श्रीरामाच्या मुखातून मानवासाठी जे तत्त्वज्ञान गदिमांनी प्रगट केले आहे, त्याला तोड नाही.

दैवजात दु:खे भरतां दोष ना कुणाचा
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा...

'गीतरामायण'ची पहिली आवृत्ती ऑक्टोबर १९५७ मध्ये प्रसिद्ध झाली. त्याला आता साठ वर्ष पूर्ण होतील. कविश्रेष्ठ बा.भ.बोरकर यांनी आपल्या प्रस्तावनेत 'गीतरामायण' ह्या काव्यासंबंधी प्रतिक्रिया व्यक्त करताना, ''आदिकवी वाल्मीकीनें आपल्या स्वतंत्र सौंदर्यदृष्टीनें विधात्याच्या सूक्ष्म आणि स्थूल सृष्टीतून नेमके सौंदर्य टिपून काढून त्यातून आपली रामकथा रचली. त्याचप्रमाणे कविश्री माडगूळकरांनी वाल्मीकीच्या काव्यसृष्टीतले सौंदर्य आपल्या स्वयंभू प्रतिभेने बिनचूकपणे निवडले आहे. अवघ्या ५६ गीतांत आपली सजीव आणि चलत् चित्रकथा तुमच्या-आमच्या समोर मूर्तिमंत केली आहे. आदिकवीने निर्माण केलेली पात्रे आणि वातावरण यांना कविश्रींनी कुठेच धक्का लागू दिलेला नाही... एकेका गीतांतून त्या त्या पात्राचे सारे व्यक्तिमत्व कवीने साक्षात् उभे केले आहे. ते सामर्थ्य लहान-सहान नाही.''

ही कथा झाली श्रीरामाच्या दिव्य गीतकाव्याची. त्याचप्रमाणे श्रीकृष्ण चरित्रातील कृष्ण जन्मापासून मथुरागमनापर्यंतचा कथाभाग पस्तीस गीतांमधून गुंफून गदिमांनी 'गीतगोपाळ' ह्या गीतकाव्याची निर्मिती केली. विरही राधेच्या अंत:करणात जे भाव उमलून आले त्यांचा हा सर्वोत्तम आविष्कार आहे.

अजन्मा जन्मासी आला
कारागारीं, अंधकारी कृष्णजन्म झाला....

माडगूळकरांनी 'गीतरामायण' आणि 'गीतगोपाळ' ह्या दोन

गीतकाव्यांबद्दल म्हटले होते की, राम-कृष्णाचे देवत्व ज्यांनी श्रद्धेने मानले आहे, त्यांना हे गीतकाव्य निश्चितपणे आवडेल. कथा-कीर्तनातल्या टाळमृदुंगाच्या भक्तिगंगेत त्यांचे बालपण न्हाऊन निघाले. संत-पंत-तंत कवितेचे गदिमांवर संस्कार झाले म्हणून तर माडगूळकर अर्वाचीन गीतकाव्याशी नाळ जोडू शकले. पु.ल.देशपांडे यांनी माडगूळकरांच्या गीतकाव्यावर भाष्य करताना म्हटले होते की, ''आधुनिक कवितेप्रमाणे अर्थाच्या प्रसुतीसाठी समीक्षक नावाची सुईण नसते तर या हृदयीचे त्या हृदयी सरळ ओतावे लागते. सोप्या शब्दांतून अर्थाची गहन बीजे फुलवणाऱ्या प्रतिभेची माडगूळकरांना तर देणगीच आहे.'' शेकडो गीते लिहून गदिमांनी आपल्या प्रतिभेला आयुष्यभर उमलवत ठेवले. वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, म्हणजे १४ डिसेंबर १९७७ ह्या दिवशी गदिमांनी शेवटचा श्वास घेतला.

वामन देशपांडे

डोंबिवली (पूर्व), ९३२४६१५०७७


**१०वी आवृत्ती**




## शर्यती-स्पर्धा-खेळ
### सुधारित आवृत्ती

## आ. पां. खरात

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

माणूस स्पर्धाप्रिय आहे. आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर प्रभुत्व गाजविण्यासाठी स्पर्धकांची धडपड चाललेली असते. प्रभुत्व गाजविण्यासाठी कौशल्यांची आवश्यकता असते. आणि कौशल्ये ही खेळाच्या, स्पर्धेच्या नियमांच्या चौकटीतच वृद्धिंगत होत असतात. कौशल्ये आत्मसात करण्यासाठी खेळाडूंना आणि खेळांचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी प्रेक्षकांना खेळांच्या अद्ययावत नियमांची माहिती असणे आवश्यक आहे. नियमांची माहिती नसल्याने खेळाडू स्पर्धेत अपयशी ठरल्याची किंवा स्पर्धेचा बोजवारा उडाल्याची उदाहरणे आहेत.

'शर्यती-स्पर्धा-खेळ' पुस्तकाच्या या सुधारित आवृत्तीमध्ये विविध देशी-विदेशी खेळांची सुधारित नियमांसह माहिती दिलेली आहे. खेळाडू, शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक व पंच यांना ती उपयुक्त ठरेल याबाबत शंका नाही. त्यांच्याकडून या पुस्तकाचे स्वागत होईल असा विश्वास वाटतो.



# श्रद्धांजली

## मधु नाशिककर यांचे निधन

साने गुरुजी यांनी त्यांच्या संपर्कात आलेल्या असंख्य तरुणांवर आयुष्यभर टिकून राहणारा ठसा उमटवला. सानेगुरुजींचे लेखन, आचार आणि विचारांतून अनेक तरुणाची मने नव्या दृष्टिकोनाने प्रज्वलीत झाली. त्याचेच एक मूर्तिमंत प्रतीक असलेले मधु नाशिककर त्यांचे नुकतेच वयाच्या ९३व्या वर्षी देहावसान झाले. अखेरच्या श्वासापर्यंत साने गुरुजी यांच्या जगाला प्रेम अर्पिण्याच्या एकमेव धर्माच्या पालनापासून ते कधीच ढळले नाहीत. आपण व्रतस्थाप्रमाणे आपले इतिकर्तव्य पार पाडत रहावे, हे त्यांचे ब्रीदवाक्य होते.

ते मूळ नाशिकचे. त्यांचा जन्म कवळाणे या छोट्या खेड्यातला. ते केवळ १० दिवसांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. पुढे शिक्षणासाठी दाही दिशा भटकण्याची त्यांच्यावर वेळ आली आणि ते १९४०मध्ये मुंबईत दाखल झाले. नोकरी करत असताना ते राजकारणातही पडले. बॅ. नाथ पै. एम. एस. जोशी, दत्ता ताम्हाणे आदींसोबत काँग्रेस समाजवादी पक्षात काम करायला लागले. त्यानंतर ते मुंबईतून छेडलेल्या भारत छोडो आंदोलनात सामील झाले. तुरुंगवासात असताना ते साने गुरुजीच्या संपर्कात आले. त्या भेटीपासून त्यांनी अखेरचा श्वास घेईपर्यंत मुलांवर संस्कार करण्याचे व्रत चालू ठेवले. त्यांनी आपले सारे जीवन साने गुरुजींच्या विचारांच्या प्रसारार्थ व्यतीत केले. त्याशिवाय संयुक्त महाराष्ट्राचा लढा, गोवा मुक्ती आंदोलन यामध्येही त्यांचा सहभाग होता. भाववाढविरोधी सत्याग्रहात आणि आणीबाणीच्या काळातही त्यांना कारावास भोगावा लागला. त्यांनी सानेगुरुजींच्या स्मरणार्थ जीवन विकास मंडळाची स्थापना केली. 'कथामाला' हे साने गुरुजींचे खरेखुरे स्मारक आहे, यावर त्यांची श्रद्धा असल्यानेच त्यांनी २५ वर्षे सातत्याने कथामाला मासिकाची संपादकीय

जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. आपल्या जीवनाने साने गुरुजींनी आम्हाला मार्ग दाखवला, असे ते म्हणत. आणि म्हणूनच १९९६मध्ये त्यांचा दादर येथे गौरव करण्यात आला तेव्हा त्यांना अर्पण केलेल्या एक लाख ३० हजार रुपयांच्या थैलीत स्वत:चे एक हजार रुपये घालून ते सर्व पैसे कथामाला मासिकाला त्यांनी दिले. साने गुरुजींची ध्येयासक्ती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या कामाला संपूर्णपणे वाहून घेतलेल्या वा व्रतस्थाला विनम्र आदरांजली!

## ✳ रमेश मुधोळकर

'मुलांना केवळ वाचन करायलाच शिकवू नका, जे वाचले त्याच्यावर प्रश्न विचारायलाही शिकवा,' असे जॉर्ज कार्लिन या लेखक-अभिनेत्याने म्हटले आहे. रमेश मुधोळकर यांच्या पुस्तकांनी नेमके हेच काम केले. त्यांनी मुलांना वाचायची सवय लावलीच, शिवाय मुलांच्या चौकस बुद्धीला खाद्य पुरवले. त्यांची शेकडो पुस्तके त्याची साक्ष पटवतात. उपेक्षित बालसाहित्याला समृद्ध करण्यात त्यांचा वाटा सिंहाचा होता. अकबर आणि बिरबलाच्या १७५ कथा, अरेबियन नाइट्स, बोधिसत्त्वाच्या ९० बोधपर गोष्टी, इसापनीतीच्या ५३० गोष्टी, मुल्ला नसरूद्दीनचे किस्से, नवनाथांच्या गोष्टी, शेखचिल्लीच्या गोष्टी आदी देशोदेशींच्या रसाळ कथा त्यांनी नव्याने सांगितल्या. एवढेच नव्हे तर खगोलशास्त्र, चित्रकला, अक्षरचित्रांसह अंकलिपी, भारतीय विज्ञान सप्तर्षी, भारतरत्न, पक्षी, प्राण्यांचे बंड, बडबडगीते असे मुशाफिरी करणारे लेखनही त्यांनी केले. मराठीप्रमाणेच इंग्रजीतही लेखन केले. खरेतर ते लेखक झाले, ते अपघातानेच. अनुवाद करता करता त्यांनी स्वतंत्र लेखन करण्यास सुरूवात केली.

त्यांचे प्राथमिक शिक्षण मलकापूर येथे आणि माध्यमिक शिक्षण मुंबईच्या छबिलदास हायस्कूलमध्ये झाले. त्यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून कमर्शियल आर्टचे शिक्षण पूर्ण केले. त्यामुळे लेखनाबरोबरच पुस्तकाचे मुखपृष्ठ, आतील सजावट आणि गोष्टीवर आधारित चित्रेही ते स्वत:च रेखाटत. लेखकाला चित्रकलेची जाण असेल तर लेखन सुंदर दिसते, असे मुधोळकर यांच्या लेखनाकडे पाहून म्हणावे लागेल. मात्र, चित्रांची सुरुवात लेखनाआधीच झाली होती. शिक्षण सुरू असतानाच त्यांनी जयको पॉकेट बुक्ससाठी चित्रांचे काम केले.'अमर चित्रकथा' या गाजलेल्या

चित्रकथा मालिकेचे काम त्यांनी केले आहे. ‘अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलन’ या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा सहभाग होता. ‘एको बुक्स’ या कुमार वाङ्मयाच्या पुस्तक मालिकांच्या निर्मितीत त्यांचा वाटा होता. स्वतंत्र लेखनाबरोबर शेरलॉक होम्सच्या कथांचा अनुवाद किंवा जॉन बॅकन याच्या पुस्तकाचा ‘एकोणचाळीस पायऱ्या’ हा त्यांनी केलेला अनुवादही लक्षणीय ठरला. शंकरमहाराज आणि दिगंबरदास महाराजांसारख्या परमार्थी व्यक्तींच्या गोष्टींमधून त्यांनी संदेशपर लेखन केले. २००९ मध्ये त्यांच्या लेखनसंपदेच्या विक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये करण्यात आली. मात्र, कोणत्याही लेखकासाठी पुरस्कार, मानसन्मानापेक्षा मोठे असते, हे वाचकांचे प्रेम! मुधोळकर यांनी बालवाचक तयार केले आणि त्यांचे रूपांतर मोठेपणीच्या उत्तम वाचकांत झाले. हेच त्यांचे लेखनाचा यश.

## ❋ लेखक डॉ. सुभाष दांडेकर यांचे निधन

मेहता पब्लिशिंग हाऊसचे एक लेखक डॉ. सुभाष दांडेकर यांचे १ मार्च २०१६ रोजी निधन झाले. दांडेकर यांचे शालेय शिक्षण सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे झाले आणि महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी पुणे येथील फर्ग्युसन कॉलेज येथे प्रवेश घेतला. १९७२ मध्ये त्यांनी पुणे येथील आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज येथून एम.बी.बी.एस.ची पदवी संपादन केली. एल.आय.सी, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि पोस्ट अॅन्ड टेलिग्राम अशा सरकारी तसेच निम-सरकारी व्यवस्थापनांचे ‘अधिकृत डॉक्टर’ म्हणून ते काम करत होते.

दांडेकर यांनी वैद्यकीय क्षेत्रातील विविध विषयांवर लेखन केले. त्यांचे २००२ साली प्रकाशित झालेले ‘चाळीशीनंतरची वाटचाल’ हे पुस्तक गाजले आणि वर्षभरात त्याच्या तीन आवृत्त्या प्रकाशित झाल्या. त्यांनी श्री. भरत ठाकूर लिखित ‘योगा फॉर स्ट्रेस रिलीफ’ व ‘योगा फॉर वेट लॉस’ या इंग्रजी पुस्तकांचे भाषांतरही केले. योगसाधना व त्याचे महत्त्व, नेत्रदान, वृद्धांचे प्रश्न या विषयांवर त्यांनी लेख लिहिले असून, आकाशवाणीवर कार्यक्रमही सादर केले तसेच या विषयांवर ते ठिकठिकाणी भाषणे देत असत.

सामाजिक कार्याची आवड असल्याने दांडेकर, १९८० सालापर्यंत विश्व हिंदू परिषदेच्या वैद्यकीय केंद्रातर्फे झोपडपट्ट्यांमध्ये ट्रिपल पोलिओ, मुडदूस आणि कुपोषण यांसाठी मोफत सेवा पुरवण्याच्या कार्यात सहभागी झाले होते. ‘आनंदाश्रम’ या संस्थेचे ते संस्थापक होते. या संस्थेतर्फे वृद्धाश्रम चालवला जातो.

नवी दिल्ली येथील ‘भारत एक्सलन्स ॲवॉर्ड बाय फ्रेंडशिप फॉर्म ऑफ इंडिया’, इंडियन मेडिकल असोसिएशन, (सातारा शाखा) समाजसेवा पुरस्कार यांसारखे अनेक सन्मान दांडेकर यांना मिळाले तसेच ‘इंडो-अमोर्सियन हूज हू’मध्ये त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला होता.

❖


**नवं कोरे**

# चिकन सूप फॉर द मदर्स सोल

भाग २ व ३




लेखन व संकलन
**जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन**
**मार्सी शिमॉफ / कॅरोल क्लीने**

अनुवाद - **उष:प्रभा पागे**

**भाग - २ किंमत : १९५/-रु. भाग - ३ किंमत : १५०/-रु.**
**प्रत्येकी पोस्टेज : ३०/-रु.**

‘चिकन सूप फॉर द मदर्स सोल’ या पहिल्या पुस्तकाला वाचकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला आणि वाचकांच्या मागणीनुसार या दुसऱ्या भागाची निर्मिती करावी लागली. मातेची ममता, आईचं प्रेम हे या जीवसृष्टीतील चिरंतन मूल्य आहे. आईच्या ममतेची आणि आईची तुलना अगदी कशाशीच, कोणाशीच होऊ शकत नाही, अशा आशयाची एक आफ्रिकन म्हण आहे.
या भागातील कथा मातेचं प्रेम, धैर्य, तिच्यातील शहाणपण यांवर प्रकाश टाकतात. काही कथांतून मातांचंही उद्बोधन केलं आहे. आईच्या प्रेमाची पक्व अवस्था आजी झाल्याशिवाय प्राप्त होत नाही. म्हणून आजी-आजोबांच्या ममतेचं महत्त्वही या कथांमधून अधोरेखित होतं. एकूणच मानवी जीवनातील आईच्या प्रेमाचे स्थान किती महत्त्वाचे आहे, हे जाणून आईचे प्रेम, ममता हे मूल्य जाणून घ्यायची शिकवण या कथांमधून नक्कीच मिळते आणि याची वाचनीयता त्यामध्येच आहे.



# बालनगरी


## एल्मर आणि वारा

त्या दिवशी फारच सोसाट्याचा वारा सुटला होता. जंगलातल्या एका गुहेत आसऱ्यासाठी एल्मर थांबला होता. त्याचे इतर हत्ती दोस्त, काही पक्षी-मित्र आणि त्याचा चुलत भाऊ विल्बरही त्याच्याबरोबर होता. नेहमीप्रमाणे विल्बर वेगवेगळ्या आवाजांच्या करामती करत होता. गुहेच्या मागच्या बिळातून येणाऱ्या आवाजाची त्यानं नक्कल केली. तो हुबेहूब आवाज ऐकून सगळे जण मनमुराद हसले.

''केवढा हा वारा सुटलाय! आज उडण्यात धोका आहे.'' एक पक्षी म्हणाला. ''हो ना. आपण एवढेसे लहान. हलके. या वाऱ्यात कुठेही भेलकांडत जाऊ!'' दुसरा घाबरत म्हणाला. ''हो. पण आमच्यासारख्या हत्तींना काही होणार नाही.'' एल्मरनं चिडवलं. ''पण हत्तींना उडता कुठे येतं?'' पक्ष्यानं टोला दिला. ''शिवाय एल्मर, मी तर म्हणतो की, या सोसाट्याच्या वाऱ्यात बाहेर पडायला तू घाबरतोयस. भित्री भागूबाई कुठली.'' दुसऱ्यानं आणखी चिडवलं. ''काय म्हणालास? मी – मी भित्रा आहे? बघच आता. विल्बर, चल. यांना दाखवूच आपण कोण आहोत ते.'' एल्मरनं बेट लावली.

''एल्मर, विल्बर – वाऱ्यात जायचा वेडेपणा करू नका. मागे फिरा.'' आजोबा हत्ती रागावले. पण त्यांचं बोलणं ऐकायला एल्मर-विल्बर तिथे होते कुठे? ते तर आधीच गुहेच्या बाहेर पडले होते.

दोघं झाडांच्या मागे उभे राहिले. आता ते त्या गुहेतल्या हत्तींच्या नजरेच्या टप्प्यात नव्हते. एल्मर पुढे झाला आणि दुसऱ्या गुहेच्या दिशेनं जायला लागला. ''ही आयडिया भन्नाट आहे हं एल्मर!'' विल्बर म्हणाला. ''मग! तुझाच भाऊ आहे मी! विल्बर, आता एक काम कर. तू असा काही आवाज काढून त्यांच्याशी बोल की, आपण अजूनही वाऱ्यात चालतोय, असं त्यांना वाटलं पाहिजे. आणि हो, अधून-मधून माझ्यासारखाही आवाज काढून बोल.'' एल्मरनं सांगितलं.



''वा! आलं लक्षात.'' असं म्हणून एल्मरसारखा आवाज काढून विल्बर बोलायला लागला. शिवाय आवाज असा काढला की, जणू खूप लांबून बोलतोय. ''या सोसाट्याच्या वाऱ्यात पाऊल पुढे टाकणंही मुश्किल आहे.'' मग स्वत:च्या आवाजात म्हणाला, ''एल्मर,



सांभाळून चल.''

हे आवाज ऐकून सगळे हत्ती काळजीत पडले. एवढ्यात विल्बर ओरडला, ''एल्मरऽऽ कशाला तरी घट्ट पकड. ते बघ – ते बघ!''

''धावाऽधावाऽऽवाचवाऽ'' एल्मरचा आवाज आला. ''वाचवाऽऽ मी उडायला लागलोय... वाऱ्यानं उडतोय! वाचवाऽऽ''

''एल्मर खाली ये. बापरे! तू उडतोयस कसा? वाचवाऽ वाचवाऽऽ एल्मर – एल्मर...'' विल्बरचा ओरडा ऐकू आला.

''बापरे! म्हणजे एल्मर वाऱ्यानं उडून चाललाय वाटतं? चला, आपण त्याच्या मदतीला जायला हवं. एक हत्ती म्हणाला.

''अरे, पण हत्तीदादा, तू या गुहेतून बाहेर गेलास, तर तूही वाऱ्यानं उडून जाशील ना!'' एक पक्षी म्हणाला.

''थांबा. एक युक्ती करू या. आपण सगळे जण साखळी करू या. मागच्या हत्तीनं पुढच्या हत्तीची शेपूट सोंडेनं पकडायची – काय?'' दुसऱ्यानं युक्ती लढवली.


''हो – हो. चालेल. आपल्या एल्मरला मदत करायलाच हवी.'' असं म्हणून सगळ्या हत्तींनी सोंडेत शेपटी पकडून साखळी केली. सगळे बाहेर आले.

पुढच्या हत्तीची शेपूट मागच्याच्या सोंडेत पकडलेली पाहून एल्मरला हसायला आलं. ''ए विल्बर, ते बघ. कसे दिसतायत सगळे!'' तो म्हणाला.

''एल्मर, मागे हो – वाऱ्यानं उडशील!'' विल्बरनं त्याला हाक मारली.

हत्तींना काही तरी बोलायचं होतं खरं; पण शेपट्या आणि सोंड एकमेकांत गुंतल्यामुळे त्यांना तोंडच उघडता येईना. त्यांच्या तोंडून फारच चमत्कारिक, गमतीशीर आवाज येत होते. ''छ्या! या दोघांनी आपल्याला ''मामा'' बनवलं!'' आपल्याला फसवलं. आपली चेष्टा उडवली!'' ही सगळी एल्मर आणि विल्बरची ट्रिक आहे हो!'' सगळे जण वैतागले. गुहेत परतले.

थोड्या वेळानं एल्मर आणि विल्बरही तिथे आले. सगळ्या हत्तींनी हा ''जोक'' ''एन्जॉय'' केला. ''एल्मर, तुझं फारच चुकलं. वेड्यासारखा वागलास तू.'' एक पक्षी म्हणाला.



''खरं आहे मित्रा पण हत्ती काही वाऱ्यानं उडून जात नाही. मी आता त्या झाडापर्यंत जाऊन परत येतो, म्हणजे तुम्हाला हे पटेल.'' एल्मर म्हणाला आणि तो बाहेर पडला.

''बघितलंत? ही याची आणखी एक ट्रिक.'' दुसरा हत्ती म्हणाला.

एल्मर झाडांच्या मागे दिसेनासा होईपर्यंत सगळे त्याच्याकडे बघत होते.

थोडा वेळ गेला आणि एकदम एल्मरचा आवाज आला. ''वाचवाऽ वाचवाऽऽ



लवकर या – मला धरून ठेवा. मला जमिनीवर उभं राहता येत नाहीये!''

सगळे हत्ती हसले. ''विल्बर, पुन्हा गंमत करतोय!'' पुन्हा मदतीसाठी हाक आली. ''अरे, या – लवकर या... मी उडून चाललोय!'' आता तर हत्तींच्या हास्याचा धबधबाच सुरू झाला. ''अहो, हा आवाज मी काढत नाहीये.'' विल्बर म्हणाला.

''अरे, खरंच! हा विल्बर नाहीये.'' एक पक्षी म्हणाला. सगळ्यांनी त्या दिशेनं बघितलं, तर काय – एल्मर झाडावर होता. ''तू तिथे काय करतोयस?'' एका हत्तीनं दरडावून विचारलं. ''ह्यालाच तर उडणं म्हणतात.'' पक्षी म्हणाला. ''बिच्चारा एल्मर!'' हत्तीला त्याची दया आली.

'हे माझे सुपासारखे कान सारखे पंखांसारखे हलणारे. हे पंखांसारखे काम करतायत. ते हलवले की, मी उडतोय.' एल्मरच्या मनात आलं.

त्यानं खाली पाहिलं. विल्बर आणि इतर सगळे हत्ती त्याला इटुकले-मिटुकले दिसत होते.

क्षणभरानंतर त्याला वाटलं – 'खरंच, असं उडण्यात किती मजा आहे! धम्माल!'

इतर सगळे प्राणी त्या सोसाट्याच्या वाऱ्यापासून स्वत:ला वाचवण्यासाठी धडपड करताना त्याला दिसत होते आणि त्यांना एक हत्ती चक्क उडताना दिसत होता.

''अरे, हा तर एल्मर! हीसुद्धा त्याची बंडलबाजीची ट्रिक असेल.'' सिंह म्हणाला.

शेवटी सोसाट्याचा वारा थांबला आणि एल्मर खाली आला.

'छे बुवा! केवढं लांब चालत जायला लागणार आहे. बोअर जॉब! मला माझ्या मूर्खपणाची शिक्षा मिळाली' त्याच्या मनात आलं.

वारा-वादळ शांत झाल्यावर एल्मरला शोधायला पक्षी उडत-उडत निघाले. त्यांना एल्मरला घराची वाट दाखवायची होती. हत्तींना पक्ष्यांचा थवा उडताना दिसला. त्यावरून 'एल्मर इथे जवळपास असणार,' हे त्यांनी ओळखलं. एल्मरच्या साहसाबद्दल ऐकायची त्यांनाही खूप उत्सुकता होती. त्यामुळे तेही त्या दिशेने जायला लागले.



''एल्मर, तुझं म्हणणं चुकीचं ठरलं. हत्ती वाऱ्यानं ढकलला जाऊ शकतो.'' पक्षी म्हणाला.

''मित्रा, तुझंही म्हणणं चुकीचं ठरलं. आजचा दिवस उडण्यासाठी फारच सुंदर होता!'' एल्मर हसत-हसत म्हणाला.

❖

समस्त जीवित आणि नामशेष प्राणिसृष्टीतील प्राणी, पक्षी, जलचर आणि उभयचर प्राण्यांच्या उत्क्रांतीचा मागोवा घेणारी चित्रमय सफर...


## ‘आपली सृष्टी’ १० पुस्तकांची मालिका

किंमत प्रत्येकी ₹ ११०














जलसम्राट मासे
अजब सर्पसृष्टी
उभयचरांचे अनोखे विश्व
आकाशसम्राट पक्षी
पाणथळीतले पक्षी
मनोरंजक सस्तन प्राणी
डायनोसॉरचे अद्भुत विश्व
अनोखी मत्स्यसृष्टी
अनोखे सस्तन प्राणी
सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग





प्राचार्य डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार














चित्र ओळखा व रिकाम्या जागा भरुन चित्राचे नाव पूर्ण करा आणि रंगवा.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | फ | | | द |


| | | |
|---|---|---|
| | र | |





| | | | |
|---|---|---|---|
| | | ग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ल | पा | | |






| | | |
|---|---|---|
| गु | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | स | | म |



## वाचत राहा...






**आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी
पेटून उठलेल्या हिंमतवान भारतीय सैनिकांच्या
या कथा... त्यांचे निर्भिड कर्तृत्व
ठसठशीतपणे मांडणाऱ्या...**


RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 April, 2016. Posting Date : 11 April, 2016.


# आमची नवीन पुस्तके...




BOOK POST
Printed Matter

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.